निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर विरूध्द व तर्फे प्रलंबित व नव्याने दाखल होणा-या मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व वरिष्ठ स्तर लातूर , मा.जिल्हा न्यायालय, मा.कामगार व औद्योगिक न्यायालय मा.उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ औरंगाबाद उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे न्यायालयीन प्रकरणामध्ये लातूर शहर महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी कायदे सल्लागार / विधीज्ञ यांची आवश्कता असल्यामुळे मा.आयुक्त महोदय यांचे दि.10/05/2023 च्या मान्यतेप्रमाणे कायदे सल्लागार यांचे नियुक्ती बाबत अर्ज मागवणे करिता जाहिर प्रगटण देणे बाबत व कायदे सल्लागार यांच्या नियुक्ती बाबत पुढील प्रक्रीया पुर्ण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

382

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

206

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 121 दिनांक 07/06/२०२३

विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत कामास मंजूरी देणे बाबत.

प्रस्तावना :- नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्र.२२७-५/नवि-१६ दिनांक ३१ मार्च २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांचा विकास सन २०२२-२३ साठी (लेखाशिर्ष (२२१७०९१३) अंतर्गत लातूर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांसाठी रु. १,००,००,०००/- कोटी निधी मंजूर केला आहे. शासन निर्णयानुसार कार्यान्वयण यंत्रणा लातूर शहर महानगरपालिका आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय. किंमत
१	लातूर महानगरपालिका पभाग क्र. १७ मध्ये संत ज्ञानेश्वर नगर यथे रस्ता व नाली करणे	५०,००,०००.००
२	लातूर हानगरपालिका प्रभाग क्र. १८ मध्ये खंदाडे नगर येथे रस्ता व नाली करणे	५०,००,०००.००
	एकूण रुपये	१,००,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत सन २०२२-२०२३ साठी प्राप्त होणा-या निधीमधून उपरोक्त कामे हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

384

Scanned with OKEN Scanner

(207)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका

ठराव क्र. 122 दि. 12/05/2023 06

प्रस्ताव:-

लातूर शहर महानगरपालिका,लातूरचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७(अ) प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका लातूरचे सन २००१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालय औरंगाबाद यांचेकडून लेखापरीक्षण झाले असून, लेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास दि.२७/०४/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर दोन वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालात एकूण १३१ परिच्छेद समाविष्ट आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर मा. आयुक्त यांनी तीन महिन्याच्या आत तो अहवाल मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याची तरतूद आहे.

तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमानुसार लेखापरीक्षण अहवालावर आवश्यक ती कार्यवाही मा. आयुक्त यांनी करावे अशीही तरतूद उक्त कलमात नमूद आहे. सदर तरतुदींच्या अनुषंगाने व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० (सुधारणा २०११) चे कलम १०(१) अन्वये लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदाचे प्रथम अनुपालन अहवाल अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याच्या आत स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडे पाठविणे अनिवार्य आहे.

वर नमूद अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मा. सर्वसाधारण सभेपूढे/मा. प्रशासक ठेवणेसाठी व अनुपालन अहवाल उपसंचालक(मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालय यांचेकडे पाठविणेसाठी मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा आयुक्त यांचेकडे सादर होणे योग्य.

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

निर्णय:-

उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय औरंगाबाद यांचेकडून लातूर शहर महानगरपालिका, लातूरचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला असून सदरील अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७(अ) अन्वये सदर लेखापरीक्षण अहवाल मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवलेली आहे. तरी याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियमातील तरतुदींनुसार अहवालातील परिच्छेद, आक्षेप अनियमितता बाबत आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास ही महानगरपालिका सर्वसाधारण सभा तथा प्रशासक मान्यता देत आहे व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

386

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

(208)

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 123 दिनांक 14/06/२०२३

विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत कामास मंजूरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना –</u> नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.३६२/नवि-१६ दिनांक ०८ फेब्रुवारी २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद सन २०२२-२३ साठी (लेखाशिर्ष (२२१७०९३) अंतर्गत लातूर महानगरपालिका क्षेत्रातील महाराणा प्रताप नगर येथील पाणंद रस्ता २३१ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी रु. १,००,००,०००/- कोटी निधी मंजूर केला आहे. शासन निर्णयानुसार कार्यान्वयण यंत्रणा लातूर शहर महानगरपालिका असल्याने सदर कांम करणेसाठी महाराणा प्रताप नगर गामपंचायतीने काम करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

अ.क्रं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय. किंमत
१	लातूर महानगरपालिका क्षेत्रातील महाराणा प्रताप नगर येथील पाणंद रस्ता २३१ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.	१,००,००,०००.००
	एकूण रुपये	**१,००,००,०००.००**

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत सन २०२२-२०२३ साठी प्राप्त होणा-या निधीमधून हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

388

Scanned with OKEN Scanner

(209)

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.--~~124~~-------ठराव क्रं.-------~~124~~---------- दिंनाक 16/06/२०२३

विषयः- मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

"लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली, देखभाल व दुरूस्तीसाठी सॉफ्टवेअर सह ऑन लाईन व इतर ५३ सेवा पुरवणे. बाबत तसेच एचडीएफसी बॅकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करण्याबाबत विषय विचार विनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर."

प्रस्तावनाः-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली व देखभाल,दुरूस्तीसाठी तसेच ऑन लाईन मालमत्ताकराचा भरणा करून घेण्यासाठी एचडीएफसी बॅकेमार्फत ऑसेटेंक एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती.पंरतू शासनाने निर्गमित केलेल्या ५३ सेवा नागरीकांना पुरवण्याबाबत बॅकेस वारंवार विचारणा करण्यात आली असता या सेवा पुरवण्याच्या बदल्यात बॅकेमध्ये अतिरिक्त ठेवी ठेवल्याशिवाय ५३ सेवा पुरवण्याचा प्रस्ताव मान्य करता येत नाहीत असे बैठकीमध्ये चर्चेअंति सांगण्यात आले आहे. त्यानुसार सदर सेवा पुरवण्याबाबत असमर्थता दर्शीवल्यामुळे सदर बॅकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करणे योग्य होईल.

तसेच उपरोक्त सेवा पुरवण्याबाबत इंडियन बॅक यांनी या कार्यालयाकडे २९/०३/२०२३ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून कर संकलन विभागाचे व शासनाने निर्गमित केलेल्या ५३ सेवा, हॅन्ड डिव्हाईसेस प्रिंटरसह (एकुन ४० नग) व सिएसआर फंडामधुन इतर कामे विनामुंल्य करून देण्याचे मान्य केले असून एचडीएफसी बॅकेमार्फत या पूर्वी झालेला द्विपक्षीय करानामा रद्द करून इंडियन बॅकेसोबत करारनामा करणे योग्य होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली व देखभाल,दुरूस्तीसाठी तसेच ऑन लाईन मालमत्ताकराचा भरणा करून घेण्यासाठी एचडीएफसी बॅकेमार्फत ऑसेंटेक एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती.सदर सेवा पुरवण्याबाबत असमर्थता दर्शीवल्यामुळे सदर बॅकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करण्यात यावा व उपरोक्त इंडियन बॅकेने सादर केलेल्या प्रस्तावास विनामुंल्य सेवा घेण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.व त्यांच्यासोबत ,द्विपक्षीय करारनामा करून घेण्यासाठी उपायुक्त कर संकलन विभाग व मुख्यलेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

390

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 125 दि.22/06/२०२३

विषय – ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत २०१८ प्र.क्र १७५ नगर विकास ३४ दि.१२ एप्रिल २०१८ च्या मान्यते नूसार लातूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन DPR ला मान्यता प्राप्त असून, त्यानूसार DPR 2018 अ.क्र २१ नूसार ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे करीता. मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनूसार दि.०२.०३.२२३ रोजी GEM पोर्टलवर निवीदा प्रकाशीत करण्यात आली होती. निवीदा क्र. GEM/2023/B/3214860 च्या विहीत वेळेत ३ निवीदा धारक प्राप्त झाले आसून १ निवीदा धारक अपात्र झाल्याने पात्र २ निवीदाधारकांचा लिफाफा दि.३०.०५.२०२३ रोजी उघडण्यात आला तरी सदर निवीदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	MEGNUM HEALTH WORLD	71,51,150/-
२	VENKATESHWAR ENTERPRISES	69,51,150/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **VENKATESHWAR ENTERPRISES** चे दर प्रति नग ३४,७५,५७५/- अशे एकूण रू. ६९,५१,१५०/- (अक्षरी एकोणसत्तर लक्ष ऐकावन्न हजार एकशे पन्नास रूपये फक्त) सर्वात कमी असून **VENKATESHWAR ENTERPRISES** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे या कामासाठी सर्वात कमी दर **VENKATESHWAR ENTERPRISES** चे दर प्रति नग ३४,७५,१५०/- अशे एकूण रू. ६९,५१,१५०/- यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

(211)

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 126 दि.22/06/२०२३

विषय – ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करणे बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय क्र.. सवमअ-२०२३/प्र.क्र-३८(१)/नवि-३४ नूसार लातूर शहर महानगरपालिकेसाठी ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करण्या करीता रू. ५२,२६,७२०/- अक्षरी (बावन्न लक्ष सहवीस हजार सातशे वीस रू) ची मंजूरी मिळाली होती व हि रक्कम स्वचछ महाराष्ट्र अभियान -१ मधील Community Toilet मधील रू. १,२०,९८,६११/- अक्षरी (एक कोटी वीस लक्ष अठ्यान्नव हजार सहाशे अकारा रू) मधून खर्च करण्याची मंजूरी नूसार दि.२३.०३.२०२३ रोजी ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करणे करीता GEM PORTAL वर निवीदा प्रकाशीत करण्यात आली. सदर निवीदेस एकूण १४ निवीदाधार प्राप्त झाले असून त्यापैक ३ निवीदा धारक पात्र झाले असून पात्र ३ निवीदाधारकांचे २ लिफाफा (आर्थीक) दि.२३.०५.२०२३ रोजी उघडण्यात आला. सदर निवीदेमध्ये सर्वात कमी दर **S.S. ENTERPRISE** चे प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- असून सदर दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	S S ENTERPRISES	4602400/-
२	MEERA STEEL FABRICATION & Fibers	5208000/-
३	NEW SAI FIBER	5224000/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **S.S. ENTERPRISE** चे दर प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- (अक्षरी सेहचाळीस लक्ष दोन हजार चारशे फक्त) सर्वात कमी असून **S.S. ENTERPRISE** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – **८ मोबाईल टॉयलेट खरेदी करणे** या कामासाठी सर्वात कमी दर **S.S. ENTERPRISE** चे दर प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- (अक्षरी सेहचाळीस लक्ष दोन हजार चारशे फक्त) असून यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

394

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक ---127------ ठराव क्रमांक -127--- दिनांक 28 /06/2023

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 5 मध्ये 345 लाभार्थ्यांपैकी 210 लाभार्थ्यांनी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भ्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणतांही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थींचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 5 मध्ये 210 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 5 मधील 210 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 5 मधील 210 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

(213)

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक ----~~128~~----- ठराव क्रमांक -~~128~~--- दिनांक 28 /06/2023

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 6 मधील 1250 लाभार्थ्यापैकी 758 लाभार्थ्यानी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भ्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थींचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

398

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका , लातूर

दिनांकः 17/07/2023

प्रशासकीय ठराव क्र. 129 अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे MULTIPURPOSE FIRE TENDER खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर मंजूर करणे बाबत..

प्रस्तावः-

जिल्हा वार्षिक योजना सन 2022-23 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू.1,57,50,000 निधी उपलब्ध करून देण्यातआलेला आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी लातूर यांनी पत्र क्र.2023/नपाप्र/अग्नि./कावि-426 दि.30.03.2023 अन्वये या कार्यालयास वितरित केलेले अग्नि- -शमन अनुदान रक्कम रु.1,57,50,000 रुपयास प्रशाकिय मान्यता प्रदान केले आहेत.

तसेच मा.आयुक्त लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तिचे व वित्तीय अधिकाराचे तसेच मा.संचालक,अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन यांचे तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तिचे काटेकोर पालन करणे व ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत कळविले आहेत त्यानुसार प्रशाकिय मान्यता प्राप्त झाले प्रमाणे ई- निविदा मागविणेत आले असता एकूण 03 निविदाधारकांनी (ठेकेदारांनी) सहभाग नोंदविले त्यात NIDHI ENTERPRISES, MUMBAI यांचे दर सर्वात कमीचे आसुन वाटा-घाटीने दररचा तपसिल खलिल प्रमाणे.

आ. क्र.	कंपनीचे नाव ⟹ वाहनाचा तपसिल ⇩	NIDHI ENTERPRISES, MUMBAI		शेरा
		प्राप्त निविदेतील दर "A"	वाटाघाटीने कमी केलेले दर "B"	
1	2	3	4	5
1	Design, Construction, Fabrication Erection, Testing and Commissi- -oning of Fire Water cum Foam Tender on 19 Ton GVW BS-VI Chassis for Fire Services of Latur City Municipal Corporation (including Chassis).	1,59,10,000/-	1,57,00,000/-	

तरी प्रस्तावित प्रस्तावाप्रमाणे कॉलम क्र. 04 प्रमाणे वाटाघाटीने कमी केलेले दरपत्रक रू.1,57,00,000/- खर्चास अर्थिक व प्रशासकिय मान्यतेसह खर्च करणेच्या मंजूरीस्तव सादर.

निर्णयः- अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे MULTIPURPOSE FIRE TENDER खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर रक्कम रू. 1,57,00,000/- खर्च करणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

400

Scanned with OKEN Scanner

(215)

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 130 दि. 18/07/2023

विषय -लातूर शहर पाणी पुरवठा योजना,धनेगाव हेडवर्क्स, हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील (विदयुत/ यांत्रिकी) वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.

प्रस्ताव

लातूर शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत धनेगाव हेडवर्क्स, हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेसाठीच्या बाबीचे दर ई-निविदा सुचना क्र.04/2023-24 निविदा आय डी क्र.2023_896728_1 मागविण्यात आली होती निविदा बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. निविदा मागविलेला कालावधी दि. 21.04.2023 ते 15.05.2023 निविदा उघडण्याचा दि.16.05.2023
2. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बीड रिपोर्ट वरून निर्दशनास आलेनुसार दि.16.05.2023 रोजी निवीदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. तीन निविदाधारकाचे कागदपत्राची छाननी केले नंतर तीन्ही निविदा पात्र असल्याने निविदाचा आर्थिक लिफाफा दि.25.05.2023 रोजी उघडण्यात आला.
3. प्राप्त निविदा दराबाबतची माहिती खालील विवरणामध्ये सादर करण्यात येत आहे.

अ.क्र	निविदाधारकाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	मे. आश्विनी इलेक्ट्रीकल्स, लातूर	1,68,48,778/-	4% जास्तीने रक्कम रू.1,75,22,729.120
2	मे. लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर		2% जास्तीने रक्कम रू.1,71,85,753.56
3	मे. साई इलेक्ट्रीकल,लातूर		5% जास्तीने रक्कम रू.1,76,91,216.900

वरील प्रमाणे तीन निविदाधारकाचे दर प्राप्त झाले असुन प्राप्त निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर **मे. लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर** यांचे अंदाजपत्रक रक्कम रू.1,68,48,778/- पेक्षा 2% जास्तीने म्हणजे 1,71,85,753.56 रूपये आहे. मात्र वाटाघाटी अंती निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दराप्रमाणे काम करण्यास लेखी सहमती दिलेली आहे.

निर्णय –

लातूर शहर पाणी पुरवठा योजना धनेगाव हेडवर्क्स,हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील (विदयुत/ यांत्रिकी) वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेच्या कामासाठी **मे.लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर** यांचे अंदाजपत्रकीय दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी प्रशासकीय ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

402

Scanned with OKEN Scanner

(216)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 131 दिनांक. 19/07/2023

विषय क्र.

विषय :- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील कंत्राटी स्वरुपात कार्यरत तीन (03) शिक्षकांना मुदतवाढ देणे बाबत.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील इयत्ता 9 वी 10 वी वर्गाला अध्यापन करण्याकरीता असलेले **1. श्री. दिवे विलास माधवराव, 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान , 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी ,** या तीन कंत्राटी शिक्षकांना शैक्षणीक वर्ष सन 2022-23 साठी दि. 21/07/2022 च्या ठराव क्र.23 अन्वये मंजुरी देण्यात आली होती.

तरी याही वर्षी चालू शैक्षणीक वर्षाकरीता वरील शिक्षकांना सन 2023-2024 साठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 येथील तीन कंत्राटी शिक्षकांना **दि.2 जुन 2023 ते 30 एप्रिल 2024 पर्यंत** मुदतवाढ देणेबाबतचा पस्ताव सादर.

निर्णय:

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियूक्त असलेले सहशिक्षक **1. श्री. दिवे विलास माधवराव, 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान , 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी ,** यांना शैक्षणिक वर्ष सन 2022-23 साठी देण्यात आलेली मुदत दि. 30.04.2023 रोजी संपली असल्याने शैक्षणिक वर्ष 2023-24 करीता उक्त तीन (03) कंत्राटी शिक्षकांना दि.02 जून 2023 ते 30 एप्रिल 2024 पर्यंत मूदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

404

Scanned with OKEN Scanner

(217)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 132 दिनांक-25 07 / 2023

विषयः- ई-निवीदा क्र. 06/2023-2024 अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना-

मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांचे प्रमा.आदेश क्र.2023/नपाप्र/नागरी दलितेत्तर/कावी-479 दि. 31.03.2023 अन्वये **नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या एकुण 132** कामासाठी एकुण अं.प.रु. 14,92,41,884/- ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने ई-निवीदा सुचना क्र.06/2023-2024 अन्वये खालील 03 कामांच्या एकत्रित रुपये-2,02,37,560/- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्र.मा.किंमत
1.	पद्मानगर येथे क्षेत्रिय कार्यालय क्र. ए बांधणे	83,29,000.00
2.	ठाकरे चौक येथे क्षेत्रिय कार्यालय क्र. बी बांधणे	87,88,000.00
3.	महानगरपालिकेच्या पश्चिम दिशेला फायर फायटींग सेंटर इमारत बांधणे.	80,32,000.00

त्यानुसार सदर कामांसाठी खालील 03 (तिन) निवीदाधारक सहभागी झाले होते.

(1) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर.

(2) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर

(3) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.01 (कागदपत्र) दि.28.06.2023 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने (1) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन दोन्ही निवीदाधारकाकडून तात्काळ कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक (1) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. 4099/2023-24 दि.07.07.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार SCADA enabled Reversible Drum Type Concrete Mixer कागदपत्रे सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.11.07.2023 पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. परंतू विहीत मुदतीत निवीदाधारक ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी कागदपत्रे सादर न केलेने अपात्र करण्यांत आले. तसेच (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र. 4100/2023-24 दि.07.07.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार खालील कागदपत्रे सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. (1) Statement-I (Work in Hand), (2) Statement-III (Similar Type work year-2015-16, 16-17, 17-18, 18-19, 19-20, 20-21, 21-22) (3) Statement-IV (Technical Staff) (4) Quantities Certificate (5) Own Water Tanker (6) Truck/Tipper (own/higher) (7) Bid Capacity तरी आपण

407

Scanned with OKEN Scanner

दि.11.07.2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यानुसार निवीदाधारक सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी दि.10.07.2023 रोजी लेखी पत्र देऊन पत्रासोबत सदर कागदपत्रे सादर केली असल्याने त्यांना पात्र करण्यांत आले.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (1) ए.के. कन्स्ट्रक्शन, लातूर व (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 11.07.2023 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

<u>कामाचे नावः- नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत-</u>

Proposed Costruction of Zone A Office at Padma Nagar and Zone B Office at Thakare Chowk and Proposed Development of Fire Fighting Center Building at West side of Municipal Corporation Latur Premise for M.C.Latur. Rs. 2,02,37,560/- Tender ID No.2023_LMC_907506_1

अ.क्र.	निवीदाधारकाचे नांव	निवीदेत दिलेले दर
1.	ए. के. कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 2.000% अधिक
2.	**सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद**	**अंदाजपत्रक दर**

सदर कामासाठीचे न्युनतम (L1) निवीदाधारक **सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद** यांची अंदाजपत्रक दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट झाल्यास त्यासही मान्यता मिळावी. तसेच क्षेत्रिय कार्यालय क्र.ए साठी सदर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास इतर ठिकाणी बांधणेस मान्यता व्हावी.

<u>निर्णयः-</u> Proposed Costruction of Zone A Office at Padma Nagar and Zone B Office at Thakare Chowk and Proposed Development of Fire Fighting Center Building at West side of Municipal Corporation Latur Premise for M.C.Latur. Rs. 2,02,37,560/- Tender ID No.2023_LMC_907506_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा **सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद** यांची अंदाजपत्रक दराची असल्याने निवीदाकार **सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद** यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते.

तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट अथवा बदलास तसेच जागेत बदल झाल्यास त्यासही मान्यता देण्यांत येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

408

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 133 दि. 27/07/2023

विषयः- खर्चास / खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावः- सन 2016-2017 ते 2017-2018 या वर्षाच्या मनपाच्या लेखापरिक्षण अहवालात परिच्छेद क्र. 68, 105,106 व 107 मध्ये खालील प्रमाणे आक्षेप नोंदविले आहेत.

परिच्छेद क्र. 68, मनपातील विविध कार्यक्रम पत्रिका छपाई करण्यातील अनिमितता. खर्च रक्कम-168,300/-
सदर आक्षेपात जाहिरात वर्तमान पत्रात देणे आवश्यक असताना दिलेले नाही, संकेत स्थळावर नोटीस प्रसिध्द केले नाही. तसेच दरपत्रके मागविले नाही, असे आक्षेप नोंदविले आहे.

परिच्छेद क्र. 105, समिती नेमप्लेट बनविण्याबाबत. खर्च रक्कम- 6750/-
सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

परिच्छेद क्र. 106, निमंत्रण पत्रिका खर्चातील अनिमितता. खर्च रक्कम- 19800+19800=39600/-
सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

परिच्छेद क्र. 107, चांदीचे कडे, मानाचा फेटा, केसरीब्लेट खरेदीतील अनिमितता. खर्च रक्कम- 22851/-
सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

वरिल सर्व परिच्छेदामध्ये दरपत्रके न मागविता खरेदी केल्याचा आक्षेप नोंदविला आहे. कार्यक्रम पत्रिका/ निमंत्रण पत्रिका छपाई कार्यक्रम अचानक ठरविल्याने दरपत्रके न मागविता छपाई केलेली आहे. तसेच समितीचे नेमप्लेट खर्च अल्पप्रमाणात असल्यामुळे तातडीने नेमप्लेट बनविणे आवश्यक असल्याने दरपत्रके न मागविता नेमप्लेट तयार करण्यात आलेले आहेत आणि चांदीचे कडे लातूर मधील चांदीचे प्रसिध्द व व्यवसायाची नोंदणी केलेल्या नोंदणीधारक व्यवसायीक लक्ष्मीकांत ताथोडे यांच्याकडून खरेदी केलेली आहे. त्यामुळे दरपत्रक मागविण्यात आलेले नाही.

तरी वरील सर्व प्रकरणातील खर्च दरपत्रके न मागविता केल्यामुळे सदर प्रकरणातील खर्चास/खरेदीस कार्यात्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समितीकडे मंजूरीस्तव सादर.

निर्णयः- परिच्छेद क्र. 68, 105,106 व 107 अन्वये दरपत्रके न मागविता केलेल्या खर्चास/खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

220

स्वच्छता विभाग

ठराव क्र 134 दिनाक 24/07/2023

वाचावे - १. शासन निर्णय क्रं.एफएफसी २०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ दिनांक २८ ऑक्टो २०२०

२. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण-२०२१/प्र.क्रं.६४/ नवि-४ दि. १२ ऑक्टो २०२१

३ . विभाग प्रमुख स्वच्छता विभाग यांचा प्रस्ताव दिनांक ___.०५. २०२३

प्रशासकीय मंजुरीचे आदेश -

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिकेने , स्वच्छ भारत अभियान च्या सविस्तर प्रकल्प अहवाल DPR- 2018 अंतर्गत बायोगॅस 5 टन प्रतीदिन बायोगॅस प्रकल्प उभारणी करणे होते. परंतु लातूर शहर महानगरपालिकेच्या गरजे नुसार शहरातील ओल्या कचऱ्या पासून विकेन्द्रित पद्धतीने प्रक्रिया करणे करिता 3 तीन विकेन्द्रित बायोगॅस प्रकल्प उभारणी करिता महाराष्ट्र शासनाकडे दिनाक 10 जून 2021 रोजी व दिनाक 13 जुलै 2021 रोजी महानगर पालिका ठराव, जागा मालकीचे ८ अ आणि अंदाजपत्रकाचे २ प्रती संहित सुधारित प्रस्ताव राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना पाठविला होता. सदरील प्रस्तावा करिता महाराष्ट्र शासन निर्णय स्व- २०१८/ प्र क्र १७५/ न वि -३४ दिनाक ८ फेब्रुवरी २०२२ रोजी स्क्रॅप मार्केट , फ्रूट मार्केट आणि गांधी चौक येथे तीन विकेन्द्रित पद्धतीने प्रकल्प राबविन्य करिता मान्यता मिळाली.

वरील प्रकल्प करिता गांधी चौक स्क्रॅप मार्केट आणि फ्रूट मार्केट १ टन प्रतीदिन बायोगॅस करिता कार्यादेश जा.क्र./ला.श.म.न.पा./ पा.पू. / ५०१८ / २०२१-२२ , दिनाक ०८/०८/२०२३ रोजी सायुज्य ऊर्जा प्रा लि, नांदेड यांना देण्यात आले आहेत. या प्रकल्पा द्वारे वीज निर्मिती करून, प्रकल्पा लागटचे ग्रीन बेल्ट, दुकाने व परिसर प्रकाशित करून नागरिकांसाठी विकसित करणे प्रस्तावित आहे.

वरील प्रकल्पापैकी गांधी चौक येथी काम ९० % पूर्ण आहे, फ्रूट मार्केट येथील काम ३०% पूर्ण आहे. पण स्क्रॅप मार्केट येथील प्रकल्प उभारणी करिता दिनाक १६/ ०२/२०२३ रोजी परिसरातील स्थानिक रहिवासी कडून विरोध दर्शविला आहे.

वरवंटी डेपो येथील ५००० SQFT जागा लागणार असून उपलब्ध आहे. तरी सदरील प्रकल्प वरवंटी डेपो येथे स्थलांतरील करणे करिता मान्यतेस्तव.

निर्णय : वरवंटी डेपो येथील ५००० SQFT जागा लागणार असून उपलब्ध असल्याने बायोगॅस प्रकल्प स्थलांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

412

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक 135 **दिनांक** 3/8/२०२३

प्रस्तावः-

मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील स.नं.३१,३२,३३,३४,३५, व ३६ या जमीनीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम खेरदी च्या अनुषंगाने विचार विनयम करून निर्णय घेणे बाबत..

प्रादेशिक विकास योजना मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील सं.न.३१,३२,३३,३४,३५ व ३६ बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये श्री.नाहदी रियाज पटेल यांनी मा.अपर मुख्यसचिव महाराष्ट्र शासन यांच्याकडे खरेदी सुचना बजाविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने मा.अवर सचिव महराष्ट्र शासन,मुबई यांनी दि.२२/०२/२०२३ रोजी संचालक नगर रचना तथा सहसचिव यांचे दालन मधुन Video Conferencing व्दारे सुनावणी आयोजीत करण्यात आली होती. सदर प्रकरणी सुनावणी दरम्याने लातूर शहर महानगरपालिकेडून अहवाल सादर करणे बाबत सुचीत करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांनी दि.०५/०४/२०२३ रोजी सदर खरेदी सुचना अनुषंगाने आरक्षण प्रादेशिक योजनेमधील असले तरी ते लातूर महानगरपालिकासाठीच्या विद्यामान कचरा डेपोस विस्तार (Ext.to swmp) महानगरपालिकेसाठीच आहे.तसेच लातूर शहर महानगरपालिकेची लोकसंख्या व वाढीव विस्तार पाहता नियोजनाच्या दृष्टीने मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील व स.नं. ३१,३२,३३,३४,३५ व ३६ मधील प्रस्तावित आरक्षण (Ext.to swmp) लातूर शहर महानगरपालिकेस आवश्यकत असून महाराष्ट्र शासने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम१९६६ चे कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना फेटाळण्यात यावी असा प्रस्ताव सादर केलेला आहे.त्यानुसार संचालक,नगर रचना तथा सह सचिव नगर विकास विभाग यांनी मौजे वरवंटी ता.जि.लातूर प्रस्तावित आरक्षण (Ext.to swmp) याबाबत खालील प्रमाणे निर्णय पारित केली आहे.

" प्रस्तुत प्रकरणी मौजे वरवंटी ता.जि.लातूर प्रस्तावित आरक्षण (Ext.to swmp) आरक्षाणा बाबत विवेचनाचा विचार करता अर्जदार यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम१९६६चे कलम ४९(१) अन्वये गट नं ३१,३२,३३,३४,३५ व ३६ मधील १.७६ हे क्षेत्रावरील (Ext.to swmp) या आरक्षणानुषंगाने बजावलेली खंरेदीसूचना उक्त आरक्षणाच्या क्षेत्रापुरते उक्त अधिनियमाचे कलम १९(४) अन्वये कायम करण्यात येत आहे. "

414

Scanned with OKEN Scanner

(222)

करिता लातूर शहर महानगरपालिकेची हद्दीतील वाढती लोकसंख्या होणारा विकास विचारात घेता मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील व स.नं. ३१,३२,३३,३४,३५ व ३६ मधील प्रस्तावित आरक्षण (Ext.to swmp) मधील बाधित क्षेत्र १.७६ हे अरक्षाणसाठी भुसंपादन करणेसाठी व भुसंपादनाचा प्रास्तव सादर करणेसाठी विचार विनयम करून निर्णय घेणेस्तव सादर.

निर्णयः-

प्रादेशिक विकास योजना मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील सं.न.३१,३२,३३,३४,३५ व ३६ बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये श्री.नाहदी रियाज पटेल यांनी मा.अपर मुख्यसचिव महाराष्ट्र शासन यांच्याकडे खरेदी सुचना बजाविण्यात आली असून नोटीसीच्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेची होणारी हद्दवाढ व शहराचा झपाटयाने होणार विकास त्या अनुषंगाने वाढीती लोकसंख्या विचार घेता मौजे वरवंटी ता.जि.लातूर येथील सं.न.३१,३२,३३,३४,३५ व ३६ प्रस्तावित आरक्षण (Ext.to swmp) मधील बाधित क्षेत्र १.७६ हे. इतक्या क्षेत्राची महानगरपालिकेचा कचराडेपोचा विस्तार करणे आवश्यक करणे शक्य होणार आहे. त्यामुळे सदर खरेदीसुचना कायम करून मा.जिल्हाधिकारी प्राधिकारण भुसंपादन यांच्या प्रस्ताव सादर करावा करण्यात यावा.तसेच भुसंपादन करण्यासाठी लागणारा खर्च स्वतंत्र प्रयोजन करुन त्वरीत जमा करावा.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

415

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

मुख्य कार्यालय मेन रोड, टिळक नगर, लातूर

(सामान्य प्रशासन विभाग)

223

ठराव क्रं. 136 दिनांक 10/08/2023

विषय :- मानधनवरील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे मासिक मानधनात वाढ करणे बाबत.

प्रस्ताव :-

मानधनवरील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी, लातूर शहर महानगरपालिका,लातूर यांनी त्यांचे मासिक मानधनात वाढ करणे बाबत विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार संबधिताचे मागणीनुसार खालीलप्रमाणे सविस्तर तपशील सादर करण्यात येते कृपया अवलोकन व्हावे.

अ.क्र.	से.नि. मानधनवरील अधिकारी / कर्मचा-यांचे नाव	सध्याच्या पदावरील नियुक्त	अर्ज प्राप्त दिनांक	सध्या देण्यात येणारे मानधन	मागणी केलेले मानधन
१	डॉ. ए. एम. पठाण	पशुवैद्यकीय अधिकारी	२३/०२/२०२३	२२,०००/-	मानधन वाढविण्यासाठी विनंती केली आहे.
२	श्री. आशोक कोंडीबा येवरीकर	शाखा अभियंता (यांत्रिकी)	०३/०३/२०२३	३०,०००/-	४०,०००/-
३	श्री. दिलीप गोपाळराव डोईजोडे	शाखा अभियंता (स्थापत्य)	०८/०३/२०२३	३०,०००/-	४०,०००/-
४	श्री. पंचप्पा मलशेट्टी वाडीकर	प्रशासकीय सल्लागार	०८/०३/२०२३	१५,०००/-	२५,०००/-
५	श्री. भोसले ज्योतीराम मारुती	सुरक्षा रक्षक	१०/०४/२०२३	१२,०००/-	१५,०००/-
६	श्री. वाकडे जी. एस.	सहाय्यक लेखापरिक्षक	११/०४/२०२३	२०,०००/-	२५,०००/-
७	श्री. गणेश देवणीकर	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
८	श्री. चिद्रे प्रविण	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
९	श्री. प्रविण राजे	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१०	श्री. स्वामी वैभव	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
११	श्री. शेळके निखील	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१२	श्री. पठाण तबरेज	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१३	श्री. विजय बिडवे	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१४	श्रीमती. नौशाद शब्बीर शेख	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१५	श्री. रोहित पवार	कनिष्ठ अभियंता	११/०४/२०२३	२२,५००/-	३०,०००/-
१६	श्री. वाघमोडे दिलीप उत्तमराव	लिपीक	०१/०३/२०२३	८,०००/-	मानधन वाढविण्यासाठी विनंती केली आहे.
१७	श्री. स्वामी बस्वराज सिध्दय्या	वाहन चालक (अग्नीशमन विभाग)	२४/०४/२०२३	१०,०००/-	१५,०००/-

Scanned with OKEN Scanner

(224)

निर्णय :-

लातूर शहर महानगरपालिकेतील,मानधवरील सर्व कनिष्ठ अभियंता यांचा समावेशनाचा प्रस्ताव राज्यशासनाकडे पाठविला असल्यामुळे मानधन वाढीसाठी त्यांचा विचार करण्यात आला नाही. लातूर शहर महानगरपालिकेतील,मानधवरील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना खालीलप्रमाणे मानधनवाढ करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	से. नि. मानधनवरील अधिकारी/ कर्मचा-यांचे नाव	पदनाम	सध्या देण्यात येणारे मासिक मानधन	वाढीव मासिक मानधन
१	डॉ. ए. एम. पठाण	पशुवैद्यकीय अधिकारी	२२,०००/-	२७,०००/-
२	श्री आशोक कोंडीबा येवरीकर	शाखा अभियंता (यांत्रिकी)	३०,०००/-	४०,०००/-
३	श्री. दिलीप गोपाळराव डोईजोडे	शाखा अभियंता (स्थापत्य)	३०,०००/-	४०,०००/-
४	श्री पंचप्पा मलशेट्टी वाडीकर	प्रशासकीय सल्लागार	१५,०००/-	१८,०००/-
५	श्री. भोसले ज्योतीराम मारुती	सुरक्षा रक्षक	१२,०००/-	१५,०००/-
६	श्री. वाकडे जी. एस.	सहाय्यक लेखापरिक्षक	२०,०००/-	२५,०००/-
७	श्री. वाघमोडे दिलीप उत्तमराव	लिपीक	८,०००/-	११,०००/-
८	श्री. स्वामी बस्वराज सिध्दय्या	वाहन चालक (अग्नीशमन विभाग)	१०,०००/-	१३,०००/-

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

419

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 134 दिनांक- 11 / 08 / 2023

विषयः- ई-निवीदा क्र. 08/2023-2024 (E-Tender ID-2023_LMC_908833_1) अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना: मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांचे प्र.मा.आदेश क्र.2023/नपाप्र/प्रमा/नगरोत्थान/कावी-480 दि. 31.03.2023 अन्वये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतच्या खालील कामाची ई-निवीदा सुचना क्र.08/2023-2024 अन्वये रुपये- 81,40,598/- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता किंमत
1.	Development of B.T.road from Hotal shivaneri to kaveri hospital for M.C.Latur.	97,68,718/-

त्यानुसार सदर कामांसाठी ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर, गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर, ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर, एडीबी इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद हे 04 (चार) निवीदाधारक सहभागी झाले.

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र. 01 (कागदपत्र) दि.18/06/2023 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करुन निवीदा समितीने ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र केले आणि 1) गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर (2) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर (3)एडीबी इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद या तीन निविदाधारकांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन निवीदाधारकाकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक

1) गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.370/2023-24 दि.21/07/2023 अन्वये पत्र देऊन निवीदेतील अटी व शर्तीनुसार Scanned Copy of Valid Professional Tax Registration Certificate in the form of PTR and PTE under section (1) of section 5 of Maharashtra State Tax on Profession, Trade callings and Employment Act 1975, Rule 3 (2) for employees including technical personnel from the Professional Tax office of the concerned District of Maharashtra
कागदपत्र सादर केले नसल्याने आपण दि.25/07/2023 पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते .त्याअनुषंगाने निविदाधारक गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांनी दि.25/07/2023 रोजी लेखी पत्र देऊन पत्रासोबत सदर कागदपत्र सादर केले असल्याने त्यांना पात्र करण्यांत आले .

(2) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. 368/2023-24 दि.21/07/2023 अन्वये पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार खालील कागदपत्रे सादर केले नसल्याने आपण दि.25/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते.

A) Scanned from original / attested copy of affidavit in respect of geniuses of documents contained in the Envelope No.1 in the prescribed format given on Page No.39
B) Achieved a minimum annual financial turnover (in all classes of civil engineering construction works only) of **Rs.61.05** Lakhs at price level of 2022-23 in any one year of last Five years i.e., 2017-2018, 2018-2019, 2019-2020, 2020-2021, 2021-2022. (Information to be given only in proforma of Statement No. V on page No.37). Above turnover should be certified by the registered Chartered Accountant.
C) Satisfactorily completed as contractor, during last five years. (It should have been commissioned and completed during last five years i.e.,2017-2018, 2018-2019, 2019-2020, 2020-2021, 2021-2022 of at least:
   i. Three similar works each having minimum estimated cost of **Rs.32.41** Lakhs at price level 2022-23 **or**

Scanned with OKEN Scanner

(226)

ii. Two similar works each having minimum estimated cost of **Rs.40.70** Lakhs at price level 2022-23 **or**

iii. One similar work of value not less than **Rs.65.12** at price level 2022-23.

D) Satisfactorily executed in any One Year of last seven years i.e., i.e. 2015-2016, 2016-2017, 2017-2018, 2018-2019, 2019-2020, 2020-2021, 2021-2022 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38)

i. Grade II 367.50
ii. Wet Mix Macadam 337.50
iii. Dense Bituminous Macadam 110.25
iv. Bituminous Macadam 10.62
V. Bituminous Concrete 138.78

E) List of Machinery and plants immediately available with the tenderer

i. SCADA enabled Drum Mix Hot Mix Plant Having Capacity 30 to 40 Tonnes Per Hour of any standard company
ii. Paver Finisher with SCADA
iii. Mechanical Bitumen Sprayer
iv Hydraulic Broom
v Vibratory Roller for WBM/WMM Work
vi Vibratory Roller for Bituminous Work
vii Static Smooth Wheel Roller
viii Bouzer 10 MT capacity
ix Truck / Tipper
x Excavator / JCB

F) Necessary certificate of Sr. No. a to e

परंतू निवीदाधारक ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी कागदपत्रे सादर न केलेने त्यांना अपात्र करण्यांत आले.

(3) एडीबी इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद यांना कार्यालयीन पत्र क्र. 369/2023-24 दि.21/07/2023 अन्वये पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार खालील कागदपत्रे सादर केले नसल्याने दि.25/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते.

A) Scanned Copy of Details of other works tendered for and in hand with the value of work unfinished on the last date of submission of tender (In the proforma of Statement No. I on Page No.31.
B) Scanned Copy of the List of owned Machinery immediately available with the tenderer for use on this work. (In the proforma of Statement No. II and 2(A) on Page No.32 and 33).
C) Scanned from original / attested copy of Details of work of similar type and magnitude carried out by the contractor during last five years i.e., 2017-2018, 2018-2019, 2019-2020, 2020-2021, 2021-2022 (In the proforma of Statement No. III, Page No.35)
D) Scanned Copy of Details of Technical personnel on the rolls of the tenderers. (In the proforma of Statement No. IV on Page No.36)
E) Scanned from original / attested copy of affidavit in respect of geniuses of documents contained in the Envelope No.1 in the prescribed format given on Page No.39
F) List of Machinery and plants immediately available with the tenderer (Statement-2 A) Hydraulic Broom, Static Smooth Wheel Roller, Bouzer 10 MT capacity
G) Plant / SCADA system supervisor
H) Bid Capacity Not Up to Date
I) Necessary certificate of Sr. No. a to e
J) Scanned from original / attested copy of Employee Provident Certificate & Last 3 Months Returns / Challan
K) Achieved a minimum annual financial turnover (in all classes of civil engineering construction works only) of Rs.61.05 Lakhs at price level of 2022-23 in any one year of last Five years i.e., 2017-2018, 2018-2019, 2019-2020, 2020-2021, 2021-2022. (Information to be given only in proforma of Statement No. V on page No.37). Above turnover should be certified by the registered Chartered Accountant.
L) Scanned Copy of Valid Professional Tax Registration Certificate in the form of PTR and PTE under section (1) of section 5 of Maharashtra State Tax on Profession, Trade callings and Employment Act 1975, Rule 3 (2) for employees including technical personnel from the Professional Tax office of the concerned District of Maharashtra

त्यानुषंगाने निवीदाधारक एडीबी इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद यांनी दि.25/07/2023 रोजी लेखी पत्र देऊन पत्रासोबत सदर कागदपत्रे सादर केली आहेत. परंतु त्यांचे EPF चे ऑनलाईन तपासणी केली असता ते दिसून येत नाही त्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले आहे.

424

Scanned with OKEN Scanner

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (1) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर व (2) गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 02/08/2023 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	निवीदाधारकाचे नाव	निवीदेत दिलेले दर
1.	**ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर**	**अंदाजपत्रक दर**
2.	गोरे इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% अधिक

सदर कामासाठीचे न्युनतम (L1) निवीदाधारक **ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर** यांची अंदाजपत्रक दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

निर्णयः- Development of B.T.road from Hotal shivaneri to kaveri hospital for M.C.Latur. E-Tender ID-2023_LMC_908833_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा **ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर** यांची अंदाजपत्रक दराची असल्याने निवीदाकार **ए.आर. कन्स्ट्रक्शन, लातूर** यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते व अंदाजपत्रकामधील बाबीमध्ये होणा-या वाढ / घट व Extra Item ला मान्यता देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

425

Scanned with OKEN Scanner

(228)

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 138 दिनांक- 11 / 08 / 2023

विषयः- ई-निवीदा क्र. 08/2023-2024 (E-Tender ID-2023_LMC_908823_1) अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना: मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे प्र.मा.आदेश क्र.2023/नपाप्र/प्रमा/नगरोत्थान/कावी-480 दि. 31.03.2023 अन्वये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतच्या खालील कामाची ई-निवीदा सुचना क्र.08/2023-2024 अन्वये रुपये- 41,66,358/- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता किंमत
1.	Development of road & drain at Tuljabhavani nagar for M.C.Latur.	49,99,630/-

त्यानुसार सदर कामांसाठी शुभम मोहनराव जाधव,लातूर, नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि.लातूर, सागर प्रताप बिराजदार,लातूर, मस्के इन्फ्रास्ट्रक्चर,बीड, एन.एस.कन्स्ट्रक्शन,लातूर, मे.एस.एन.खतीब अँड कं.निलंगा, नुर कन्स्ट्रक्शन,लातूर हे 07 निवीदाधारक सहभागी झाले.

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र. 01 (कागदपत्र) दि.13/06/2023 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करुन निवीदा समितीने सागर प्रताप बिराजदार,लातूर आणि नुर कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र केले आणि 1) शुभम मोहनराव जाधव, लातूर, 2) नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा. लि. लातूर 3) मस्के इन्फ्रास्ट्रक्चर,बीड, 4) एन. एस. कन्स्ट्रक्शन,लातूर 5) मे.एस.एन.खतीब अँड कं.निलंगा या पाच निविदाधारकांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन निवीदाधारकाकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक

1) शुभम मोहनराव जाधव, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.4343/2023 दि.18/07/2023 अन्वये पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार व्यवसायकर नादेय प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपण दि.21/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्या अनुषंगाने निविदाधारक शुभम मोहनराव जाधव यांनी मार्च 2024 पर्यंतचे व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र दि.19/07/2023 रोजी सादर केले आहे. त्यांचे कागदपत्रांची छाननी केली असता बॅलन्सशीट आणि टर्नओव्हर मध्ये आयटीआर प्रमाणे तफावत दिसून येत आहे. तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ऑनलाईन तपासले असता त्यामध्ये अनियमितता आहे. सुशिक्षीत बेरोजगार अभियंताची नोंदणी असल्याने अधिकार पत्र मान्य करता येत नाही. त्यामुळे त्यांना अपात्र करणे योग्य.

2) नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि.,लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.4349/2023 दि.18/07/2023 अन्वये पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार बिड कॅपॅसीटीचे सी चे.ए.UDIN असलेले प्रमाणपत्र, व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र, ईपीएफचे माहे एप्रिल 2023 चलन सादर केले नसल्याने आपण दि.21/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्या अनुषंगाने नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि.,लातूर यांनी बिड कॅपॅसीटीचे सी.ए.चे UDIN असलेले प्रमाणपत्र, व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र, ईपीएफचे माहे मे 2023 चे चलन दि.21/07/2023 रोजी सादर केले आहे. त्यामुळे त्यांना पात्र करणे योग्य.

Scanned with OKEN Scanner

3) मस्के इन्फ्रास्ट्रक्चर, बीड यांना कार्यालयीन पत्र क्र.4351/2023 दि.18/07/2023 अन्वये पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार बीड कॅपॅसीटीचे प्रमाणपत्र, ईपीएफचे एप्रिल 2023 चे चलन, व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपण दि.21/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्या अनुषंगाने मस्के इन्फ्रास्ट्रक्चर, बीड यांनी सी.ए.चे UDIN असलेले बीड कॅपॅसीटीचे प्रमाणपत्र, ईपीएफ चे एप्रिल 2023 चे चलन, व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र दि.20/07/2023 रोजी सादर केले आहे. त्यामुळे त्यांना पात्र करणे योग्य.

4) एन.एस.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.4348/2023 दि.18/07/2023 अन्वये पत्र देऊन निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफचे एप्रिल 2023 चे चलन सादर केले नसल्याने आपण दि.21/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. परंतु एन.एस.कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी कागदपत्र सादर केलेले नाहीत त्यामुळे त्यांना अपात्र करणे योग्य.

5) मे.एस.एन.खतीब अँड कं.,निलंगा यांना कार्यालयीन पत्र क्र.4350/2023 दि.18/07/2023 अन्वये पत्र देऊन निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफचे एप्रिल 2023 चे चलन, UDIN असलेले बीड कॅपॅसीटीचे प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपण दि.21/07/2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. परंतु मे.एस.एन.खतीब अँड कं.,निलंगा यांनी कागदपत्र सादर केलेले नाहीत त्यामुळे त्यांना अपात्र करणे योग्य.

तसेच यापुर्वी पात्र ठरलेले सागर प्रताप बिराजदार, लातूर यांचे बॅलन्सशीट आणि टर्नओव्हर मध्ये आयटीआर प्रमाणे तफावत आहे. त्यामुळे बिड कॅपॅसीटी चुकीची दिसून येत आहे. तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ऑनलाईन तपासले असता त्यामध्ये अनियमितता दिसून येते. त्यामुळे त्यांना अपात्र करणे योग्य.

तसेच यापुर्वी पात्र ठरलेले नूर कन्स्ट्रक्शन, लातूर यांचे बिड कॅपॅसीटी मध्ये वर्क इन हँड ची रक्कम चुकीची सादर केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना अपात्र करणे योग्य.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक 1) नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि.,लातूर 2) मस्के इन्फ्रास्ट्रक्चर, बीड यांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 10/08/2023 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	निवीदाधारकाचे नाव	निवीदेत दिलेले दर
1.	**नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि., लातूर**	**अंदाजपत्रक दर**
2.	मस्के इन्फ्रास्ट्रक्चर, बीड	अंदाजपत्रक दरापेक्षा 2.11% अधिक

सदर कामासाठीचे न्युनतम दराचे (L1) निवीदाधारक **नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि.,लातूर** यांची अंदाजपत्रक दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर तसेच अंदाजपत्रकामधील बाबीमध्ये होणा-या वाढ / घट व Extra Item ला मान्यता देणेस्तव सादर.

निर्णयः- Development of road & drain at Tuljabhavani nagar for M.C.Latur. E-Tender ID-2023_LMC_908823_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा **नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि., लातूर** यांची अंदाजपत्रक दराची असल्याने निवीदाकार **नमोतिरुपती बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि., लातूर** यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते व अंदाजपत्रकामधील बाबीमध्ये होणा-या वाढ / घट व Extra Item ला मान्यता देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक 139 **दिनांक** 17/08/२०२३

प्रस्तावः-

लातूर शहर म.न.पा. हद्दीतील सि.टी.एस.नं. ४५८०मधिल जुने न्यायालय येथील बाजूने जाणारा सार्वजनीक रस्ता हा रस्त्यांची रूंदीकरण करून १५ मी रूंद करण्यासाठी जागा संपादन करणे बाबतच्या ठराव क्र.६५ दि.०५/०१/२०२३ रोजीच्या ठरावामधील जुने शासकीय विश्राम गृहाच्या पश्चिमेकडील ऐवजी पुर्वीकडील करून दुरूस्ती करून सुधारीत ठराव घेणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील सि.टी.एस.नं ४५८० मधिल जुने न्यायालय येथील बाजून जाणा-या सार्वजनिक रस्ताजवळ अशोक हॉटेल येथे ट्रफीक सिग्नल असून त्या ठिकाणी सदरचा रस्ता लहान असल्यामुळे येथे वारंवार वाहतुक कोंड होण्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे जुने शासकीय विश्राम गृह येथील सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून रहदारी करीता उपयुक्त ठरणार आहे. त्याअनुषंगाने जुने शासकीय विश्राम गृहाच्या पुर्वीकडील विद्यमान ७ मी रूंद रस्ता रूंदीकरण करून १५ मी करणे करिता महानगरपालिका अधिनयम १९४९ चे कलम २०५ व २०६ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२५ व भूमीसंपादन,पुनर्वसन पुनर्वसाहत करता उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये विद्यामान ७ मी रूंद सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून १५ मी रूंद करणाच्या अनुषंगाने जमीन संपादन करण्यासाठी करून विचार विनियम करून निर्णय घेणेस्तव सादर.

निर्णयः-लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दतील सि.टी.एस.नं ४५८० मधिल जुने न्यायालय येथील बाजून जाणा-या सार्वजनिक रस्ताजवळ अशोक हॉटेल येथे ट्रफीक सिग्नल असून त्या ठिकाणी सदरचा रस्ता लहान असल्यामुळे येथे वारंवार वाहतुक कोंड होण्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे जुने शासकीय विश्राम गृह येथील सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून रहदारी करीता १५ मी रस्ता करता यावे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र

Scanned with OKEN Scanner

(231)

निर्णय:-महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ च्या अधिसुचना प्रसिध्द झाल्यानुसार ३१ डिसेंबर २०२० पुर्वी अस्तीत्वात आलेले / हस्तांतरीत झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करणेसाठी चालु असून त्या करिता मागील तत्कालीन मा.सर्वसाधरण सभा ठाराव क्र.२१५ अन्वये दि.२८/०२/२०२२ रोजी फक्त सहा महिन्याची मुद्दवाढ देण्यात आली होती. तद्नंतर ठराव क्रं.३३ दि.३०/०८/२०२२ अन्वये एक वर्षा पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती ती मुद्दतवाढ २८/०८/२०२३ संपुष्टात येणार आहे. तरी सध्या स्थितीत अधिनियमतील कलम ४(१) नुसार आज रोजी सुध्दा गुंठेवारीचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

त्या कारणाने लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.३१ डिसेंबर २०२० च्या पुर्वी अस्तीत्वात आलेले हस्तांतरीत, झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणेस्तव ३१ ऑक्टोंबर २०२३ पर्यंत अंतीम मुदतवाढ देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

544

Scanned with OKEN Scanner

(289)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 150 दिनांक 10/10/2023

विषय :- ई-निविदा क्र. 27/2023-24 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत Proposed Construction of Samaj Mandir at P.No. 14 Goutam Nagar (Khani Area) at Latur, Proposed construction & Development of Pratmik Arogya Kendra at Gautam Nagr, Proposed construction & development of Gayatri Nagar Sabhagrah & Proposed construction for Extention of Mahamaya Boudh Vihar in P.No. 18 for M.C. Latur. Tender ID 2023_LMC_933432_2 या कामासाठी ई-निविदा क्र. 27/2023-24 अन्वये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेची अंदाजपत्रकीय किंमत रु. 2,92,05,810/- आहे. त्यानुसार सदर कामासाठी खालील 04 (चार) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर.
2) श्री. संजय पंडीतराव पाटील
3) ए.के. कन्स्ट्रक्शन, लातूर.
4) रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर.

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्र. 1 (Technical Bid) दि. 23/08/2023 रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करुन सर्व निविदाधारक यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली नसल्याने अपुर्ण कागदपत्र सादर करणेबाबत साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांना पत्र क्र. 6015 दि. 18/09/2023 रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर यांना पत्र क्र. 6014 दि. 18/09/2023 संजय पंडीतराव पाटील यांना पत्र क्र. 6016 दि. 18/09/2023 मे. ए.के. कन्स्ट्रक्शन यांना पत्र क्र. 6017 दि. 18/09/2023 अन्वये लेखी सुचना देऊन व ई-मेलद्वारेही पत्र पाठवून अपुर्ण कागदपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त चार निविदाधारकांपैकी साईप्रेम कन्स्ट्रक्शन व संजय पंडीतराव पाटील यांनी त्यांना कळविल्यानुसार अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता केल्याने त्यांना पात्र करण्यात आले व रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, मे. ए.के. कन्स्ट्रक्शन यांनी कोणतेही कागदपत्र सादर केलेली नसल्याने त्यांना अपात्र करण्यात आले.

त्याअनुषंगाने निविदेचा पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. 02 (देकारपत्रक) दि. 26/09/2023 रोजी उघडण्यात आला. निविदाधारक यांनी सदर कामासाठी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	दिलेले दर
1	साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर.	अंदाजपत्रक दर
2	श्री. संजय पंडीतराव पाटील	अंदाजपत्रक दरापेक्षा 5.000% अधिक

सदर कामासाठी न्युनतम L1 निविदाधारक साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर यांची निविदा अंदाजपत्रक दराने असल्याने साईप्रेम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराची निविदा मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत Proposed Construction of Samaj Mandir at P.No. 14 Goutam Nagar (Khani Area) at Latur, Proposed construction & Development of Pratmik Arogya Kendra at Gautam Nagr, Proposed construction & development of Gayatri Nagar Sabhagrah & Proposed construction for Extention of Mahamaya Boudh Vihar in P.No. 18 for M.C. Latur. Tender ID 2023_LMC_933432_2 या कामासाठी ई-निविदा क्र. 27/2023-24 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर यांची अंदाजपत्रक दराने आहे. निविदाकार साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी निविदेत सादर केलेल्या अंदाजपत्रक दरास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

546

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

290

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 151 दिनांक 10/10/२०२३

विषय :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत प्रकल्प हाती घेणेस मंजूरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना –</u> लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील गांधी चौक ते म.न.पा. हद्द निक्की हॉटेल पर्यंत मुख्य रस्त्याला समांतर असलेल्या लोकनेते विलासराव देशमुख मार्गाचे राजस्थान हायस्कुल ते शिवाजी चौक या टप्प्याचे विकसित करण्याचे काम जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त निधीतून चालू आहे. उर्वरीत शिवाजी चौक ते निक्की हॉटेल पर्यंतचा मार्ग विकसित करणेसाठी रु. १२४.९५ कोटी अंदाजीत खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. तसेच छत्रपती चौक ते कव्हा तलाव पर्यंत हेरीटेज रस्ता विकसीत करणेचा रु. ६०.०१ कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर दोनही प्रकल्पांची एकूण किंमत १८४.९६ कोटी होत आहे. सदर दोनही प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत हाती घेणेसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार ३०%. म.न.पा. हिस्सा १५ वा वित्त आयोगाचे प्राप्त होणारे निधीतून अथवा मुन्फ्रा मार्फत कर्ज उभारुन भरणा करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय किंमत
१	लोकनेते विलासराव देशमुख मार्ग (व्ही.डी.एम. रोड) शिवाजी चौक ते निक्की हॉटेल विकसीत करणे.	१,२४,९५,४१,०४३.००
२	छत्रपती चौक ते कव्हा तलाव पर्यंत हेरीटेज रस्ता विकसीत करणे.	६०,०१,३४,६२५.००
	एकूण रुपये	१,८४,९६,७५,६६८.००

तरी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास कामांचे प्रकल्प अहवाल महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास व सदर योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्पांचा ३०%. म.न.पा. हिस्सा १५ वा वित्त आयोगाचे प्राप्त होणारे निधीतून अथवा मुन्फ्रा मार्फत कर्ज उभारुन भरणा करणेस याद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

5748

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

(291)

ठराव क्रमांक - 152 दि. 19/10/2023

विषय – लातूर शहरातील विंधन विहीरीवरील मिनीवॉटर सप्लाय पाईप लाईन करणे व लिकेजस काढणे,स्टॅन्ड पोस्ट दुरुस्ती करणे ,तोटया बसविणे व इतर नविन साहित्य वापरून वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.

प्रस्ताव

लातूर शहरातील विंधन विहीरीवरील मिनीवॉटर सप्लाय पाईप लाईन करणे व लिकेजस काढणे,स्टॅन्ड पोस्ट दुरुस्ती करणे,तोटया बसविणे व इतर नविन साहित्य वापरून वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेसाठीच्या बाबीचे दर ई-निविदा सुचना क्र 03/2023-24 निविदा आयडी क्र.2023_LMC_934571_1 मागविण्यात आली होती निविदा बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. ई-निविदा दि.11.08.2023 पासून ते 18.08.2023 पर्यंत मागवणेत आले.
2. ई-निविदा उघडणेचा दिनांक 21.08.2023

वरील कामाचे ई-निविदा दिनांक 21.08.2023 रोजी उघडण्यात आले,त्यामध्ये एकुण चार निविदा प्राप्त झाले. त्यापैकी चारही निविदा पात्र आहेत. 1) मे.लहाने कन्स्ट्रक्शन प्रा.लि.लातूर 2) नागनाथ सखाराम कांबळे,लातूर 3) पुजा कन्स्ट्रकशन,लातूर 4) मे.स्वामी एन्टरप्रायझेस,लातूर या चारही पात्र निविदाचा आर्थिक लिफाफा दिनांक 01.09.2023 रोजी उघडण्यात आला आहे. एकुण 1 ते 56 ऍटमचे निविदा धारकांनी दिलेले दरापैकी सर्वात कमीचे दर वेगळे काढण्यात आले आहे व संबंधित निविदाधारकांसोबत दर वाटाघाटी करण्यात आले. वाटाघाटी अंती मे.स्वामी एन्टरप्रायझेस,लातूर यांचे दर मंजुरीप्रमाणे निविदा अट क्र.20 नुसार उर्वरीत तीन निविदाधारकापैकी 1) नागनाथ सखाराम कांबळे,लातूर 2) मे.लहाने कस्ट्रक्शन प्रा.लि. लातूर या दोन निविदाधारकांनी मंजुर दराने काम करणेस लेखी सहमती दर्शवलेली आहे. सदरील सर्वात कमीचे मंजुर झालेले दर तक्ता मधील रकाना नं.11 मध्ये दर्शविण्यात आले आहे.

निर्णय

लातूर शहरातील विंधन विहीरीवरील मिनीवॉटर सप्लाय पाईप लाईन करणे व लिकेजस काढणे,स्टॅन्ड पोस्ट दुरुस्ती करणे,तोटया बसविणे व इतर नविन साहित्य वापरून वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे च्या कामासाठी स्वामी एन्टरप्रायझेस,लातूर यांचे सर्वांत कमीचे दर असुन त्यांच्या मंजुर दराप्रमाणे काम करणेस अट क्र.20 अन्वये नागनाथ सखाराम कांबळे,लातूर व मे.लहाने कन्स्ट्रक्शन प्रा.लि.लातूर यांनी सहमती दर्शविलेली आहे.तरी तिन्ही निविदाधारकाचे सर्वात कमीचे दर मंजुर करण्यात येत असुन तिन्ही निविदाधारकांना कामाचे आदेश देण्यात यावे.सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

550

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक 153 दिनांक 27/10/2023

प्रशासकीय ठराव:-

विषय:- लातूर शहर महानगरपालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करणे
(लातूर शहर महानगरपालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) व कलम ३८ अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी नियुक्त करणे)

संदर्भ:- 1) मा.आयुक्त यांचे दालनात दि.०६/०९/२०२३ रोजी घेण्यात आलेली बैठक.
2)लातूर शहर महानगरपालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करणे बाबतचा दि.१९/१०/२०२३ रोजीचा मान्य झालेला प्रस्ताव.

प्रस्ताव:- लातूर शहर महानगरपालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करणे बाबतचा दि.१९/१०/२०२३ रोजीचा मान्य झालेला प्रस्ताव.
(लातूर शहर महानगरपालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) व कलम ३८ अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी नियुक्त करणे)

निर्णय:-

लातूर शहर महानगरपालिकेची स्थापना दि.२५/१०/२०११ रोजी झाली असून , लातूर शहर महानगरपालिका हद्दीची विकास योजना शासन अधिसुचना टी.पी.एस/३७००/४७१/सी.आर-१५३(A)/२०००/युडी-३ दिनांक ०२/०१/२००२ रोजी मंजूर करण्यात आली आहे. तसेच विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्रासाठी (Excluded Part) शासन निर्णय क्र टी.पी.एस/३७१४/६२३/सी.आर-१७१(A)२०१४/युडी-३ दिनांक ३१/०८/२०१५अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या विद्यमान विकास योजनेचा कालावधी सन २०२२ मध्ये संपुष्टात आला आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्याकरीता महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) व कलम ३८ अन्वये विकास योजना सुधारीत करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर विकास योजना महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. टी.पी.एस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/०१/२०१९ व दिनांक १७/०६/२०१९ रोजीच्या शुद्धीपत्रकातील निर्देशानुसार भौगोलीक माहिती प्रणालीद्वारे (GIS BASED) तयार करणे आवश्यक आहे.

553

Scanned with OKEN Scanner

(283)

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६चे कलम २३(२) नुसार लातूर महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व आयुक्त, महानगरपालिका लातूर यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, लातूर शहर महानगरपालिकेच्या कार्यालयात,कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध राहील.

विकास योजना तयार करण्याचा महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेद्वारे प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांपेक्षा कमी नाही अशा कालावधीत प्राप्त होणा-या नागरीकांच्या सुचना/हरकतींचा विचार विकास योजना तयार करतांना करणे आवश्यक राहील.

तसेच लातूर शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करण्यासाठी व सदर क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून महानगरपालिकेकडे सादर करण्याकरीता, त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व विकास योजना संबंधी इतर सर्व कामे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये सहायक संचालक नगर रचना शाखा कार्यालय लातूर यांची "नगर रचना अधिकारी" म्हणुन नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येते.सदर "नगर रचना अधिकारी" यांच्या नेमणूकीस मा.सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, छत्रपती संभाजीनगर यांची पुर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यांनी मंजूरी दिल्यानंतर "नगर रचना अधिकारी" यांच्या नियुक्तीचे औपचारीक आदेश आयुक्त, लातूर शहर मनपा, लातूर यांनी पारीत करणे आवश्यक राहील.

करिता लातूर शहर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्रासाठी

१. संपुर्ण क्षेत्रासाठी भौगोलिक माहिती प्रणालीवर(GIS BASED) आधारीत विकास योजना नकाशे बनविणे.
२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) व कलम ३८ अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे.
३. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये सहायक संचालक नगररचना, शाखा कार्यालय लातूर यांची "नगर रचना अधिकारी" म्हणुन नेमणुक करणे.

यास मान्यता देण्यात येते.

विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना देण्यात येत आहेत. तद्संबंधी लागणा-या सर्व खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. करीता वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

554

Scanned with OKEN Scanner

(296)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रः- 154 दि. 8/11/2023

विषयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर कार्यालयातील रेकॉड विभागात अभीलेख वर्गीकरण स्कॅनिंग आणि डिजीटीलायझेशज करणे बाबत.

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर कार्यालयातील रेकॉड विभागातील अभीलेखे अ ब क ड वर्गाची असून अंदाजीत एक लक्ष संचिका विभागात असून आपल्या रेकॉड विभागातील कामकाजा मध्ये सुसञता आण्यासाठी तसेच अभीलेखे सुरक्षित जतन करण्यासाठी अ ब क ड श्रेणी मध्ये वर्गीकरण करून स्कॅनिंग आणि डीजीटलायझेशन करणे व दस्ताऐवज व्यवस्थापन संगणक प्रणाली विकसीत करणे क्रमप्राप्त ठरले असून सदरील कामा करिता अंदाजित खर्च हा 1 कोटी 20 लाख रू. अपेक्षीत असून सदरील काम हे शासन निर्णय क्र.अमृत-2017/प्र.क्र.28/नवि-33 दि.25/01/2017 अन्वये निर्णय अनु.क्र. 3.2 नुसार अनुदान अमृत प्रोत्साहन या योजने मधुन होणे अनुज्ञेय असून सदरील कामा करिता ई-निविदा करणे तसेच सदरील कामासाठी लागणा-या खर्चास व प्रशासकीय ठरावास मान्यता प्रदान करण्या बाबत निर्णय घेणे करिता प्रस्ताव सादर.

निर्णयः- प्रस्तावा प्रमाणे अमृत प्रोत्साहन शासन निर्णय अनु.क्र. 3.2 या योजने मधून वरील खर्चास तसेच सदरील ई निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मान्यता देण्यात आली

नगर सचिव
लातूर शहरमहानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहरमहानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रः- 155 दि. 8/11/2023

विषयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर कार्यालयातील रेकॉड विभागात अभीलेख वर्गीकरण स्कॅनिंग आणि डिजीटीलायझेशन करणे बाबत.

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर कार्यालयातील रेकॉड विभागातील अभीलेखे अ ब क ड वर्गाची असून अंदाजीत एक लक्ष संचिका विभागात असून आपल्या रेकॉड विभागातील कामकाजा मध्ये सुसञता आण्यासाठी तसेच अभीलेखे सुरक्षित जतन करण्यासाठी अ ब क ड श्रेणी मध्ये वर्गीकरण करून स्कॅनिंग आणि डीजीटलायझेशन करणे व दस्ताऐवज व्यवस्थापन संगणक प्रणाली विकसीत करणे क्रमप्राप्त ठरले असून सदरील कामा करिता अंदाजित खर्च हा 1 कोटी 20 लाख रू. अपेक्षीत असून सदरील काम हे शासन निर्णय क्र.अमृत-2017/प्र.क्र.28/नवि-33 दि.25/01/2017 अन्वये निर्णय अनु.क्र. 3.2 नुसार अनुदान अमृत प्रोत्साहन या योजने मधुन होणे अनुज्ञेय असून सदरील कामा करिता ई-निविदा करण्यात येवुन 6 निविदा धारकांनी भाग घेतला यात L 1 इ क्यु एल बिजनेस सोलुशन पुणे यांचे दर अंतिम ठरले असुन त्यांचे दरास मान्यतेस्तव सादर.

Particular	A4 Rs.1 page	A3 Rs.1 page	A2 Rs.1 page	A1 Rs.1 page	A0 Rs.1 page
Rate	1.50	2.20	4.00	4.50	6.00
JPEG & au image format to pdf size redudeable conversion	Q c Rs image	Data entre yrs record	DMS software Ls	Classification Rs.Record Bundle	Racks Rs / unit
Rs.image 0.50	0.50	1.50	90,000	100.00	8000

निर्णयः- प्रस्तावा प्रमाणे अमृत प्रोत्साहन शासन निर्णय अनु.क्र. 3.2 या योजने मधून वरील खर्चास तसेच सदरील ई निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येवुन L 1 धारक इ क्यु एल बिझनेस सोल्युशनस पुणे यांचे दरास मान्यता देण्यात आली.

नगर सचिव
लातूर शहरमहानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहरमहानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 156 दि. 9 /11 / 2023

विषय - लातूर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत हरंगुळ व आर्वी जलशुध्दिकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणेसाठी वार्षिक दर निविदा मंजुरी बाबत.

प्रस्ताव

लातूर शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत हरंगुळ व आर्वी जलशुध्दिकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणेचे सन 2023-24 वार्षिक दर ई-निविदा सुचना क्र.06/2023-24 निविदा आयडी क्र.2023_LMC_940588_1 अन्वये मागविण्यात आले. निविदा बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. निविदा मागविलेला कालावधी दि.01.09.2023 ते 07.09.2023 मागवणेत आले.बीड रिपोर्ट अन्वये मुदतीत केवळ दोनच निविदा प्राप्त झाल्याने मुदतवाढ कालावधी 07.09.223 ते 11.09.2023. निविदा उघडण्याचा दि.12.09.2023
2. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बीड रिपोर्ट वरून निदर्शनास आलेनुसार 13.09.2023 रोजी निविदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला.तीन निविदाधारकाचे कागदपत्राची छाननी अंती तीन्ही निविदा वैध असल्याने निविदाचा आर्थिक लिफाफा दि.25.09.2023 रोजी उघण्यात आला.
3. प्राप्त निविदा दराबाबतची माहिती खालील विवरणामध्ये सादर करण्यात येत आहे.

अ.क्र	निविदाधारकाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	मे.स्वामी समर्थ केमीकल्स, चाकूर	42,95,388/-	1.10% कमीने रक्कम रू.42,48,138.73
2	मे.महाराष्ट्र केमीकल्स अॅन्ड जनरल सप्लायर्स,नांदेड		1.50% कमीने रक्कम रू.42,30,957.18
3	मे.राजप्रेम डिस्ट्रिब्युटर्स,सोलापूर		5% कमीने रक्कम रू.40,80,618.60

वरील प्रमाणे तीन निविदाधारकाचे दर प्राप्त झाले असुन निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर **मे. राजप्रेम डिस्ट्रिब्युटर्स,सोलापूर** यांचे अंदाजपत्रक रक्कम रू.42,95,388/- पेक्षा 5% कमीने म्हणजे 40,80,618.60 रूपये आहे.

निर्णय –

लातूर शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत हरंगुळ व आर्वी जलशुध्दिकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड-1 पुरवठा करणेच्या कामासाठी **मे.राजप्रेम डिस्ट्रिब्युटर्स,सोलापूर** यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.42,95,388/- पेक्षा 5% कमीच्या दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 157 दिनांक- 20/11/2023

विषय:- ई-निवीदा क्र. ०८/२०२३-२४ अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना- मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांचे प्र.मा.आदेश क्र.२०२३/नपाप्र/प्रमा/नगरोत्थान/कावी-४८० दि. ३१/०३/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजना (जिल्हास्तर) अंतर्गतच्या एकुण ११३ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यामधील ई-निवीदा सुचना क्र.०८/२०२३-२४ अन्वये खालील कामांची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्र.मा.किंमत
१	प्रभाग क्र.०१ मध्ये रोकडया हनुमान मंदिर ते नांदगाव वेस स्मशानभुमी ते रिंगरोड पर्यंत रस्ता करणे	४९,९९,६७४.००
२	नांदगाव वेस स्मशानभुमी विकसीत करणे	४९,९९,६३३.००

त्यानुसार प्रभाग क्र.०१ मध्ये रोकडया हनुमान मंदिर ते नांदगाव वेस स्मशानभुमी ते रिंगरोड पर्यंत रस्ता करणे या कामासाठी खालील ०६ (सहा) निवीदाधारक सहभागी झाले होते.

१) शुभम मोहनरराव जाधव, लातूर
२) टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि.,लातूर
३) शिगे कन्स्ट्रक्शन, निलंगा
४) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर
५) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर
६) नुर कन्स्ट्रक्शन, लातूर

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.०१ (कागदपत्र) दि.१३/०६/२०२३ रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने १) शुभम मोहनरराव जाधव, लातूर २) शिगे कन्स्ट्रक्शन,निलंगा ३) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर ४) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन चारही निवीदाधारकाकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक (१) शुभम मोहनरराव जाधव, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४३ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार मार्च २०२४ चे व्यवसायकर नादेय प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र दि.१९/०७/२०२३ रोजी सादर केले आहे. २) शिगे कन्स्ट्रक्शन, निलंगा यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४२/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार सा.बांधकाम विभागाकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्राचे नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र, ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत. ३) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४१/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन

Scanned with OKEN Scanner

(298) सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत. ४) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४०/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन तसेच बिड कॅपॅसिटीचे UIDN सह सी.ए.चे प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (१) शुभम मोहनरराव जाधव, लातूर (२) टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि.,लातूर (३) नुर कन्स्ट्रक्शन, लातूर यांचा लिफाफा क्र.०२ (देकारपत्रक) दिनांक- ०९/१०/२०२३ रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

कामाचे नावः Construction of c.c.road from rokadya hanuman mandir to nandgaon ves smashanbhumi to ring road in prabhag no.1 for M.C.Latur. Rs.41,66,395/- E-Tender ID – 2023_LMC_908773_1

अ.क्र.	निवीदाधारकाचे नाव	निविदेत दिलेले दर
१	शुभम मोहनराव जाधव, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा १२.००० % कमी
२	**टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर**	**अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००० % कमी**
३	नुर कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा १६.८६० % कमी

सदर कामासाठीचे न्युनतम (L1)निवीदाधारक यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रु.६,७२,०००/- चे ICICI बॅकेचे FDR क्र.२१४७०७९१ सादर केले आहे. तरी टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००० % कमी दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर. तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट झाल्यास त्यासही मान्यता मिळावी.

तसेच नांदगाव वेस स्मशानभुमी विकसीत करणे या कामासाठी खालील ०६ (सहा) निवीदाधारक सहभागी झाले होते.

१) टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि.,लातूर
२) शिगे कन्स्ट्रक्शन, निलंगा
३) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर
४) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर
५) दयानंद बाबूराव हुल्ले, लातूर
६) नुर कन्स्ट्रक्शन, लातूर

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.०१ (कागदपत्र) दि.१३/०६/२०२३ रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने १) शिगे कन्स्ट्रक्शन, निलंगा २) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर ३) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन तीनही निवीदाधारकाकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक (१) शिगे कन्स्ट्रक्शन, निलंगा यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४७/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार सा.बांधकाम विभागाकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्राचे नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र, ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली

Scanned with OKEN Scanner

नाहीत. (२) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४५/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत. (३) रुक्मिणी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. ४३४६/२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार ईपीएफ भरलेले माहे एप्रिल २०२३ चे चलन आणि बिड कॅपॅसिटीचे UIDN सह सी.ए.चे प्रमाणपत्र सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.२१/०७/२०२३ पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यांनी मुदतीमध्ये कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (१) टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि.,लातूर (२) दयानंद बाबूराव हुल्ले, लातूर (३) नुर कन्स्ट्रक्शन, लातूर यांचा लिफाफा क्र.०२ (देकारपत्रक) दिनांक- ०९/१०/२०२३ रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खांलील प्रमाणे दर दिले आहेत.

कामाचे नावः Development of nandgaon ves smashanbhumi for M.C.Latur. Rs.41,15,444/- Tender ID – 2023_LMC_908791_1.

अ.क्र.	निवीदाधारकाचे नाव	निविदेत दिलेले दर
१	**टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर**	**अंदाजपत्रक दरापेक्षा १८.००० % कमी**
२	दयानंद बाबूराव हुल्ले, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा १४.१४० % कमी
३	नुर कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा १६.६०० % कमी

सदर कामासाठीचे न्युनतम (L1)निवीदाधारक टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रु.५,०४,०००/- चे ICICI बॅकेचे FDR क्र.२१४७०७९० सादर केले आहे. तरी टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा १८.०००% कमी दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर. तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट झाल्यास त्यासही मान्यता मिळावी.

<u>निर्णयः</u>- Construction of c.c.road from rokadya hanuman mandir to nandgaon ves smashanbhumi to ring road in prabhag no.1 for M.C.Latur. Rs.41,66,395/- E-Tender ID – 2023_LMC_908773_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा २०.०००% कमी असल्याने निवीदाकार टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते. Development of nandgaon ves smashanbhumi for M.C.Latur. Rs.41,15,444/-E-Tender ID– 2023_LMC_908791_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा १८.०००% कमी असल्याने निवीदाकार टेकड्राईव्ह इंजि.प्रा.लि., लातूर यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते. तसेच वरील दोन्ही कामांची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील काही बाबीमध्ये वाढ/घट अथवा बदलास तसेच जागेत बदल झाल्यास त्यासही मान्यता देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

(800)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 158 दि. 23/11/2023

विषयः- जाहीराती 54 चौ.से.मी. ऐवजी 200 चौ.से.मी. मध्ये मिळणे बाबत.

प्रस्तावः- लातूर शहर महानगरपालिकेद्वून टेंडर व विकास कामासाठी देण्यांत येणा-या जाहीराती 54 सें.मी. ऐवजी 200 चौ.से.मी.मध्ये देण्यात यावेत. सद्य स्थितीत महागाईच्या परिस्थितीत वृतपत्र चालविणे अवघड झाले आहे असे जिल्हयातील विविध वृत्तपत्राचे संपादक यांनी दि. 17/08/2023 निवेदनाद्वारे मागणी केली आहे. जाहीरात ही किती चौ. से.मी. देण्याबाबत शासन निर्णयात निर्देश दिसून येत नाही. सदरील निवेदनाचा व वाढती महागाईचा विचार करता जाहीरात 54 सें.मी. ऐवजी 120 चौ.से.मी. मध्ये देण्याबाबत प्रस्ताव सादर.

त्यानुसार 54 सें.मी. ऐवजी 120 चौ.से.मी. जाहीरात देण्याचा प्रस्ताव सविनय मान्यतेस्वत सादर.

निर्णयः- जाहीरात 54 चौ.से.मी. ऐवजी 120 चौ.से.मी. मध्ये देण्याबाबत मान्यता देण्यांत येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

(301)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 01/12/ 2023

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> 159 **अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे अग्निशमन वाहन** Fire Watef Tender on 14 ton GVW BS-VI Chassis. व बॉडी बांधकामसह खरेदी करणे.करिता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानातील जिल्हास्तर अभियान व बळकटीकरण योजने अंतर्गत सन 2023-24 च्या जिल्हा वार्षिक योजनेतून किंवा इतर उपलब्ध निधीतून अंदाजे रक्कम रू.2,60,20,000/-निधी मागणी करणे बाबत.

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर अग्निशमन विभागाकडे एकूण विविध प्रकारचे सध्या [वॉटर टेंडर 3, रेस्क्यू टेंडर -1 फोम टेंडर 1,रूग्ण- वाहिका 1,नविन मल्टीपर्पज fire Tender 2, Q.R.V.(देवदूत)1,आसे एकूण 08 वाहने आहेत. त्यापैकी 1 वॉटर टेंडर बंद आहे व 1 फोम टेंडर बंद आहे (पंप काम करत नाही) व 2 नविन आहेत व इतर वाहने पूर्ण पणे जूने/खराब झाले आहेत ते 14-15 वर्षे जूने झाले आहेत. व सतत बंद पडत आहेत.शासकीय परिपत्रकानुसार 10 वर्षा पूर्विचे वाहने निकामी करून नविन वाहने खरेदी करणेच्या सुचना आहेत.

सध्या लातूर शहर व परिसरात ओदयोगिक वसाहत खुप मोठया प्रमाणात विस्तारित होत आहे सततंच लहान-मोठे आगीच्या दुर्घटना घडतात. त्यातल्या त्यात शहरात मोठया प्रमाणात बाजार पेठ आहे.अशा ठिकाणी लहान आग लागली तरिही 1 - 2 उपलब्ध अग्निशमन वाहने पाठवावी लागतात सध्या स्थितीत लातूर अग्निशमन विभागाकडे 2 च नविन मल्टीपर्पज fire Tender उपलब्ध आहेत. लातूर शहर महानगरपालिका,लातूर च्या अग्निशमन विभागा करिता आग-आपत्ती प्रसंगी व VIP बंदोबस्त/ कॅनव्हाय मध्ये समाधान कारक कार्य करणे आणि जिवित व वित्त हानी टाळणे करिता खलिल अत्याधूनिक अग्निशमन वाहने व साहीत्याची आवश्यकता आहे.

आ.क्र.	वाहनाचा तपसिल	नग	अंदाजे अपेक्षित खर्च
1	Design,Construction,Fabrication, Erection,Testing and Commission of Fire Watef Tender on 14 tonGVW BS-VI Chassis (Inclusive Of Chassis)	2	2,60,20,000/-
	अंदाजे एकूण	**2**	**2,60,20,000/-**

जिल्हा वार्षिक योजना सन- 2023-24 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हा स्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू.2,60,20,000/-कोटी निधी उपलब्ध करून देणे बाबत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत दोन Fire Watef Tender on 14 ton GVW BS-VI Chassis. व खूलि चेचीस व बॉडीबांधकामसह खरेदी करणे करिता कमी-जास्त प्रमाणात अंदाजे रक्कम रू. 2,60,20,000/- खर्च अपेक्षित आहे.

तेंव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2023-24 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू.2,60,20,000/- अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशाकिय मानस्तेस्तव सादर.

<u>निर्णयः-</u> अत्याधुनिक अग्निशमन वाहने खरेदी करिता रू. 2,60,20,000/- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2023-24 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू. 2,60,20,000/- अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

(302)

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

(विधी विभाग)

ठराव क्रमांक 160 दि. 08/12/2023

.....

विषयः- जेष्ठ विधीज्ञ / सिनियर कॉसील नियुक्ती बाबत व वकील फीस निश्चिती बाबत.

प्रस्तावः- लातूर शहर महानगरपालिका लातूर यांचे न्यायालयीन प्रकरणा बाबत लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी कायदेसल्लागार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे परंतु उच्च न्यायालय तसेच सर्वाच्च न्यायलयात खास बाब म्हणुन जेष्ठ विधीज्ञ / सिनियर कॉसील नेमण्याची वेळ येते तेव्हा सदर जेष्ठ विधीज्ञ / सिनियर कॉसील हे त्या त्या प्रकरणा पुरते मर्यादित असल्याने त्यांचे मानधन / वकील फीस शुल्क ठरविण्याचे सर्व अधिकार हे मा.आयुक्त महोदय यांना असतील मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेशिवाय जेष्ठ विधीज्ञ / सिनियर कॉसील यांची नियुक्ती व त्याची वकील फीस निश्चिती बाबत मान्यता देण्यात येत आहे.

निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर यांचे मा.उच्च न्यायालय व मा.सर्वाच्च न्यायलयातील प्रकरणात खास बाब म्हणुन जेष्ठ विधीज्ञ / सिनियर कॉसील यांची नियुक्ती व त्यांची वकील फीस निश्चिती चे अधिकार मा.आयुक्त महोदय यांना राहतील यास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 161 दिनांक 08/12/2023

विषय :- केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना" अंतर्गत विकास योजना आराखड्यातील समाविष्ट कामांचा प्रस्ताव सादर करणे व निधी मागणी करणे बाबत.

प्रस्तावना :-

लातूर शहराचे विकास योजना आराखड्यातील आरक्षणे विकसीत करणेसाठी लातूर शहर महानगरपालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. तथापि शहराची वाढ लक्षात घेता सदरची आरक्षणे विकसीत करणे आवश्यक आहे.

मा. सह सचिव, नगर विकास विभाग-१० यांचे पत्र क्र. सिआयडी/३३२३/प्र.क्र.५३/नवि-१० दि. २४ नोव्हेंबर, २०२३ अन्वये व दिनांक ०७/१२/२०२३ रोजीची व्ही.डी.ओ. कॉन्फरंस द्वारे घेतलेल्या बैठकीतील सुचना नुसार केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत विकास योजना आराखड्यातील समाविष्ट कामांना निधी वितरीत करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार लातूर शहरातील विकास योजना आराखड्यातील खालीलप्रमाणे कामांचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत किंमत (रु. कोटी)
१	विकास आरखड्यामधील आरक्षण क्र. ७७ विवेकानंद चौक येथे व्यापारी संकुल बांधणे.	२४७.००
२	विकास आरखड्यामधील आरक्षण क्र. ४६ साळे गल्ली येथे अंतरराष्ट्रीय दर्जाचे शाळेचे बांधकाम करणे.	४९.३०
३	शहरातील विविध ११ डी.पी. रस्ते विकसीत करणे.	१४.००
	एकूण रुपये	३१०.३०

तरी वरीलप्रमाणे एकूण रु. ३१०.३० कोटीचे विकास योजना आराखड्यातील आरक्षणे विकसीत करणेचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत सादर करणेस मान्यता देणेसाठी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :- सार्वजनिक बांधकाम विभागाने केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत वरीलप्रमाणे एकूण रु. ३१०.३० कोटीचे विकास योजना आराखड्यातील आरक्षणे विकसीत करणेचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना" अंतर्गत सादर करणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूरशहरमहानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 162 दिनांक- 08/12/2023

विषयः- ई-निवीदा क्र. 31/2023-2024 अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना-

ई-निवीदा सुचना क्र.31/2023-2024 अन्वये म.न.पा. निधी अंतर्गत खालील कामाची रुपये- 67,19,163./- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्र.मा.किंमत
1.	Proposed Renovation work of Nagar Sachiv Department, Dy. Commissioner Cabin & Chief Auditor Cabain at Main Building of Corpration for M.C.Latur.	67,19,163.00

सदर कामांसाठी खालील 05 (पाच) निवीदाधारक सहभागी झाले होते.

(2) टेकड्राईव्ह इंजिनीअरींग प्रा.लि., लातूर. (2) अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर (3) एन.एस.कन्स्ट्रक्शन, लातूर.

(5) रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर (5) पुंडलिक बालाजी लांजीले, मु.हिप्परगा (दाऊल) पो.गुडसूर ता. उदगीर

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.01 (कागदपत्र) दि.18.09.2023 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने (1) टेकड्राईव्ह इंजिनीअरींग प्रा.लि., यांनी लातूर व पुणे येथे नोंदणी केलेली प्रमाणपत्रे सादर केली असल्याने आपण नेमके कोणत्या नोंदणी प्रमाणपत्रावर काम करणार आहात ? याबाबत खुलासा मागवावा असा अभिप्राय दिलेवरुन कार्यालयीन पत्र क्र.6434/23-24 दि.11.10.2023 अन्वये पत्र देऊन आपण नेमके कोणत्या नोंदणी प्रमाणपत्रावर काम करणार आहात ? याबाबत दि.17.10.2023 पर्यंत खुलासा सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास आपणांस अपात्र करण्यांत येईल असे कळविले होते. तथापि टेकड्राईव्ह इंजिनीअरींग प्रा.लि.,लातूर यांनी मुदतीत खुलासा सादर न केलेने अपात्र करण्यांत आले.

तसेच (2) रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर (3) पुंडलिक बालाजी लांजीले, मु.हिप्परगा (दाऊल) पो.गुडसूर ता. उदगीर यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन दोन्ही निवीदाधारकाकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक (2) रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. 6433/2023-24 दि.11.10.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार आपण ऑगष्ट-2023 चे ईपीएफ भरलेचे चलन व लिफाफा क्र.01 मध्ये सादर केलेली सर्व दस्तऐवज खरे असल्याचे प्रतिज्ञापत्र व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र दि.17.10.2023 पर्यंत सादर करावे. मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास आपणांस अपात्र करण्यांत येईल असे कळविले होते. तथापि रुक्मीनी इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर यांनी मुदतीत कागदपत्रे सादर न केलेने अपात्र करण्यांत आले. तसेच (3) पुंडलिक बालाजी लांजीले, मु.हिप्परगा (दाऊल) पो.गुडसूर ता. उदगीर यांना कार्यालयीन पत्र क्र. 6432/2023-24 दि.11.10.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व

Scanned with OKEN Scanner

शर्तीनुसार आपण व्यवसायक ना-देय प्रमाणपत्र, व लिफाफा क्र.01 मध्ये सादर केलेली सर्व दस्तऐवज खरे असल्याचे प्रतिज्ञापत्र व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र दि.17.10.2023 पर्यंत सादर करावे. मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास आपणांस अपात्र करण्यांत येईल असे कळविले होते. पुंडलिक बालाजी लांजीले, मु.हिप्परगा (दाऊल) पो.गुडसूर ता. उदगीर यांनी मुदतीत कागदपत्रे सादर केले होते. परंतू त्यानी मी सु.बे.अ. असल्यामुळे मला PTEC लागू आहे व त्याचे 2023-2024 चे चलन भरल्याची पावती जोडी आहे. तसेच मला PTRC लागू नाही असे कळविले आहे. तसेच लिफाफा क्र.01 मध्ये सादर केलेली सर्व दस्तऐवज खरे असल्याचे प्रतिज्ञापत्र व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र हे रु.10/- च्या बॉण्ड पेपरव तयार करुन सोबत सादर केले आहेत.

तथापि, पुंडलिक बालाजी लांजीले, मु.हिप्परगा (दाऊल) पो.गुडसूर ता. उदगीर यांनी PTRC लागू नाही असे कळविलेने GST कार्यालयास भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असता PTRC लागू असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना अपात्र करण्यांत आले.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (1) अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर व (2) एन.एस. कन्स्ट्रक्शन, लातूर यांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 19.10.2023 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

<u>कामाचे नावः- म.ना.निधी अंतर्गत-</u>

Proposed Renovation work of Nagar Sachiv Department, Dy. Commissioner Cabin & Chief Auditor Cabain at Main Building of Corpration for M.C.Latur. Rs. 67,19,163/- Tender ID No.2023_LMC_942952_1

अ.क्र.	निवीदाधारकाचे नांव	निवीदेत दिलेले दर
1.	**अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर**	**अंदाजपत्रक दर**
2.	एन.एस.कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 2.000% अधिक

सदर कामासाठीचे न्युनतम (L1) निवीदाधारक **अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर** यांची अंदाजपत्रक दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

<u>निर्णयः- म.ना.निधी अंतर्गत-</u> Proposed Renovation work of Nagar Sachiv Department, Dy. Commissioner Cabin & Chief Auditor Cabain at Main Building of Corpration for M.C.Latur. Rs. 67,19,163/- Tender ID No.2023_LMC_942952_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा **अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर** यांची अंदाजपत्रक दराची असल्याने निवीदाकार **अजिंक्यतारा कन्स्ट्रक्शन, लातूर** यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

(366)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 163 दिनांक 20/12/2023

विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजने अंतर्गत सांस्कृतिक सभागृह विकसीत करणेच्या कामातील बदलास प्रशासकी मान्यता प्राप्त रकमेच्या मर्यादेत मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सांस्कृतिक सभागृह विकसीत करणे Tender ID 2022_LMC_776905_1 या अंदाजपत्रकीय किंमत रु. 22,20,420/- या कामाचे कार्यादेश शावेज महेबुबसाब शेख यांना दि. 02/09/2022 रोजी देण्यात आले होते. तथापि सदर कामाचे संबंधीत शाखा अभियंता यांनी सदरील कामाच्या अंदाजपाकानुसार सध्याच्या परीस्थितीमध्ये काम करणे शक्य नाही तसेच मा. आयुक्त महोदय यांचे सुचनानुसार फरशी, खिडक्या, सिलींग या कामाचे त्याच आर्थिक वर्षाचे दरसुचीनुसार तयार करुन बदललेल्या अंदाजपत्रकास सुधारीत मान्यता मिळणेसाठी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे पत्र क्र. जा.क्र. लामनपा/सा.बां./5062/2023 दि. 14/06/2023 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यानुसार मा. जिल्हाधिकारी महोदय, लातूर यांचे पत्र जा.क्र. 2023/नपाप्र/कक्ष-4/कावि-1661 दिनांक 06/11/2023 अन्वये सदर प्रकरणात मान्यता देण्याची आवश्यकता वाटत नाही आपण आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

त्यानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सांस्कृतिक सभागृह विकसीत करणे Tender ID 2022_LMC_776905_1 सर्व करासह अंदाजपत्रकीय किंमत रु. 25,00,000/- या कामातील बदलास मान्यता देणेसाठी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सांस्कृतिक सभागृह विकसीत करणे Tender ID 2022_LMC_776905_1 सर्व करासह अंदाजपत्रकीय किंमत रु. 25,00,000/- या कामातील बदलास प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कम रु. 25,00,000/- च्या मर्यादेत मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 164 दिनांकः 20/12/2023

विषयः जनहिताच्या/उपयोगी कामांच्या मागणी/विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही होणे बाबत.

प्रस्तावनाः मा.ना.श्री.गिरीश महाजन, पालकमंत्री, लातूर यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना दलीत वस्ती योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	प्रभाग क्र. ११ मधील विक्रमनगर अंतर्गत घरकूल सुपर मार्केट ते बोधी चौक दोन्ही बाजूस फुटपाथ करणे	१०,००,०००
२	प्रभाग क्र. ११ मधील विक्रमनगर येथे मस्के गुरुजी ते हावळे सर यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजूस फुटपाथ करणे	१०,००,०००
३	प्रभाग क्र. ११ मधील विक्रमनगर हावळे सर ते पंचशील चौकापर्यंत दोन्ही बाजूस फुटपाथ करणे	१०,००,०००
४	प्रभाग क्र. ११ मधील विक्रमनगर येथील बहूजन हिताय वस्तीगृहाच्या मागील बाजूस नाली करणे	१०,००,०००
५	प्रभाग क्र. १० तलवारे किराणा ते गायकवाड घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
६	प्रभाग क्र. १० सुरवसे ते वाघमारे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
७	प्रभाग क्र. १० बळीराम लोकरे ते पाटील राजू ढाले घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
८	प्रभाग क्र. १० अंधारे ते साबळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
९	प्रभाग क्र. १० मांदळे ते पंडीत घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१०	प्रभाग क्र. १० भिमराव सुरवसे ते माने घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
११	प्रभाग क्र. १० मुलगंध बुध्द विहार ते सदाफुले, ॲड.चव्हाण ते ६० फुटी रोड रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१२	प्रभाग क्र. १० वाघमारे ताई ते शेषराव कांबळे ते मुंढे किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१३	प्रभाग क्र. ३ आनंद नगर येथील मनपा शाळा क्र.५ साठी आरसीसी स्वयंपाकघर बांधणे	१०,००,०००
१४	प्रभाग क्र. ३ इंदिरानगर येथे उमेश गायकवाड ते कांबळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१५	प्रभाग क्र. ३ जयभीम नगर येथे मल्ला ते राजू गवळी घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१६	प्रभाग क्र. ३ जयभीम नगर येथे राजू गवळी ते तनुजा कांबळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१७	प्रभाग क्र. ३ चलवाड नगर येथे उद्यान विकसीत करणे	१०,००,०००
१८	प्रभाग क्र. ४ इस्लामपुरा झोपडपट्टी कांबळे घरासमोरील नाली बांधणे	१०,००,०००
१९	प्रभाग क्र. ४ अंजली नगर निवृत्ती माळवे ते उध्दव पाडोळे रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
२०	प्रभाग क्र. ४ अंजली नगर पाडोळे ते सय्यद हॉटेल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
२१	प्रभाग क्र. ४ अंजली नगर सुरज शेलार ते गायकवाड घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
२२	प्रभाग क्र. ४ अंजली नगर पवन बुध्द विहार समाज मंदिर ते पठाण घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००

Scanned with OKEN Scanner

२३	प्रभाग क्र. ४ अंजली नगर बनसोडे ते सुरज शेलार घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
२४	प्रभाग क्र. ५ कोल्हे नगर येथे ढगे घरासमोरील नाली बांधणे	१०,००,०००
२५	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे राजू बनसोडे ते नरसिंग घरापर्यंत नाली बांधणे	१०,००,०००
२६	प्रभाग क्र. ५ कोल्हे नगर गायकवाड किराणा समोरील नाली बांधणे	१०,००,०००
२७	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे गफार शेख ते रिंग रोडपर्यंत नाली बांधणे	१०,००,०००
२८	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे गफार शेख ते रिंग रोडपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
२९	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे नरसिंगे ते राजू बनसोडे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३०	प्रभाग क्र. २ सनत नगर मांदळे ते कवठेकर नाली व रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३१	प्रभाग क्र. ३ प्रबुध्द नगर येथे कांबळे ते जगदाळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३२	प्रभाग क्र. ३ बालाजी नगर येथे माणिकराव सावंत ते पांचाळ घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३३	प्रभाग क्र. ३ बालाजी नगर पांचाळ घर ते जाधव घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३४	प्रभाग क्र. ३ बालाजी नगर जाधव ते रणसुभे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३५	प्रभाग क्र. ३ बालाजी नगर रणसुभे ते शेख घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३६	प्रभाग क्र. ३ प्रबुध्द नगर रावसाहेब चव्हाण ते आचार्य घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३७	प्रभाग क्र. ३ प्रबुध्द नगर आचार्य ते शहनवाज शेख घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
३८	प्रभाग क्र. ३ प्रबुध्द नगर रावसाहेब चव्हाण यांच्या घरासमोर नाली बांधणे	१०,००,०००
३९	प्रभाग क्र. १३ मध्ये प्रकाश नगर पुर्व भागात विविध ठिकाणी ३ नग सोलार मिनी हायमास्ट बसविणे	१०,००,०००
४०	प्रभाग क्र. १४ मध्ये खाडगाव स्मशानभुमी समोरील भागात व विविध ठिकाणी ३ नग सोलार मिनी हायमास्ट बसविणे	१०,००,०००
४१	प्रभाग क्र. १४ मध्ये गौतम नगर भागात विविध ठिकाणी ३ नग सोलार मिनी हायमास्ट बसविणे	१०,००,०००
४२	प्रभाग क्र. १ मध्ये नांदगाव वेस भागात विविध ठिकाणी ३ नग सोलार मिनी हायमास्ट बसविणे	१०,००,०००
४३	प्रभाग क्र. ३ मध्ये राजीव नगर भागात विविध ठिकाणी ३ नग सोलार मिनी हायमास्ट बसविणे	१०,००,०००

मा.आ.श्री.संभाजी पाटील निलंगेकर, आमदार यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना दलीत वस्ती योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	प्रभाग क्र. १२ सोना नगर येथे सचिन कवडे, कांबळे, सोनवणे ढमाले घरासमोर पेव्हर ब्लॉक रस्ता करणे व नाली बांधणे	१०,००,०००
२	प्रभाग क्र. १२ मैत्री अपार्टमेंटच्या पाठिमागे पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
३	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर येथे सदाफुले यांच्या घरासमोर पेव्हर रोड करणे	१०,००,०००
४	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर येथे कानमोडे यांच्या घरासमोर नाली करणे	१०,००,०००
५	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर एनकुलवड यांच्या घरासमोर नाली करणे	१०,००,०००
६	प्रभाग क्र. १२ सोना नगर येथे सुलाखे टेलर समोर पेव्हर रोड करणे	१०,००,०००

Scanned with OKEN Scanner

७	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर येथे साठे यांच्या घरासमोर पेव्हर रोड करणे	१०,००,०००
८	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर कांबळे, गायकवाड काटे यांच्या घरासमोर पेव्हर रोड करणे	१०,००,०००
९	प्रभाग क्र. १२ विठ्ठल रुक्मिणी नगर कानमोडे बाबा यांच्या घरा समोर पेव्हर रोड करणे	१०,००,०००
१०	विठ्ठल रुक्मिणी नगर येथे चामे, बिडवे व कस्पटे यांच्या घरासमोर नाली व रोड करणे	१०,००,०००
११	प्रभाग क्र. १२ अवंती नगर जगताप यांच्या घरासमोर नाली करणे	१०,००,०००
१२	प्रभाग क्र. १२ अवंती नगर राम कांबळे यांच्या घरासमोर पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१३	प्रभाग क्र. १२ विकास नगर सोनकांबळे ते शिंदे आगवाणे पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१४	प्रभाग क्रमांक १६ कॉईल नगर भागात म्हाडा बिल्डिंग **A B C D** येथे नाली व त्यावर स्लॅब टाकणे	१०,००,०००
१५	प्रभाग क्रमांक १६ कॉईल नगर भागात म्हाडा बिल्डिंग **E F G H** मध्ये सर्व चेंबर व पाईपलाईन करणे	१०,००,०००
१६	कॉईल नगर डालडा फॅक्टरी कामगार वसाहत महापूरी मॅडम ते मंदिर पर्यंत नाली करणे	१०,००,०००
१७	बौध्द गार्डन समोर म्हसोबा वस्तीमध्ये रोड व नाली करणे	१०,००,०००
१८	बोधे नगर काळा हनुमान मंदिर ते देवी मंदिर रोड करणे	१०,००,०००
१९	बोधे नगर काळा हनुमान मंदिर ते देवी मंदिर नाली करणे	१०,००,०००
२०	कापड मिल येथे विविध ठिकाणी नाली करणे	१०,००,०००
२१	मोरे नगर येथे विविध ठिकाणी नाली करणे	१०,००,०००
२२	मोरे नगर येथे विविध ठिकाणी रोड करणे	१०,००,०००
२३	जवाहरलाल शाळा ते कॉईल नगर बिल्डींग कडे जाणारा दक्षिणेकडील रस्ता करणे	१०,००,०००
२४	बोधेनगर येथे कांबळे घर ते डाळ मिल कडे जाणारा पुर्व पश्चिम रोड वर नाली करणे	१०,००,०००
२५	कॉईल नगर भागात म्हाडा बिल्डिंग **A B C D** येथे पेव्हर रोड करणे	१०,००,०००
२६	कॉईल नगर भागात म्हाडा बिल्डिंग **E F G H** येथे पेव्हर रोड करणे	१०,००,०००

मा.आ.श्री.अभिमन्यू पवार, आमदार यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना दलीत वस्ती योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	पवार घर ते मस्के घरापर्यंत व परिसरात पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
२	जाधव घर ते सूर्यवंशी घरापर्यंत व परिसरात पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
३	बुलढाणा अर्बन बँक बार्शी रोड समोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
४	ज्ञानप्रकाश शाळा प्रकाश नगर रोड भाजी मार्केट पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
५	प्रकाश नगर येथे अंतर्गत रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
६	प्रभाग क्र. १२ नितीन वाघमारे यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
७	प्रभाग क्र. १२ विकास नगर येथे गवळी सर यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
८	प्रभाग क्र. १२ सूर्योदय कॉलनी येथे फुलारी पोलीस यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
९	प्रभाग क्र. १२ खासदार श्री सुनील गायकवाड यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
१०	प्रभाग क्र. १२ सूर्योदय कॉलनी सावंत सर यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००

Scanned with OKEN Scanner

(310)

११	प्रभाग क्र. ११ सुभेदार रामजीनगर येथे ॲड.शशिकांत सुरवसे यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
१२	प्रभाग क्र. १२ कुमठेकर घर ते गायकवाड यांच्या घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१३	प्रभाग क्र. १२ सूर्योदय कॉलनी येथे गजानन महाराज मंदिरा शेजारील पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१४	प्रभाग क्र. १२ बचपन शाळेच्या बाजूचा पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१५	प्रभाग क्र. १२ धाराशिवे गिरणी ते बोराडे यांच्या घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१६	प्रभाग क्र. १२ जुनी रेल्वे लाईन ते जगताप यांच्या घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१७	प्रभाग क्र. १२ जगताप घर ते जोगदंड यांच्या घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१८	प्रभाग क्र. १२ जोगदंड घर ते ग्लोबल शाळेपर्यंत पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
१९	खाडगाव स्मशानभुमीच्या मागील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
२०	विराट नगर येथे अंतर्गत रस्ते पेव्हर करणे	१०,००,०००
२१	खनी भागात अंतर्गत रस्ते पेव्हर करणे	१०,००,०००
२२	गौतम नगर येथे सुशोभिकरण करणे	१०,००,०००
२३	खाडगाव शिवाजी कांबळे यांच्या घरासमोरील रस्ता पेव्हर करणे	१०,००,०००
२४	खाडगाव स्मशानभुमीच्या मागील बाजूची नाली बांधणे	१०,००,०००
२५	खाडगाव रोड शिवाजी कांबळे यांच्या घरासमोरील नाली बांधणे	१०,००,०००
२६	विठ्ठल नगर येथे अंतर्गत नाली बांधणे	१०,००,०००

मा.श्री.सुधाकर तुकाराम श्रृंगारे, खासदार, लातूर यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना दलीत वस्ती योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	प्रभाग क्र. ०२ येथील दलित वस्ती मध्ये पेव्हर रोड करणे	७,००,०००
२	प्रभाग क्र. ११ श्रीनगर विशाल पाचपिंडे घर ते स्वामी घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	८,००,०००
३	प्रभाग क्र. ११ अजिंठा नगर आचार्य घर ते कांबळे घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	८,००,०००
४	प्रभाग क्र. ११ आनंद वैरागे ते रणदिवे सर घरापर्यंत नाली करणे	७,००,०००
५	प्रभाग क्र. १ दलित वस्ती मध्ये पेव्हर रोड करणे	७,००,०००
६	प्रभाग क्र. ७ दिपक शिंदे घर ते इस्माईल मज्जीद पर्यंत पेव्हर रोड करणे	७,००,०००
७	प्रभाग क्र. ११ अजिंठा नगर दिलीप चव्हाण घर ते उबाळे घरापर्यंत पेव्हर रस्ता करणे	८,००,०००
८	प्रभाग क्र. ३ जयभीम नगर येथे पेव्हर रोड करणे	७,००,०००
९	प्रभाग क्र. ३ आण्णाभाऊ साठे सभागृहात पेव्हर ब्लॉक बसविणे	७,००,०००
१०	क्वॉईल नगर येथे पुष्कर ते राजीव गांधी शाळा पेव्हर रस्ता करणे	८,००,०००
११	क्वॉईल नगर राजीव गांधी शाळा ते सुतमील रोड पेव्हर करणे	८,००,०००
१२	प्रभाग क्र. १ सिध्देश्वर चौक महादेव नरहरी कांबळे ते दिपक शिंदे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	७,००,०००
१३	प्रभाग क्र. १ वैशाली नगर अमोल किराणा बाहूराव पाटोळे घर ते संजय कांबळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	७,००,०००
१४	भोळे सर ते बिराजदार सर घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	७,००,०००
१५	आंबेडकर कॉलनी परिसरातील अशोक सोनवणे ते खरोळे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	७,००,०००
१६	कांबळे घर ते पवार घरापर्यंत नाली करणे	७,००,०००

Scanned with OKEN Scanner

१७	गोपाल नगर कांबळे घर ते गायकवाड घरापर्यंत नाली करणे	७,००,०००
१८	प्रभाग क्र. ६ गांधीनगर बालाजी वाघमारे ते सुनीता वाघमारे घरापर्यंत नाली करणे	७,००,०००
१९	प्रभाग क्र. १३ कपील नगर जिजामाता नगर अंतर्गत पेव्हर रस्ता करणे	७,००,०००
२०	प्रभाग क्र. ३ जयभीम नगर राजू जगताप घरासमोरील नाली बांधणे	७,००,०००
२१	समता सोसायटी बौध्द विहार परिसरात रस्ता पेव्हर करणे	४,००,०००
२२	प्रभाग क्र. १३ मध्ये कमान बांधणे	९,००,०००
२३	प्रभाग क्र. ११ मध्ये पेव्हर रस्ता करणे	७,००,०००
२४	प्रभाग क्र. ४ इस्लामपुरा झोपडपट्टी येथे पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
२५	प्रभाग क्र. ६ वीरहनमंतवाडी लक्ष्मी कांबळे यांच्या घरासमोर पेव्हर रस्ता करणे	१०,००,०००
२६	प्रभाग क्र. ४ तथागत चौक ते बँडवाला यांच्या घरापर्यंत पेव्हर साईडपट्टी करणे	१०,००,०००

मा.आ.श्री.अमित देशमुख, आमदार यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना दलीत वस्ती योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	प्रभाग क्र. १ सिध्देश्वर नगर, मळवटी रोड येथील सुरेंद्र कांबळे, कचरु गायकवाड ते गणपती गायकवाड घरापर्यंत रस्ता करणे	१०,००,०००
२	प्रभाग क्र.३ आनंदनगर येथील गायकवाड घर ते ठाकरे घरापर्यंत रस्ता करणे	१०,००,०००
३	प्रभाग क्र. ४ न्यू लेबर कॉलनी येथील प्रियदर्शनी समाज मंदिर ते हाजी इलियास खान घर ते मिलींद शाळेपर्यंत साईडपट्टी करणे	१०,००,०००
मा.आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांचे पत्र जा.क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त/2466/23, दि.30/06/2023 रोजीच्या पत्रान्वये श्री.धनराज बब्रुवान कांदे, फायरमन, अग्निशमन विभाग, महानगरपालिका अमरावती यांनी त्यांचे वृध्द आई-वडील प्रकृतीची देखभाल व काळजी घेण्यासाठी मुळगावापासून जवळ असलेल्या लातूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी सेवा सेमावेशनबाबत विनंती केली आहे.

श्री.धनराज बब्रुवान कांदे, यांची अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात फायरमन या पदावर (भजड) प्रवर्गातुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. ते दि.16/11/2015 ला फायरमन पदावर रुजू झालेले आहे.1.श्री.धनराज कांदे यांची फायरमन या पदावर सलग जवळपास 8 वर्ष सेवा पुर्ण झालेली आहे.2.त्यांनी फायरमन या पदासाठी सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यकती व्यवसाईक अर्हता पुर्ण करीत असुन अग्निशमन पाठयक्रम पुर्ण केला आहे. 3.8 वर्ष सेवा पुर्ण झाल्यामुळे ते सेवेत कायम झाले आहे.4.त्यांचे कामकाज समाधन कारक आहे.5.त्यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालीन प्रकरण चालु अथवा प्रस्तावित नाही.

मा.उप सचिव,महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक लामपा- 2012/261/ प्र.क्र.40/ नवि-24,दि.28/5/2013 अन्वये अग्निशमन विभागात 'फायरमन' या पदनामांची 63 पदे मंजूर असून त्यांची वेतनश्रेणी रु.52जज-20200 व ग्रेड वेतन 1800 आहे. (सातव्या वेतन प्रमाणे एस- 5 18000- 56900) आहे. फायरमन या पदानामाची 63 पदा पैकी 30 पदे सरळसेवेन भरण्याकरीता दि.22/12/2023 रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.उर्वरित 33 पदामध्ये फायरमन (भजड) करीता 1 पद रिक्त आहे.

लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2019 मधील नियम 3 मधील अ.क्र.9 (अ) नुसार नामनिर्देशनाने नियुक्तीकरीता राखून ठेवण्यात आलेल्या समसंवर्गीय व समान वेतनश्रेणीच्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी अशी तरतुद आहे.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णयः-

श्री.धनराज बब्रुवान कांदे, फायरमन महानगरपालिका अमरावती यांना लातूर शहर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील फायरमन या समकक्ष पदावर समान वेतनश्रेणीत स्थायी रुपाने बदलीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांकः- 174 दि.31/01/2024

प्रस्तावः-

विषयः- श्री.शेळके निखील बालाजी, कनिष्ठ अभियंता (मानधन) यांच्यासह लातूर शहर महानगरपालिकेत सामावून घेण्याकरीता कनिष्ठ अभियंता या पदनामाची 9 अधिसंख्य पदे निर्मिती करुन कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करणेबाबत निर्णयास्त सादर.

लातूर शहर महानगरपालिकेत नगर रचना, बांधकाम व क्षेत्रीय कार्यालयात मासिक ठोक मानधन तत्वावर कनिष्ठ अभियंता या पदनामाचे 8 पदे मानधन तत्वावर नेमणेबाबत जाहिरात दि.06/06/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुषंगाने मुलाखतीअंती गुणानुक्रमे अंतिम निवडसूची प्रमाणे खालील कनिष्ठ अभियंता यांनाकार्यालयीन आदेश दि.24/07/2019 अन्वये मानधनावर (कंत्राटी) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती.

अ.क्र.	कनिष्ठ अभियंता यांचे नांव
1	श्री.राजे प्रविण विजय
2	श्रीमती शेख नौशाद शब्बीर
3	श्री.बिडवे विजयकुमार चनबबसप्पा
4	श्री.गणेश भिमाशंकर देवणीकर
5	श्री.वैभव आशोक स्वामी
6	श्री.शेळके निखील बालाजी
7	श्री.तबरेज परवेज पठाण
8	श्री.प्रविण व्यंकटराव चिद्रे

मा.सर्वसाधारण सभा दि.28/02/2022 रोजीची तहकूब सभा दि.02/03/2022,विषय क्र.25 ठराव क्र.238 अन्वये पाणी पूरवठात काम करणारे कर्मचा-यांना सेवेत कायम करुन घेणेबाबत मा.सर्वसाधारण सभेने सदरचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर विषयांकीत प्रस्ताव हा मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला नव्हता. सदर ठरावतील नगररचना, बांधकाम व पाणी पुरवठा विभागात मानधनावरील कार्यरत कनिष्ठ अभियंता हे रितसर जाहिरातीव्दारे निवडसमीती मार्फत मुलाखतीव्दारे नियुक्त करण्यात आले आहेत. सदर ठरावामध्ये श्री.वैभव स्वामी, श्री.प्रवीण चिद्रे,श्री.गणेश देवनीकर, श्री.रोहित पवार, श्री.तरबेज पठाण, श्री.विजय बिडवे, श्रीमती शेख नौशाद, श्री.प्रविण राजे, कनिष्ठ अभियंता यांची नावे समाविष्ट केली आहेत. या मधील श्री.रोहित पवार यांची नियुक्ती जाहिरात दि.01/08/2017 नुसार दि. 19/09/2017 च्या कार्यलयीन आदेशान्वये करण्यात आली होती.

तथापि सदर ठरावात श्री.शेळके निखील बालाजी, कनिष्ठ अभियंता यांची नियुक्तीही उपरोक्त कनिष्ठ अभियंता यांच्या सोबतच दि.24/07/2019 अन्वये झाली आहे.पंरतु उक्त ठरावात त्यांचे नाव नमुद केल्याचे दिसुन येत नाही.

या कार्यालयाचा प्रस्ताव दि.10/03/2023 अन्वये बांधकाम व पाणी पुरवठा विभागात कार्यरत मानधनावरील (कंत्राटी) कनिष्ठ अभियंता यांना सेवेत कायम सामावुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव (2) नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई- 32 यांना सादर करण्यात आला आहे.सदर प्रस्तावात श्री.शेळके निखील बालाजी, कनिष्ठ अभियंता यांचे नाव समाविष्ठ करण्यात आले आहे.

करीता श्री.शेळके निखील बालाजी, कनिष्ठ अभियंता (मानधन) यांच्यासह लातूर शहर महानगरपालिकेत सामावून घेण्याकरीता कनिष्ठ अभियंता या पदनामाची 9 अधिसंख्य पदे निर्मिती करुन कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करणेबाबतच्या निर्णयास्त सादर.

निर्णयः-

श्री.शेळके निखील बालाजी, कनिष्ठ अभियंता (मानधन) यांच्यासह लातूर शहर महानगरपालिकेत सामावून घेण्याकरीता कनिष्ठ अभियंता या पदनामाची 9 अधिसंख्य पदे निर्मिती करुन कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत दि.10/03/2023 अन्वये शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

(334)

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 175 दिनांक 01/02/२०२४

विषय :- जनहिताच्या / उपयोगी कामांच्या मागणी / विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही होणे बाबत.

<u>प्रस्तावना –</u> मा.ना.श्री. डॉ. भागवत कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, भारत सरकार यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत मंजूरीसाठी कार्यवाही करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं. किंमत रु.
१	शंभूलिंग शाळेजवळ गवळी ते पवार यांच्या घरापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००.००
२	निटुरे ते देवकते यांच्या घरापर्यंत नाली व रस्ता करणे.	१०,००,०००.००
३	प्रभाग क्र. १२ मध्ये विविध ठीकाणी रस्ता करणे.	१०,००,०००.००
४	आमलेश्वर नगर येथे नाली करणे.	१०,००,०००.००
५	चौधरी नगर येथे रस्ता करणे.	१०,००,०००.००
६	शेटकार यांच्या घरासमोरील रस्ता करणे.	१०,००,०००.००
७	शेटे इंजिनिअर यांच्या घरासमोर नाली व रस्ता करणे.	१०,००,०००.००
८	मोहम्मदीया कॉलनी वारकरी ते छबु यांच्या घरापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००.००
९	बरडे यांच्या घरासमोरील रस्ता करणे.	१०,००,०००.००
१०	न्यू भाग्य नगर येथे रस्ता करणे.	१०,००,०००.००

मा. श्री. देविदास रा. काळे, जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पाटी, लातूर शहर जिल्हा, लातूर यांनी खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत मंजूर करणे बाबत कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं. किंमत रु.
१	प्रभाग क्र. १२ लाकाळ कुलकर्णी यांच्या घराजवळ रस्ता करणे.	१०,००,०००.००
२	श्री रामलींगेश्वर मंदीर व परीसरात सी.सी.टी.व्ही. बसविणे.	१०,००,०००.००
३	श्री केशव मंदीर परीसरात सी.सी.टी.व्ही बसविणे.	१०,००,०००.००
४	सिद्धेश्वर स्मशानभूमी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे व इतर सुविधा करणे.	१०,००,०००.००
५	समर्थ नगर येथे रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००
६	अक्षरधाम कॉलनी येथे नागरगोजे घरासमोर रस्ता करणे.	१०,००,०००.००
७	याहिया कॉलनी येथे रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००
८	प्रभागात विविध ठीकाणी रस्ता करणे.	१०,००,०००.००
९	नांदगाव वेस पेव्हर रस्ता करणे.	१०,००,०००.००
१०	सद्गुरु नगर येथे रस्ता व नाली करणे.	१०,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास कामे जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत सन २०२३-२०२४ साठी प्राप्त होणा-या निधीमधून उपरोक्त कामे हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 176 दिनांक 01/02/2024

विषय :- ई-निविदा क्र. 38/2023-24 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना अंतर्गत Proposed development of Bitumen Road at Maharana Pratap Nagar for M.C. Latur. Tender ID 2023_LMC_959322_1 या कामासाठी ई-निविदा क्र. 38/2023-24 अन्वये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेची अंदाजपत्रकीय किंमत रु. 83,68,203/- आहे. त्यानुसार सदर कामासाठी खालील 04 (चार) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) रवी स्टोन मेटल
2) शिगे कन्स्ट्रक्शन, लातूर
3) श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर.
4) एच.के. कन्स्ट्रक्शन.

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्र. 1 (Technical Bid) दि. 21/12/2023 रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करुन सर्व निविदाधारक यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली नसल्याने अपुर्ण कागदपत्र सादर करणेबाबत रवी स्टोन मेटल यांना पत्र क्र. 237 दि. 10/01/2024 शिगे कन्स्ट्रक्शन यांना पत्र क्र. 238 दि. 10/01/2024 श्री साईनाथ एन्टरप्रायेस यांना पत्र क्र. 239 दि. 10/01/2024 एच.के. कन्स्ट्रक्शन यांना पत्र क्र. 236 दि. 10/01/2024 अन्वये लेखी सुचना देऊन अपुर्ण कागदपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त चार निविदाधारकांपैकी रवी स्टोन मेटल व श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांनी त्यांना कळविल्यानुसार अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता केल्याने त्यांना पात्र करण्यात आले व शिगे कन्स्ट्रक्शन, लातूर, एच.के. कन्स्ट्रक्शन यांनी कोणतेही कागदपत्र सादर केलेली नसल्याने त्यांना अपात्र करण्यात आले.

त्यांअनुषंगाने निविदेचा पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. 02 (देकारपत्रक) दि. 31/01/2024 रोजी उघडण्यात आला. निविदाधारक यांनी सदर कामासाठी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	दिलेले दर
1	श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा ३.००० % कमी
2	रवी स्टोन मेटल	अंदाजपत्रक दर

सदर कामासाठी न्युनतम L1 निविदाधारक श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा ३.००० % कमी दराने असल्याने श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ३.००० % कमी दराची निविदा मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना अंतर्गत Proposed development of Bitumen Road at Maharana Pratap Nagar for M.C. Latur. Tender ID 2023_LMC_959322_1 या कामासाठी ई-निविदा क्र. 38/2023-24 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री साईनाथ एन्टर्रपायजेस, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ३.००० % कमी दराने आहे. निविदाकार श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांनी निविदेत सादर केलेल्या अंदाजपत्रक दरापेक्षा ३.००० % कमी दरास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 177 दि. 01/02/२०२५

विषय :- घरोघरी संकलन विलगीकरण वाहतूक आणी महानगरपालिका घनकचरा प्रक्रिया करणे निवीदा मागविण्यासाठी मान्यता देणे बाबत.

प्रस्ताव :-

लातूर शहराची लोकसंख्या साधारण ४.५० लक्ष असून तरंगती लोकसंख्या १ लक्ष आहे. शहरात दैनंदिन लातूर शहर महानगरपालिके मार्फत सरासरी १८० ते २०० टन कचरा गोळा करून वरवंटी कचरा डेपो वर नेला जातो. शहरात निर्माण होणारा घरोघरीचा ओला,सुका वगीकृत कचरा गोळा करणे,वाहतूक करणे व कच-यावर प्रक्रिया करणे करीता प्रति टन दर मागवून निवीदा काढण्याची प्रस्तावित आहे. यामध्ये घरोघरी निघणारा कचरा वर्गीकरण करून ओला, सुका वेगळा गोळा करणे या साठी प्रति टनाचे दर मागविणे, प्रोसेसींग साठी ओला, सुका प्रति टन दर मागविणे. कचरा डेपो वर कच-या प्रक्रिया करून कंपोस्ट खत बनविणे व त्याची विल्हेवाट लावणे या निवीदेत अंतरर्भुत आहे. तरी ५+३ वर्षासाठी निवीदा काढणे बाबत निर्णयास्तव सादर.

निर्णय – घनकचरा व्यवस्थापना हाताळणे नियम २०१६ शासनाने वेळोवेळी घनकचरा व्यवस्थापनाने बाबत दिलेले आदेश व निर्देशानूसार शहरातील प्रतिघर ओला, सुका कचरा गोळा करणे प्रति टन ओला, प्रति टन सुका वाहतूक करणे, कच-यावर प्रोसेसिंग करणे यासाठी ५+३ वर्षासाठी स्वत्रंत निविदा काढण्याचे प्रस्तावास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

विषय क्र.178

(337)

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
(आस्थापना विभाग)

ठराव क्र.- 178 दिनांकः-08/02/2024

विषयः- डॉ. सुहास विष्णूपंत गोरे यांचे लेखी अपिल अर्ज खारीज केल्याबाबत.

प्रस्ताव- डॉ.गोरे सुहास विष्णुपंत हे लातूर शहर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी, मानधन तत्वावर कार्यरत होते. दि.17.12.2019 रोजी लातूर शहर महानगरपालिका आस्थापनेवर त्यांची वैद्यकीय अधिकारी यांचे पथक या विभागात रू. 9300-34800 ग्रेड-पे 4400 या वेतनश्रेणीत कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त (जन्म-मृत्यु) व विवाह नोंदणीसह या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित हे दि.16.07.2020 ते दि.13.08.2020 पर्यंत आजारीकारणावरून रजेवर जात असल्याचा अर्ज सादर केला तदनंतर दि.14.08.2020 पासून विनापरवाना कर्तव्यावर गैरहजर होते. लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रात कोविड-19 चा प्रार्दूभावाच्या कालावधीत ते विनापरवानगी गैरहजर राहून कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याने व कर्तव्यात हयगय केल्याने त्यांना दि.11.01.2022 रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आले.

श्री सुहास गोरे यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे महाराष्ट्र शासन व मा.आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे विरूद्ध रिट पिटीशन क्र.1465/2020 व Civil Application 462/2022 ने प्रकरण दाखल केलेले होते. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दि.25.02.2022 रोजी सदर प्रकरण मा.स्थायी समिती या सक्षम प्राधिका-यापुढे ठेवावे असा निकाल दिला आहे. सदर निर्णयानुसार संबंधितांनी दि.28.03.2022 व स्मरणपत्र दि.30.09.2022 रोजीच्या अर्जान्वये अपिल दाखल केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(4) नुसार एखाद्या प्राधिकारणास काढून टाकण्यात आले किंवा बडतर्फ करण्याचा आदेश कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करता येईल अशी तरतूद नमूद आहे. दि.21.03.2022 रोजी मा. स्थायी समितीची शेवटची सभा झालेली असून तदनंतर महापालिकेचा कार्यकाल दि.21.05.2022 पासून लातूर शहर महानगरपालिकेत मा.प्रशासक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर विषय दि.22 डिसें.2022 रोजी वेळ 3.00 वा. मा.स्थायी समिती तथा प्रशासकासमोर सुनावणीस बोलाविण्यात आले असता अर्जदारांच्या वतीने ॲड.सचिन शिंदे हे उपस्थित राहून पुढील तारखेची मागणी केली असून पुढील 7 दिवसांत लेखी म्हणणे सादर करण्यास सहमती दर्शविली व प्रकरण निकालासाठी राखीव ठेवण्याची मागणी केली आहे. तदनंतर दि.29.12.22 (प्राप्त दि.03.01.2023) रोजी खालीलप्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे.

- लातूर शहर महानगरपालिकेने अपीलार्थीला वैद्यकीय अधिकारी राष्ट्रीय राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतीरीक्त (जन्म मृत्यू व विवाह नोंदणी सह) या पदावर दिनांक 17.12.2019 रोजी कायम नियुक्त केले होते.
- तत्कालीन आयुक्त लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी दिनांक 11.01.2022 च्या आदेशान्वये तडकाफडकी कोणतीही नोटीस न देता सेवेतून काढून टाकण्याचा आदेश पारीत केला आहे. सदर आदेशाच्या नाराजीने अपिलार्थींनी प्रस्तुतचे प्रकरण/अपील मा.स्थायी समिती कडे दाखल केले आहे व सदरचे आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.
- तत्कालीन आयुक्त मनपा लातूर यांनी केलेले सदरचे बडतर्फीचे आदेश रद्द करून अपीलार्थीस पुर्ववत कामावर रूजू करून घेवून बडतर्फी कालावधीमधील वेतन अदा करावे.

Scanned with OKEN Scanner

338

- तत्कालीन आयुक्त यांनी बडतर्फीचे आदेश पारीत करण्यापुर्वी साधी सुचना/नोटीस सुध्दा अपीलार्थीला दिलेली नाही. तसेच चौकशी अधिकारी नियुक्त न करता सरळ बडतर्फ करण्यात आलेले आहे जे की, चुकीचे व बेकायदेशीर आहे.
- तत्कालीन आयुक्त यांचे दिनांक 11/01/2022 चे आदेशाचे बारकाईने अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, त्यांनी महाराष्ट्र नागरीक सेवा (शिस्त व अपील)नियम 1971 मधील नियम 5 पोटनियम 8 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 56 पोटनियम 2 (ग) अन्वये सेवेतून काढून टकण्याचा आदेश केला आहे, परंतु सदरचे आदेश करण्यापुर्वी नियम 8 व 9 च्या तरतूदीचे कोणतेही पालन न करता त्याची पायमल्ली केलेली आहे.
- सदरचे बेकायदेशीर बडतर्फी आदेश पारीत करीत असताना तत्कालीन आयुक्त यांनी कसलेही रेकॉर्ड पाहिलेले नाही व ते न पाहता चुकीच्या निष्कर्षापर्यंत येवून तडकाफडकी चुकीचे व बेकायदेशीर आदेश बडतर्फी आदेश पारीत केले आहेत. अपीलार्थी हे सदर कालावधीमध्ये स्पॅंडेलिसीसचे आजाराने त्रस्त होते तसेच कोवीड-19 च्या संसर्ग त्यांना व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांना झालेला होता त्यामुळे ते रितसर अर्ज देवून रजेवर होते व सदरची रजा ते आजारातून दुरूस्त न झाल्यामुळे वेळोवेळी अर्ज देउन वाढवून घेतलेली होती/आहे. या बाबींकडे त्यांनी लक्ष दिले नाही किंवा त्यावर आदेशामध्ये मत व्यक्त केले नाही. तसेच अर्जदारीने वेळोवेळी रजेच्या अर्जासोबत डॉ. गरड, डॉ. कवठाळे, डॉ. भागाडीया, डॉ. पाटील, डॉ. कारेडूकर, डॉ. किनिकर, डॉ. कानडे, डॉ .भांगाडीया, तसेच शासकीय वैद्दकीय महाविद्दयालय व सर्वोपचार रूग्णालय लातूर येथील डॉ. कुकडे, डॉ. माळी, डॉ. तृप्ती पाटील, डॉ. जाधव, यांच्याकडे त्यांचा उपचार चालू असल्याचे व ते अत्यवस्थ असल्याबाबतचे प्रमाणपत्र व अहवाल दाखल केलेले आहेत ते त्यांनी पाहीलेले नाहीत व चुकीच्या निष्कर्षाच्या आधारे तसेच रागाच्या भरात बेकायदेशीर व चुकीचे बडतर्फी आदेश पारीत केलेले आहे. सदरची सर्व कागदपत्रे अर्जासोबत प्रकरणात दाखल केली आहेत.
- संचिकेचे अवलोकन केले असता असे स्पष्ट निदर्शनास येते आहे, अपीलार्थीने त्याला सेवेत कायम करण्यासाठी व इतर सर्व अनुषंगीक लाभ मिळण्याकरीता वेळोवेळी तत्कालीन नगर परिषद तसेच महानगरपालिका प्रशासनाकडे अनेक वेळा विनंती अर्ज केले होते, परंतु त्याची दखल न घेतल्याने अपीलार्थीने मा .उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे प्रथम याचीका क्रं. 2826/2017 व त्यानंतर याचीका क्रं. 1465/2020 दाखल केले होते. त्यामध्ये न्यायालयाने वेळोवेळी केलेल्या आदेशाप्रमाणे तसेच शासन निर्णयामुळे अपीलार्थीस सेवेत कायम करण्यास भाग पडले या बाबीचा राग मनात धरून बडतर्फी आदेश पारीत केला आहे जो की, चुकीचा व बेकायदेशीर आहे.
- सदरचे बडतर्फी आदेश पारीत करते वेळी कोणत्याही कायदेशीर तरतूदीचे पालन केलेले नसल्यामुळे बडतर्फी आदेश रद्द करावा.
- तत्कालीन आयुक्त मनपा,लातूर यांनी पारीत केलेले बडतर्फी आदेश भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 14 व अनुच्छेद 21 च्या तरतूदींचे पायमल्ली करतात तसेच ते नैसर्गीक न्याय तत्वाच्या विरूध्द आहे. घटनेप्रमाणे कोणत्याही व्यक्तीस शिक्षा देण्यापुर्वी त्यास सुनावणीची संधी देवून व त्याचे म्हणने व बाजू ऐकून घेणे हे बंधनकारक आहे परंतु अपीलार्थीच्या बाबतीत असे घडलेले नाही. संचीकेचे अवलोकन केले असता मा. स्थायी समितीच्या हे स्पष्टपणे लक्षात येईल की, सदरचे बडतर्फीचे आदेश पारीत करण्यापुर्वी अपीलार्थीस सुनावणीची कसलीही संधी देण्यात आलेली नाही किंवा त्याची बाजू ऐकून घेण्यात आलेली नाही. तसेच कोणतीही चौकशी न करता बडतर्फी आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरचे आदेश पूर्णतः बेकायदेशीर व नैसर्गीक

Scanned with OKEN Scanner

न्याय तत्वाच्या विरूध्द आहे म्हणून सदरचे बडतर्फीचे आदेश रद्द करणे न्यायाचे आहे. तत्कालीन आयुक्त यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 5 अन्वये जबर शिक्षा केली आहे परंतु ती करण्यासाठी 8 व 9 नमुद करण्यात आलेली कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही हे स्पष्ट दिसून येते, सदर नियम 8 व 9 प्रमाणे कोणत्याही शिक्षेचे आदेश पारीत करण्यापुर्वी चौकशी करणे, चौकशी अहवाल मागविणे नोटीस देणे आरोप कळविणे, आरोप निश्चित करणे व त्याला सुनावणीची संधी देवून त्याची बाजू ऐकुन घेणे व त्यानंतर कोणत्याही निष्कर्षापर्यंत येणे बंधनकारक आहे. परंतु सदरच्या तरतूदींचे पालन न करता त्याचा स्पष्ट भंग केला आहे हे सकृतदर्शनी दिसून येते.

- त्याचप्रमाणे बेकायदेशीर बडतर्फी आदेश पारीत करताना तत्कालीन आयुक्त यांनी मा.स्थायी समितीच्या हक्कांचा व अधिकारांचा वापर केला आहे. सदरची कार्यवाही करण्यापुर्वी मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक व कायदेशीर रित्या बंधनकारक असताना ही त्यांनी कसलीही पूर्व परवानगी घेतली नाही किंवा स्थायी समितीस साधी सुचनाही दिलेली नाही.
- अपीलार्थी यांनी सलग 25 वर्ष अखंडीत व निष्कलंक सेवा तत्कालीन नगर परिषद व सध्या महानगरपालिकेमध्ये केली आहे. अपीलार्थी स्वतः आजारी पडण्यापुर्वी कोवीड-19 च्या कठीण काळामध्ये त्यांची प्रमाणीक सेवा केली आहे. अपीलार्थी स्वतः आजारी असल्यामुळे रजेचा अर्ज देवून सेवेत गैरहजर होते त्यांनी जाणुनबुजून विना परवानगी सेवेत गैरहजर राहिले नाहीत असे असतानाही अपीलार्थीला कोणतीही नोटीस न देता व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता चुकीच्या मार्गाने सेवेतून बडतर्फ केले आहे. म्हणून सदरचा बडतर्फी आदेश रद्द करून अपीलार्थीला पुर्वलक्षी प्रभावाने सेवेत रूजू करून घेण्यात यावे व बडतर्फी कालावधी मधील वेतन अदा करण्याची विनंती केली आहे.

सदर प्रकरणात दि.21.03.2022 रोजी मा. स्थायी समितीची शेवटची सभा झालेली असून तदनंतर महापालिकेचा कार्यकाल दि.21.05.2022 रोजी संपूष्टात आलेला आहे. शासन आदेश दि. 12 मे 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम 452अ (1) व (2) मधील तरतूदीनुसार लातूर शहर महानगरपालिका येथे प्रशासक पदी आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांची नियुक्ती करण्यांत आली आहे. कलम 452 (2) (क) नुसार स्थायी समितीचे सर्व अधिकार व कर्तव्य प्रशासक या पदामध्ये निहीत करण्यात आले आहेत.

उक्त कलमान्वये प्रशासक (नियुक्त शासकीय अधिकारी) म्हणून मला प्राप्त अधिकारानुसार अंतिम निष्कर्षासाठी खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करत आहे.

अ.क्र.	मुद्दा	उत्तर
1)	अर्जदाराची रजा नियमानुसार वैध ठरते किंवा कसे?	नकारार्थी
2)	बडतर्फीचा आदेश नियमातील तरतुदीनूसार आहे किंवा कसे?	होकारार्थी
3)	अर्जदाराचे अपिल मान्य करण्या योग्य आहे किंवा कसे?	नकारार्थी

मुद्दा क्र. 1. श्री. सुहास गोरे यांचा अर्ज आवक क्र. 11968 दि. 16/07/2020 या अन्वये संबंधीतांनी दि.16/07/2020 ते दि.. 13/08/2020 पर्यंत वैद्यकीय रजेवर जात असले बाबत कार्यालयास कळविले आहे. परंतु दि. 14/08/2020 नंतर कार्यालयास कसलीही सुचना न देता विनापरवानगी गैरहजर आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा

Scanned with OKEN Scanner

(340)

(रजा) नियम 1981 मधील नियम 48 (२) अन्वये रजा संपल्यानंतर बुध्दीपुरस्पर कामावर अनुपस्थित राहणारा कर्मचारी शिस्त भंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल अशी तरतुद असल्याने मी त्यास नकारार्थी संमती दर्शवित आहे.

मुद्दा क्र.2. तत्कालीन आयुक्त यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 5 पोटनियम (8) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56 पोटनियम 2 (ग) नुसार सेवेतून काढून टाकणे मात्र भावी काळात शासकीय नौकरी मिळण्याच्या दृष्टीने अनर्हता ठरणार नसल्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने डॉ. सुहास गोरे, वैद्यकीय अधिकारी राष्ट्रीय/राज्य आरोग्य कार्यक्रम व्यतिरिक्त (जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी सह) यांना लातूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यालयीन आदेश जा.क्र./लाशमनपाला/सामान्य प्रशासन विभाग/कावि/704/2022 दि. 11/01/2022 अन्वये काढून टाकले आहे. त्यास मी होकारार्थी संमती दर्शवित आहे.

मुद्दा क्र. 3. 1 व 2 च्या अनुषंगाने मी अर्जदाराचे अपिल मान्य करण्यास योग्य आहे किंवा कसे यास मी नकारार्थी संमती दर्शवित आहे.

निर्णयः- सदर प्रकरणात संबंधित डॉ. सुहास विष्णूपंत गोरे यांचे लेखी अपिल अर्ज खारीज केलेल्या निर्णयास मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

(341)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 179 दिनांक 9/2/2024

विषयः- ठाकरे चौक येथील नागरी बेघरांसाठी निवारा बांधकामाच्या ठिकाणी गार्डन सुशोभिकरण (Land Scapinng) कंपाऊंड वॉल, नाली बांधणे व स्लॅब टाकणे, विद्युतीकरण करणे बाबत.

प्रस्तावना-

ठाकरे चौक येथील नागरी बेघरांसाठी निवारा बांधकाम करणेचे काम प्रगतीपथावर असुन तेथील खुल्या जागेत गार्डन सुशोभिकरण (Land Scapinng), कंपाऊंड वॉल बांधणे, नाली बांधून त्यावर स्लॅब टाकणे व परिसरात विद्युतीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामे करणेकरिता रुपये- १,३४,३१,४९२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदर काम जिल्हा नियोजन समिती अंतर्गतच्या नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत हाती घेणेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे.

तरी याबाबत निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः-

ठाकरे चौक येथील नागरी बेघरांसाठी निवारा बांधकामाच्या ठिकाणच्या खुल्या जागेत गार्डन सुशोभिकरण (Land Scapinng), कंपाऊंड वॉल बांधणे, नाली बांधून त्यावर स्लॅब टाकणे व परिसरात विद्युतीकरण करणेकरिता रुपये- १,३४,३१,४९२/- च्या अंदाजपत्रकास आर्थीक मान्यता देण्यांत येते. तसेच सदर काम जिल्हा नियोजन समिती अंतर्गतच्या नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत हाती घेणेस मान्यता देण्यांत येते. प्रशासनाने आवश्यक ती पुढील प्रशासकीय कार्यवाही करावी.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

(342)

ठराव क्रं. 180 **दि.** 09 / 02 / **2024**

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेच्या कामाच्या निविदा दर मंजुरी बाबत.

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 10 / 2023-24 Tender ID 2024_LMC_979364_1 मागविण्यात आले होते. ई-निविदा बाबतची माहिती खालील तपशिला प्रमाणे आहे.

1. ई-निविदा मागवलेला दि. 05.01.2024 ते 05.02.2024
2. ई-निविदा उघडणेचा दि. 06.02.2024

प्रस्तावित निविदेस एकुण चार निविदा प्राप्त असल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार दिनांक 06.02.2024 रोजी निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये 1) आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. 2) भुगन इन्फ्राकॉन प्रा. लि. 3) व्रज कन्स्ट्रक्शन 4) जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद असे एकुण चार निविदाधारक प्राप्त झाले. सदर निविदा धारकाचे कागदपत्रांची तपासणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता उपरोक्त निविदाधारकापैकी आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. व भुगन इन्फ्राकॉन प्रा. लि. हे अपात्र ठरले आहेत. उर्वरीत दोन निविदाधारक व्रज कन्स्ट्रक्शन व जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद हे पात्र ठरल्याने दोन्ही पात्र निविदा धारकांचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. पात्र निविदा धारकांचा दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्रं.	निविदाकार	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	व्रज कन्स्ट्रक्शन	250,41,17,824/-	1.00% अधिक म्हणजेच रक्कम रु. 252,91,59,002/-
2	जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद		0.550% कमीचे म्हणजेच रक्कम रु. 249,03,45,176/-

प्राप्त दोन निविदा धारकाचे दरापैकी सर्वात कमीचे दर जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 250,41,17,824/- पेक्षा 0.550% कमीने म्हणजे रु. 249,03,45,176/- आहे.

तरी जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे सर्वात कमीचे 0.550% कमीने म्हणजे रु. 249,03,45,176/- दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना राबविणेसाठी मे. जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद यांचे सर्वात कमीचे दरास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. शासन परिपत्रकाप्रमाणे प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात यावा व शासन निर्देशाप्रमाणे आयुक्त यांनी पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

नगर सचिव
लातर शहर महानगरपालिका. लातर

प्रशासक
लातर शहर महानगरपालिका. लातर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 181 दि. 21/02/2024

प्रस्तावः-

विषयः- अंतर्गत लेखापरिक्षण क्षमापन प्रस्ताव

लातूर शहर महानगरपालिका, लातूरचे मंजूर आकृतीबंधानुसार सन २०१५-१६ या वर्षामध्ये मुख्य लेखापरीक्षकाचे पद दि.२९.०४.२०१५ पासून भरण्यात आले असून एक सहाय्यक लेखापरीक्षकाची दि. ०८.०९.२०१७ पासून व दुस-या सहा. लेखापरीक्षकाची नियुक्ती दि.०३.०१.२०१८ पासून व दोन कनिष्ठ लिपिकाचे पदे १८.०९.२०१७ रोजी भरण्यात आले आहेत. त्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे. अंतर्गत लेखापरीक्षणाची पदे सन २०१५-१६ मध्ये रिक्त असल्याने सन २०१५-१६ या वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम करता येणे शक्य न झाल्याने सदर बाब क्षमापन करून कार्योत्तर मंजूरी प्रदान करणेस्तव सादर.

निर्णयः-

लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार सन २०१५-१६ मध्ये सहाय्यक लेखा परीक्षक व कनिष्ठ लिपिक ही पदे रिक्त होती. त्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षणाची कामे नियमित होऊ न शकल्याने सदर कामे प्रलंबित राहिली होती. परंतु एक सहा. लेखापरीक्षक दि. १८.०९.२०१७ पासून, दुसरे सहा. लेखापरीक्षक दि. ०३.०१.२०१८ पासून आणि दोन कनिष्ठ लिपिकांची पदे दि. १८.०९.२०१७ रोजी भरल्यानंतर अंतर्गत लेखापरीक्षकाचे कामकाज नियमितपणे सुरू करण्यात आलेले आहे.

अंतर्गत लेखापरीक्षण विभागातील पदे वर नमूद केल्याप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षात रिक्त असल्याने अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज प्रलंबित होते, त्यामुळे सन २०१५-१६ या वर्षाचे लेखा परीक्षणाचे काम करता येणे शक्य न झाल्याने, सदर बाबीस क्षमापित करून कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
तूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 182 दिनांक: 27/2/२०२४

विषय:- ई-निविदा क्र. ३९/२०२३-२४ (E-Tender ID-2023_LMC_959120_1) अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना: मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे प्र.मा.आदेश क्र.२०२३/नपाप्र/प्रमा/नगरोत्थान/कावी-४८० दि. ३१/०३/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गतच्या खालील कामाची ई-निवीदा सुचना क्र.३९/२०२३-२४ अन्वये रुपये- ४१,६६,४२०/- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता किंमत
1.	Development of road from Mayurban colony to Mayurban colony D.P. road at ambejogai road for M.C.Latur	49,99,733/-

त्यानुसार सदर कामांसाठी एच.के.कन्स्ट्रक्शन, दावणगाव, रवी स्टोन मेटल, घरणी, शिगे कन्स्ट्रक्शन, लातूर, श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर, मे.अथर्व कन्स्ट्रक्शन, लातूर, साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर, ए.डी.बी. इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद, उदय कन्स्ट्रक्शन, लातूर हे ०८ निवीदाधारक सहभागी झाले.

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र. ०१ (कागदपत्र) दि.२०/११/२०२३ रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करुन निवीदा समितीने सहभागी सर्व ०८ निविदाधारकांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन निवीदाधारकांकडून कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक

1) एच.के.कन्स्ट्रक्शन, दावणगाव ता.जि.लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८३६ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

F) Details of other works tendered for and in hand with the value of work unfinished on the last date of submission of tender (In the proforma of Statement No. I on Page No.30 the certificate from the Head of the Offices under whom the works are in progress should be enclosed.

G) the List of Owned or Hired Machinery immediately available with the tenderer for use on this work and list of machinery proposed to be utilized on this work, but not immediately available and the manner in which it is proposed. (In the proforma of Statement No. II, Statement No.2 (A) and Statement No.2 (B) on Page No.30, 32 and 34 respectively.).

H) Details of work of similar type and magnitude carried out by the contractor during last Three years i.e., 2020-2021, 2021-2022 2023-2024 (In the proforma of Statement No. III, Page No.35).

I) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).

J) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter copy of affidavit in respect of genuiness of documents contained in the Envelope No.1 in the prescribed format given on Page No.39.

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी वरील कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ रोजी सादर केलेली आहेत. योग्य कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

2) रवी स्टोन मेटल, घरणी ता.चाकूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८३९ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

F) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).

G) Employee Provident Certificate & Last 3 Months Returns / Challan (Employees' Wages Challan)

H) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work.

Scanned with OKEN Scanner

(Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter

I) Paver Finisher with SCADA 1 Number (Owned/Hired)
J) Mechanical Bitumen Sprayer 1 Number (Owned / Hired)

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. परंतु विहीत मुदतीत निविदाधारक यांनी कागदपत्र सादर केले नाहीत त्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले.

3) शिगे कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८३८ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

P) Details of other works tendered for and in hand with the value of work unfinished on the last date of submission of tender (In the proforma of Statement No. I on Page No.30 the certificate from the Head of the Offices under whom the works are in progress should be enclosed.
Q) the List of Owned or Hired Machinery immediately available with the tenderer for use on this work and list of machinery proposed to be utilized on this work, but not immediately available and the manner in which it is proposed. (In the proforma of Statement No. II, Statement No.2 (A) and Statement No.2 (B) on Page No.30, 32 and 34 respectively.). The distance between work site and plant site is 35 km. It shall be mandatory to verify the same from the Engineer authorized by the office and submit the certificate along with the tender document.
R) Details of work of similar type and magnitude carried out by the contractor during last Three years i.e., 2020-2021, 2021-2022 2023-2024 (In the proforma of Statement No. III, Page No.35).
S) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).
T) Valid Professional Tax Registration Certificate in the form of PTR and PTE under section (1) of section 5 of Maharashtra State Tax on Profession, Trade callings and Employment Act 1975, Rule 3 (2) for employees including technical personnel from the Professional Tax office of the concerned District of Maharashtra.
U) Employee Provident Challan (Employees' Wages Challan)
V) Three similar works each having minimum estimated cost of Rs.16.61 Lakhs at price level 2022-23. Or) Two similar works each having minimum estimated cost of Rs.24.41 Lakhs at price level 2022-23. Or One similar work of value not less than Rs.34.26 Lakhs at price level 2022-23.
W) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter
X) SCADA enabled Drum Mix Hot Mix Plant Having Capacity 75 to 100 Tonnes Per Hour / DM-50 of any standard company. 1 Number (Owned/Hired)
Y) Paver Finisher with SCADA 1 Number (Owned/Hired)
Z) Mechanical Bitumen Sprayer 1 Number (Owned / Hired)
AA) Hydraulic Broomer 1 Number (Owned/Hired)
BB) Vibratory Roller for WBM/WMM Work 1 Number (Owned/Hired)
CC) Vibratory Roller for Bituminous Work 1 Number (Owned/Hired)
DD) Contractor Minimum Number of Technical Technical Staff Qualification required Staff Person Project in charge, Plant / SCADA system supervisor, copy of affidavit in respect of genuiness of documents contained in the Envelope No.1 in the prescribed format given on Page No.39.

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. परंतु विहीत मुदतीत निविदाधारक यांनी कागदपत्र सादर केले नाहीत त्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले.

4) श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८३७ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

J) Achieved a minimum annual financial turnover (in all classes of civil engineering construction works only) of Rs.34.26 Lakhs at price level of 2023-24 in any one year of last Three years i.e., 2020-2021, 2021-2022 2023-2024 (Information to be given only in proforma of Statement No. V on page No.37). Above turnover should be certified by the registered Chartered Accountant.
K) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter
L) Paver Finisher with SCADA 1 Number (Owned/Hired)
M) Mechanical Bitumen Sprayer 1 Number (Owned / Hired)
N) Hydraulic Broomer 1 Number (Owned/Hired)
O) Vibratory Roller for WBM/WMM Work 1 Number (Owned/Hired)
P) Vibratory Roller for Bituminous Work 1 Number (Owned/Hired)

Scanned with OKEN Scanner

Q) Truck / Tipper 2 Number (Owned/Hired)
R) Excavator / JCB 1 Number (Owned/Hired)

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी वरील कागदपत्रे दि.०८/०२/२०२४ रोजी सादर केलेली आहेत. योग्य कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

5) मे.अथर्व कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८४० दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

I) The distance between work site and plant site is 35 km. It shall be mandatory to verify the same from the Engineer authorized by the office and submit the certificate along with the tender document.
J) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).
K) Valid Professional Tax Registration Certificate in the form of PTR and PTE under section (1) of section 5 of Maharashtra State Tax on Profession, Trade callings and Employment Act 1975, Rule 3 (2) for employees including technical personnel from the Professional Tax office of the concerned District of Maharashtra.
L) Employee Provident Certificate & Last 3 Months Returns / Challan (Employees' Wages Challan
M) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter
N) SCADA enabled Drum Mix Hot Mix Plant Having Capacity 75 to 100 Tonnes Per Hour / DM-50 of any standard company. 1 Number (Owned/Hired)
O) Mechanical Bitumen Sprayer 1 Number (Owned / Hired)
P) Excavator / JCB 1 Number (Owned/Hired)
copy of affidavit in respect of genuiness of documents contained in the Envelope No.1 in the prescribed format given on Page No.39.

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी वरील कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ रोजी सादर केलेली आहेत. योग्य कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

6) साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८४१ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

D) The distance between work site and plant site is 35 km. It shall be mandatory to verify the same from the Engineer authorized by the office and submit the certificate along with the tender document.
E) Employee Provident Certificate & Last 3 Months Returns / Challan (Employees' Wages Challan)
F) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी कामांचे Quantities चे स्टेटमेंट शासकीय कार्यालयाचे न देता स्वतःचे लेटरपॅडवर दि.०९/०२/२०२४ रोजी सादर केले आहे. प्लँट ते वर्क साईट अंतराचे प्रमाणपत्र, ई.पी.एफ. चलन सादर केले नाही. योग्य कागदपत्रे सादर न केल्याने त्यांना अपात्र करण्यात आले.

7) ए.डी.बी.इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद यांना कार्यालयीन पत्र क्र.८४२ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

F) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).
G) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38) iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter
H) Paver Finisher with SCADA 1 Number (Owned/Hired)
I) Hydraulic Broomer 1 Number (Owned/Hired)
J) Vibratory Roller for Bituminous Work 1 Number (Owned/Hired)

Scanned with OKEN Scanner

(३५१)

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने निविदाधारक यांनी वरील कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ रोजी सादर केलेली आहेत. योग्य कागदपत्रे सादर केल्याने त्यांना पात्र करण्यात आले.

8) उदय कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र.८४३ दि.०७/०२/२०२४ चे अनुषंगाने

F) The distance between work site and plant site is 35 km. It shall be mandatory to verify the same from the Engineer authorized by the office and submit the certificate along with the tender document.

G) Details of Technical personnel on the rolls of the tenderers (In the proforma of Statement No. IV on Page No.36).

H) Valid Professional Tax Registration Certificate in the form of PTR and PTE under section (1) of section 5 of Maharashtra State Tax on Profession, Trade callings and Employment Act 1975, Rule 3 (2) for employees including technical personnel from the Professional Tax office of the concerned District of Maharashtra.

I) Employee Provident Challan (Employees' Wages Challan)

J) Satisfactorily executed in any One Year of last sevan years i.e., 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-2021, 2021-2022 2023-24 following minimum quantities of work. (Information to be given only in proforma of Statement No. VI on page No.38)) i) Tack Coat 2496.00 Square Meter ii) Bituminous Macadam 164.70 Cubic Meter iii) Bituminous Concrete 54.90 Cubic Meter

ही कागदपत्रे दि.०९/०२/२०२४ पर्यंत सादर करणे बाबत कळविण्यात आले परंतु विहीत मुदतीत . निविदाधारक यांनी वरील कागदपत्र सादर केले नाहीत त्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक एच.के.कन्स्ट्रक्शन, श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, मे.अथर्व कन्स्ट्रक्शन, ए.डी.बी.इन्फ्रास्ट्रक्चर या चार निविदाधारकांचा लिफाफा क्र.०२ (Financial Bid) दि.१६/०२/२०२४ रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	निवीदाधारकाचे नाव	निविदेत दिलेले दर
१	एच.के.कन्स्ट्रक्शन, दावणगाव	अंदाजपत्रक दरापेक्षा ११.००० % कमी
२	**श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर**	**अंदाजपत्रक दरापेक्षा २१.००० % कमी**
३	मे.अथर्व कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा ११.२२० % कमी
४	ए.डी.बी.इन्फ्रास्ट्रक्चर, शिरुर ताजबंद	अंदाजपत्रक दरापेक्षा १४.४१० % कमी

सदर कामासाठीचे न्युनतम दराचे (L1) निवीदाधारक श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा २१.००% कमी दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर तसेच अंदाजपत्रकामधील बाबीमध्ये होणा-या वाढ / घट व Extra Item ला मान्यता देणेस्तव सादर.

निर्णयः- Development of road from Mayurban colony to Mayurban colony D.P. road at ambejogai road for M.C.Latur E-Tender ID-2023_LMC_959120_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा २१.००% कमी असल्याने निवीदाकार श्री साईनाथ एन्टरप्रायजेस, लातूर यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते व अंदाजपत्रकामधील बाबीमध्ये होणा-या वाढ / घट व Extra Item ला मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 183 दिनांक :27/2/२०२४

विषय :- लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील सन २०२३-२४ रस्त्यावरील मोकाट/ बेवारस फिरणारे जनावरे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी इत्यादी जनावरे पकडणे, मोकाट जनावरांचे संगोपन करणे, आजारी जनावारांना औषधोपचार करणे या कामासाठी संस्थेची आर्धा एकर जागा, वाहन इंधनसहीत चालक व मनुष्यबळासहित कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे बाबत.

प्रस्ताव -

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, मा. आयुक्त यांची मान्यता दिनांक ०२/०२/२०२४ नुसार लातूर मनपा हद्दीतील कोडवाडयासाठी स्वत:ची जागा व पशुवैद्यकिय दवाखाण्याची सोय नसल्यामुळे मोकाट, बेवारस, आजारी फिरणाऱ्या जनावरांना उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी इत्यादी जनावरे पकडून स्वत:चे वाहन, जागा, मनुष्यबळ, आजारी जनावरांना औषधोपचार करणे व ७ दिवस संगोपन करणे नंतर प्रशानाच्या आदेशानुसार गोरक्षण संस्थेकडे जनावरे वर्ग करणे इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा मागविण्यात येत असून यासाठी वार्षिक अंदाजित खर्च रू. ३० लाख अपेक्षीत कमी जास्त असून तीन वर्षासाठी रू. ९० लाख अंदाजित गृहित धरण्यात आलेला आहे. वरील बाबी लेखाशिर्षकामध्ये नमुद आहे.

त्याकरीता सदरील कामासाठी कामाच्या तपशिल निहाय ई-निविदा मागविण्याकरीता प्रस्ताव निर्णयास्तव व आर्थिक प्रशासकिय मान्यतेस्तव सादर.

निर्णय -

मनपा हद्दीतील कोडवाडयासाठी स्वत:ची जागा व पशुवैद्यकिय दवाखाण्याची सोय नसल्यामुळे मोकाट, बेवारस, आजारी फिरणाऱ्या जनावरांना उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी इत्यादी जनावरे पकडून स्वत:चे वाहन, जागा, मनुष्यबळ, आजारी जनावरांना औषधोपचार करणे व ७ दिवस संगोपन करणे नंतर प्रशानाच्या आदेशानुसार गोरक्षण संस्थेकडे जनावरे वर्ग करणे इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा काढणेस्तव व कामे करून घेण्यास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

(आरोग्य विभाग)

ठराव क्र 184 दि. 27/02/2024

विषय : १५ व्या वित्त आयोग व एनयुएचएम अंतर्गत औषधी खरेदीबाबत..

प्रस्ताव :

१५ व्या वित्त आयोग व एनयुएचएम अंतर्गत औषधी खरेदीसाठी निधी मंजूर असून त्यातून १४० प्रकारचे औषध/ साहित्य खरेदीसाठी जीईएम पोर्टलवर निविदा प्रसिद्ध करावयाची आहे.

त्यानुसार जीईएम पोर्टलवरीलवर १४० प्रकारचे औषध/ साहित्य खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध करण्याचे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

निर्णय:- १५ व्या वित्त आयोग व एनयुएचएम अंतर्गत जीईएम पोर्टलवरीलवर १४० प्रकारचे औषध/ साहित्य खरेदीसाठी निविदा प्रसिद्ध करण्याचे प्रस्ताव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

(१८७)

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 28/2/2024

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> 185 अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे **FIRE WATER TENDER ON 14 TON** खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर मंजूर करणे बाबत..

प्रस्तावः-

जिल्हा वार्षिक योजना सन 2023-24 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू. **2,60,20,000/-** निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी लातूर यांचे पत्र क्र.2023/नपाप्र/अग्नि/कावि-2173 दिनांक 02.02.2024 अन्वये या कार्यालयास वितरित केलेले अग्निशमन अनुदान रक्कम रु.**2,60,20,000/-** रुपयास प्रशाकिय मान्यता प्रदान केले आहेत.

तसेच मा.आयुक्त लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तिचे व वित्तीय अधिकाराचे तसेच मा.संचालक,अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन यांचे तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तिचे काटेकोर पालन करणे व ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत कळविले आहेत त्यानुसार प्रशाकिय मान्यता प्राप्त झाले प्रमाणे ई-निविदा मागविणेत आले असता एकूण 03 निविदाधारकांनी (ठेकेदारांनी)सहभाग नोंदविले त्यात **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे दर सर्वात कमीचे आसुन वाटा-घाटीने दररचा तपसिल खलिल प्रमाणे.

आ. क्र.	वाहनाचा तपसिल ⇩ कंपनीचे नाव ⇨	एकूण नग	NIDHI ENTERPRISES, MUMBAI		शेरा
			प्राप्त निविदेतील दर "A"	वाटाघाटीने कमी केलेले दर "B"	
1	2	3	4	5	6
1	Design,Construction,Fabrication,Erection, Testing and Commission of **Fire Water Tender on 14 ton** GVW BS-VI Chassis. (Inclusive Of Chassis)	02	2,59,80,000/-	2,59,30,000/-	

तरी प्रस्तावित प्रस्तावाप्रमाणे कॉलम क्र. 05 प्रमाणे वाटाघाटीने कमी केलेले दरपत्रक रू. **2,59,30,000/-** खर्चास अर्थिक व प्रशासकिय मान्यतेसह खर्च करणेच्या मंजूरीस्तव सादर.

<u>निर्णयः-</u> अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे **FIRE WATER TENDER ON 14 TON** खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर रक्कम रू. **2,59,30,000/-** खर्च करणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

(351)

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र. 186 दिनांक: 01/03/२०२४

विषय: जनहिताच्या/उपयोगी कामांच्या मागणी/विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही होणे बाबत.

प्रस्तावना: प्रशासनाकडे शहरातील नागरिकांनी विकास कामे करणेसाठी आलेल्या निवेदनानुसार व केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने खालील कामे करणे गरजेचे असल्याने जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत अंतर्गत हाती घेणेसाठी सादर.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.किंमत रु.
१	गौतम नगर व इतर ठिकाणी बँचेस बसविणे	१०,००,०००
२	गौतम नगर येथे ओपन जीम करणे	१०,००,०००
३	गायत्री नगर येथे ओपन जीम करणे	१०,००,०००
४	गौतम नगर येथे दिशादर्शक फलक लावणे	१०,००,०००
५	प्रभाग क्र. १४ मध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक फलक लावणे	१०,००,०००
६	खाडगाव रोड ते फकिरा चौक येथे साईडपट्टया करणे	१०,००,०००
७	गौतम नगर खणी सभोवती संरक्षक भिंत उभारणे	१०,००,०००
८	गौतम नगर दवाखाना येथे लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसविणे	१०,००,०००
९	गौतमनगर येथे गिरी ते साळवे रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१०	प्रभाग क्र. ४ इस्लामपुरा झोपडपट्टी समोरील नाली बांधणे	१०,००,०००
११	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे राजू बनसोडे ते नरसिंग घरापर्यंत नाली बांधणे	१०,००,०००
१२	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे गफार शेख ते रिंग रोडपर्यंत नाली बांधणे	१०,००,०००
१३	प्रभाग क्र. १ सम्राट अशोक नगर येथे गफार शेख ते रिंग रोडपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१०,००,०००
१४	प्र.क्र.१८ मजगे नगर पसिरात सिलकोटे रस्ते करणे (कारपेट)	१०,००,०००
१५	प्र.क्र.१८ नंदनवन कॉलनी पसिरात सिलकोटे रस्ते करणे (कारपेट)	१०,००,०००
१६	प्र.क्र.१८ पिनाटे नगर पसिरात सिलकोटे रस्ते करणे (कारपेट)	१०,००,०००
१७	प्र.क्र.१८ मजगे नगर नागोबा मंदिर येथे नाली करणे.	१०,००,०००
१८	प्र.क्र.१८ मजगे नगर येथे लोखंडे घर ते स्क्रॅप मार्केट नाली करणे.	१०,००,०००
१९	प्र.क्र.१८ माताजी नगर पौळ किराणा ते ओम ॲक्वा रोड करणे.	१०,००,०००
२०	प्र.क्र.१८ शंकरपुरम परिसरात रस्ते करणे.	१०,००,०००
२१	प्र.क्र.१५ हाके नगर येथील गिरी, गायकवाड यांच्या घरापर्यंत नाली करणे.	१०,००,०००
२२	प्र.क्र. १५ हाके नग येथील बॉईज हॉस्टेल समोरील पेव्हर ब्लॉक करणे.	१०,००,०००
२३	प्र.क्र.१५ हाके नगर येथे विविध ठिकाणी नाली करणे.	१०,००,०००
२४	प्र.क्र.१५ विश्व सुपर मार्केट ते मारोती मंदिर डांबरीकरण करणे.	१०,००,०००
२५	प्र.क्र.१५ मलंग यांच्या घरापासून ते जुनी आदर्श कॉलनी रोड करणे.	१०,००,०००
२६	प्र.क्र.१५ पाठक यांच्या घापासून ते बाकील यांच्या घरापर्यंत डांबरीकरण करणे.	१०,००,०००
२७	प्र.क्र.१५ नरसिंह फलटणकर ते मार्डिकर यांच्या घरापर्यंत नाली करणे.	२०,००,०००
२८	प्र.क्र.१५ नारायण नगर व सिताराम नगर येथे विविध ठिकाणी नाली करणे	२०,००,०००
२९	प्र.क्र.१५ जयेश झेरॉक्स ते इंटरगेट क्लासेस पर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००

Scanned with OKEN Scanner

३०	प्र.क्र.१५ मध्ये शहा यांच्या घरापासून ते ओसिया ज्वेलर्स पर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३१	प्र.क्र.१५ मध्ये जिवने यांच्या घरापासून ते श्री ब्रह्मानंद अपार्टमेंट पर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३२	प्र.क्र.१५ मध्ये एम.एम.पान शॉप ते पाटील यांच्या घरापर्यंत दोन्ही साईड नाली करणे.	१०,००,०००
३३	प्र.क्र.१५ मध्ये सुशिलादेवी ज्वेलरी दुकानापासून ते माने यांचे घरापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३४	प्र.क्र.१५ मध्ये मजगे यांचे घर सदानंद प्रा. शाळेपर्यत रस्ता करणे.	१०,००,०००
३५	प्र.क्र.१५ मध्ये दत्तकृपा किराणा दुकान ते डॉ. कुलकर्णी यांचे घापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३६	प्र.क्र.१५ मध्ये सभा रेसिडेन्सी ते कुलकर्णी यांचे घरापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३७	प्र.क्र.१५ मध्ये कावळे यांचे घर ते डॉ. गणगे यांचे घरापर्यंत रस्ता करणे.	१०,००,०००
३८	प्र.क्र.१८ पटेल नगर सचिन किराणा ते जगन्नाथ हालसे रोड करणे.	१०,००.०००
३९	प्र.क्र.१८ पटेल नगर जोगदंड घर ते हनुमान मंदीर रोड करणे.	१०,००.०००
४०	प्र.क्र.१८ माताजी नगर चॉंद किराणा ते कोटलवार घर रोड करणे.	१०,००.०००
४१	प्र.क्र.१८ माताजी नगर लोखंडे घर ते टॉवर लाईन रोड करणे.	१०,००.०००
४२	प्र.क्र.१५ मध्ये व्यंकटेश नगर पाटी ते कटके यांचे घरापर्यंत डांबरीकरण करणे.	१०,००.०००
तसेच मनपा हद्दीतील महिलाच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५% व दिव्यांग व्यक्तीच्या नांवे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्यकरामध्ये ५%,सुवतंत्र सैनिक व त्याच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५०%, व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर सामन्य करामध्ये प्रति वर्ष ५% सूट देणे योग्य होईल तसेच सदरचा लाभ इमारतीमध्ये व इमारतीच्या परिसरामध्ये दोन्ही प्रकल्प जरी राबवण्यात आले असतील तरीही एकच बाबीचा लाभ मालमत्ताधारकांस देणे योग्य होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराच्या उत्तपनाचे एकमेव स्त्रोत असून सन २०२४-२५ या अर्थिक वर्षामध्ये थकीत मालमत्ता व उपकराची मागणी रू,११९ कोटी आहे. तसेच शास्तीची रककम रू, ५५ कोटी आहे. सदर थकीत रक्कम वसूल करण्यासाठी तसेच महानगरपालिकेच्या उत्तपन वाढीच्या दृष्टीकोणातून महानगरपालिका हद्दीतील विविध घटकाना थकीत व चालू कराचा एक रक्कमी भरणा करणा-या मालमत्ताधारकास सामान्य करामध्ये खालील प्रमाणे लाभ देवुन कर वसूली करणे महानगरपालिकेच्या अर्थिक हिताचे होईल.या बाबत इतर महानगरपालिकाना विचारणा केली असता सदर महानगरपालिकेने मालमत्ताकर व मनपाच्या उपकरावर वेगवेळी सूट देण्यात आल्याची प्रत सादर केली आहे.या बाबतच्या अधिनियमातील तरतूदी खालील प्रमाणे सादर.

१. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास जुन २०२४ आखेर पर्यंत ७%मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.
२. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास जुलै २०२४ पर्यंत ६%मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.

Scanned with OKEN Scanner

३. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास ऑगष्ट २०२४ पर्यंत ५% मालमत्ता करामध्येसुट देण्यात येत.

४. महिलाच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५% सूट देण्यात येते.

५. दिव्यांग व्यक्तीच्या नांवे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्यकरामध्ये ५% सूट देण्यात येते (शासन नियमानुसार व जिल्हा शैल्यचिकीत्सक यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र लाभधारकास सादर करणे आवश्यक असेल.)

६. स्वतंत्र सैंनिक व त्यांच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५०% सूट देण्यात येते

७. सन २०२४-२५ या अर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर सामन्य करामध्ये प्रति वर्ष दोन्ही बाबीसाठी ५% सूट देण्यात येते.

८. जे मालमत्ताधारक ऑन लाईन कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस जुन,जुलै,व ऑगष्ट २०२४ आखेर देय सामान्यकरामध्ये ३% सूट देण्यात येते.

९. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहानाकरिता चार्जिग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इतर इलेक्ट्रीक्ल वाहनधारकांना चार्जिग सुविध्दा उपलब्ध केल्यास शासन निर्णयानुसार देय मालमत्ताकराच्या सामान्यकरावर २% सूट देण्यात येते.

जे मालमत्ताधारक उक्त देण्यात आलेल्या मुदतीमध्ये थकीत व चालू मालमत्ताकराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ मधील प्रकरण आठ कलम ४१ अन्वये प्रति महा २% शास्तीची आकारणी करुन वसुली करण्यात यावी.तसेच मालमत्ता सील,आटकावणी करण्याचे अधिकार क्षेत्रीय अधिकारी ए,बी,सी,डी,यांना प्रधान करण्यात येत आहे, तसेच वरील योजनांपैकी (महिलांकरीता / दिव्यांग / इलेक्ट्रीक / स्वातंत्र सैनिक / माजी सैनिक / रेनवाटर / सोलार) पैकी केवळ एकच योजना लागू राहिल. त्यासोबत मालमत्ता करावरील सुट व ऑनलाईन सुट नियमानुसार लागू राहील.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

875

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 197 दि. 12/06/2024

विषय क्र

विषयः- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महानगरपालिका शाळा क्र.9 येथील कंत्राटी स्वरुपात कार्यरत (3) शिक्षकांना मुदत वाढ देणे बाबत

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महानगरपालिका शाळा क्र.9 येथील इयत्ता 9 वी 10 वी वर्गाला अध्यापन करण्याकरीता असलेले 1. श्री. दिवे विलास माधवराव 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी या तीन कंत्राटी शिक्षकांना शैक्षणीक वर्षे सन 2023-24 साठी दि. 19/07/2023 च्या ठराव क्र.131 ने मंजुरी देण्यात आली होती.

तरी याही वर्षी चालू शैक्षणीक वर्षासाठी वरील शिक्षकांना सन 2024-2025 साठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 येथील तीन कंत्राटी शिक्षकांना दि. 02 जून 2024 ते 30 एप्रिल 2025 पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव सादर.

निर्णयः-

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महानगरपालिका शाळा क्र.9 येथील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियुक्त आसलेले सहशिक्षक 1. श्री. दिवे विलास माधवराव 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी यांना शैक्षणिक वर्ष सन.2023-2024 साठी देण्यात आलेली मुदतवाढ दि.30/04/2024 रोजी संपली आसल्याने शैक्षणिक वर्ष सन 2024-2025 करिता उक्त तीन (3) कंत्राटी शिक्षकांना दि. 02 जून 2024 ते 30 एप्रिल 2025 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्र. 198 दिनांक :12.06.2024

प्रस्ताव :-

लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत सुरु असलेल्या शाळांकरीता शालेय साहित्य खरेदी बाबत.

लातूर शहर महानगरपालिका शिक्षण अविभाग अंतर्गत इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंतच्या एकूण 13 शाळा आणि इयत्ता 1 ली ते 7वी पर्यंतचे 2 आणि इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतचे वर्ग असणारी 01 शाळा असे एकूण 16 शाळा सुरु असून त्यामध्ये जवळपास 1200 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत .

उपायुक्त (शिक्षण)यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेतलेल्या महानगरपालिकेच्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बैठकीत सर्व मुख्याध्यापकांनी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी गरीब तसेच मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्याने या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी स्कूलबॅग, उजळणी पुस्तके वह्या संच, पेन संच, ई.शालेय साहित्य (अंदाजे खर्च रक्कम रु.6.20 लक्ष)तसेच इयत्ता 9 वी , 10 वी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तके (अंदाजे खर्च 1.12 लक्ष) उपलब्ध करून देणे बाबत विनंती केली आहे

कारीता लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत सुरु असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी स्कूलबॅग, उजळणी पुस्तके वह्या संच, पेन संच, ई.शालेय साहित्य (अंदाजे खर्च रक्कम रु.6.20 लक्ष)तसेच इयत्ता 9 वी , 10 वी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तके (अंदाजे खर्च 1.12 लक्ष) उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सादर.

<u>निर्णय</u>

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सुरु असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी स्कूलबॅग, उजळणी पुस्तके वह्या संच, पेन संच, ई.शालेय साहित्य (अंदाजे खर्च रक्कम रु.6.20 लक्ष)तसेच इयत्ता 9 वी , 10 वी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तके (अंदाजे खर्च 1.12 लक्ष) उपलब्ध करून देण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 199 **दिनांक** 24 / 06 / **2024**

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील मनपा स्वःहिश्श्याचा निधी उभारणे बाबत.

संदर्भ -

1. लातूर शहर पाणी पुरवठा योजना प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्रं. अमृत-2023 / प्र. क्र. 441/नवि-33 दि. 14 डिसेंबर 2023
2. ई-निविदा टेंडर आय. डी. क्रं. 2024_LMC_1035520_1
3. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग छत्रपती संभाजी नगर यांना निविदा दर पडताळणीसाठी पाठविलेले पत्र जा.क्रं./लामनपाला/पा.पु./2737/2023-24 दि. 23.04.2024
4. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग छत्रपती संभाजी नगर यांचे पत्र क्रं.जा.क्रं./मुअमजीप्रा छ.सं./ताशा-3/1295/2024 दि. 30.04.2024
5. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-2) यांना केंद्र शासन पुरस्कृत 2.0 अभियानाअंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेच्या निविदा दराबाबतचा पाठविण्यात आलेला प्रस्ताव दि. 08.05.2024
6. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-2) यांचे अध्यक्षतेखाली झालेली बैठक दि. 07.06.2024
7. लातूर शहर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. 69 दि. 14.02.2023
8. मा. प्रधान सचिव नवि -2 यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि. 18.06.2024 च्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेस संदर्भ क्रं. 1 अन्वये दि. 14 डिसेंबर 2023 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. केंद्र शासनाच्या अमृत 2.0 अभियानाबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने व तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आदर्श निविदा पुस्तिकेनुसारच सदर कामांचे निविदा कागदपत्रे तयार करुन संदर्भ क्रं. 2 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. निविदा भरण्याचा कालावधी पुर्ण झाला असुन प्राप्त झालेल्या निविदांचे तांत्रिक व आर्थिक लिफाफा यांची तपासणी करण्यात आली असता R AND B INFRA PROJECT PRIVATE LIMITED यांचे (+) 9.990 % अधिकच्या दराने सर्वात कमीचे (L1 धारक) दर प्राप्त झाले आहेत. अंदापत्रकापेक्षा जास्तीचे दर असल्या कारणाने निविदा धारकास दि. 19.04.2024 रोजी वाटाघाटीकरीता बोलविण्यात येऊन सदर काम हे अंदाजपत्रक दराने करणे करीता सुचित करण्यात आले असता R & B INFRA PROJECT PRIVATE LIMITED यांनी सदर काम हे (+) 9.75 % अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीने करण्यास समर्थता दर्शविली होती. संदर्भ क्र 5 अन्वये मा. अध्यक्ष तथा मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-2) राज्यस्तरीय तांत्रिक समिती यांना निविदा (+) 9.75 % अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीने निवीदा मंजुरी बाबत वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव सादर करण्यात आला होता. संदर्भ क्र 6 अन्वये मा. अध्यक्ष तथा मा. प्रधान सचिव यांनी वाटाघाटी झालेल्या दरामध्ये आणखीन दर कमी करण्याचे सुचित केले त्यानुसार R AND B INFRA PROJECT PRIVATE LIMITED यांनी (+) 8.80 % अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीने करण्यास समर्थता दर्शविली आहे. मा. प्रधान सचिव नवि 2 यांचे अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत गठीत राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि. 18.06.2024 रोजीचे बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र 8 अन्वये प्राप्त झाले आहे. समितीने लातूर महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती व महानगरपालिकेस अमृत 2.0 व नगरोत्थान योजनेअंतर्गत यापुर्वी मंजूर असलेल्या प्रकल्पांकरीता स्वहिश्यापोटी मोठा निधी उभारावा लागणार आहे. या प्रकल्पाकरीता देखील प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधी व मुळ निवीदा किंमतीपेक्षा जादा दराने निविदा आल्यामुळे स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणे लातूर महानगरपालिकेस क्रमप्राप्त ठरत आहे. एकंदरीत स्वहिश्यासाठी आवश्यक संपुर्ण निधी उभारण्याची लातूर महानगरपालिकेची जबाबदारी राहिल व त्यासाठीचा आवश्यक ठराव व तरतुद लातूर महानगरपालिकेने समितीसमोर सादर करावा

Scanned with OKEN Scanner

तसेच कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाला Finacial Closure शिवाय कार्यादेश (Work Order) देऊ नये, अशी समितीने शिफारस केली आहे. सदर प्रकल्पाचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

नागरी स्थानिक संस्थेचे नाव	प्रकल्प किंमत (रु. कोटी मध्ये)	केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीचा 33.33%)	राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीचा 36.67%)	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (प्रकल्प किंमतीचा 36.67%)	L1 निवीदाधारकाचे दर (8.80 %) जास्तीचे
लातूर शहर महानगरपालिका लातूर	259.22	86.40	95.05	77.77	19.17

उपरोक्त वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे लातूर शहर महानगरपालिकेस स्वहिस्सा रक्कमेपोटी 77.77 कोटीची उभारणी करणे करीता संदर्भ क्र.7 प्रशासकीय ठराव क्र. 69 दिनांक 14.02.2023 व्दारे मनपा फंड, म्युनिसीपल बॉन्ड, कर्ज, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान यांचा वापर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. लातूर महानगरपालिकेचा स्वःहिस्सा व निविदाधारकाचे जास्तीच्या दराचे खालीलप्रमाणे वित्तीय नियोजन करण्यात आले आहे.

1. 15 वा वित्त आयोग अनुदानातुन सन 2023-24 व 2024-25 वर्षाकरीता अंदाजित 30 कोटी रक्कम लातूर शहर महानगरपालिकेस उपलब्ध होणार असुन प्राप्त होणा-या अनुदानातुन व तसेच भविष्यात 16 व्या वित्त आयोग अनुदाना मधुन सुध्दा सदर योजनेकरीता स्वहिःस्सा पोटी निधी चिन्हांकित करुन ठेवण्यात येईल.
2. UIDF योजनेअंतर्गत नागरी स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिस्साच्या निधीसाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असुन त्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजनेकरीता रक्कम रु. 77.77 कोटी UIDF योजने अंतर्गत कर्ज स्वरुपात मिळणेकरीता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले आहे.
3. मालमत्ता व पाणी करापोटी सन 2024-25 सालाकरीता एकुण 325 कोटींची रक्कम कर वसुली करीता मागणी असुन 100 % वसुली उदिष्ट ठेवण्यात आले असुन त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.
4. Approval of projects under the scheme for special assistance to states for capital investments 2023-24 करीता लातूर शहर महानगरपालिकेने प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

वरीलप्रमाणे लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वहिःस्सा रकमेपोटी तरतुद करुन योजना पुर्णत्वास नेण्यासाठी निधी तरतुद करणे योग्य वाटते, याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

<u>निर्णय</u> :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत पाणी पुरवठा प्रकल्पाकरीता प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधीची रक्कम उभारणी करणे महानगरपालिकेस क्रमप्राप्त ठरत असुन एकंदरीत स्वःहिश्यासाठी आवश्यक संपुर्ण निधी उभारण्याची लातूर महानगरपालिकेची जबाबदारी आहे त्यासाठी महानगरपालिकेने 15 वा / 16 वा वित्त आयोग अनुदानातुन स्वहिःस्सा पोटी निधी चिन्हांकित करुन ठेवावा, मालमत्ता व इतर करापोटी वसुल होणा-या रक्कमेतून स्वःहिस्सा निधीची तरतुद व तसेच मनपा फंड, म्युनिसिपल बॉन्ड, मुन्फ्रा लोन, कर्ज व इतर पर्यायी स्त्रोतांचा अवलंब करुन स्वःहिश्याची उभारणी करणे करिता मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर
(शिक्षण विभाग)

ठराव क्रमांक: 200 दि.28/06/२०२४

प्रस्ताव : लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत सुरु असलेल्या माध्यमिक शाळेत 9 वी 10 वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे खरेदी बाबत .

महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएसए-1214/प्र.क्र.50/एस.डी.3 मंत्रालय,मुंबई या शासन निर्णया नुसार राज्यातील इयत्ता 1 ली ते 8 वी च्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षी दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे मोफत देण्यात येणार आहेत.

लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत इयत्ता 1 ली ते 8 वी च्या वर्गामध्ये जवळपास 1050 विद्यार्थी असून सदर विद्यार्थ्यांना उक्त शासन निर्णयाप्रमाणे मोफत दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे मोफत मिळणार आहेत, परंतु महानगरपालिकेमार्फत मनपा शाळा क्र.9 येथे स्वयं अर्थ सहाय्य या तत्वावर इयत्ता 9 वी व 10 वी चे देखील वर्ग चालवले जात असून या वर्गामध्ये जवळपास 140 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मोफत गणवेशाबाबतच्या शासन निर्णयाचा लाभ इयत्ता 8 वी पर्यंतच्या च विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने इयत्ता 9 वी आणि 10 वी चे विद्यार्थी मोफत गणवेशाच्या लाभापासून वंचित राहणार आहेत.

महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी आर्थीक दूर्बल घटकातील असल्याने इयत्ता 9 वी आणि 10 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या वतीने दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे उपलब्ध करुन देणेबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.21/06/2024 रोजी सदरील कामाबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार बाजार दराबाबत अंदाजपत्रकानुसार (अंदाजे खर्च रु.1.89 लक्ष रु.) उपलब्ध करून देणे विनंती करण्यात येत आहे .

करिता लातूर शहर महानगरपलिका शिक्षण विभाग अंतर्गत सुरु असलेल्या माध्यमिक शाळेमधील इयत्ता 9 वी आणि 10 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या वतीने दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे (अंदाजे खर्च रु.1.89 लक्ष रु.) उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव सादर .

निर्णय

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपलिका शिक्षण विभाग अंतर्गत सुरु असलेल्या माध्यमिक शाळेमधील इयत्ता 9 वी आणि 10 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या वतीने दोन गणवेश तसेच एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे (अंदाजे खर्च रु.1.89 लक्ष रु.) उपलब्ध करून देण्यास याद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.~~20~~--------ठराव क्रं.----~~20~~---------- दिंनाक 01/07/२०२४

<u>मनपा प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिं.१०/०६/२०२४ मध्ये अंशता दुरूस्ती</u>

विषयः-मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

"मनपा प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिं.१०/०६/२०२४ मध्ये अंशता दुरूस्ती करण्यास्तव विषय विचारविनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर.

प्रस्तावनाः-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराच्या उत्तपनाचे एकमेव स्त्रोत असून सन २०२४-२५ या अर्थिक वर्षामध्ये थकीत मालमत्ता व उपकराची मागणी रू,११९ कोटी आहे. तसेच शास्तीची रककम रू, ५५ कोटी आहे. सदर थकीत रक्कम वसूल करण्यासाठी तसेच महानगरपालिकेच्या उत्तपन वाढीच्या दृष्टीकोणातून महानगरपालिका हद्दीतील विविध घटकाना थकीत व चालू कराचा एक रक्कमी भरणा करणा-या मालमत्ताधारकास सामान्य करामध्ये मनपा प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिं.१०/०६/२०२४ अन्वये <u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील (कलम १४० अ व १४० ब अन्वये) मुदतीमध्ये मालमत्ताकराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांस मालमत्ताकरामध्ये माहे जुन २०२४ आखेर ७% ,जुलै २०२४ आखेर ६%,व ऑगष्ट २०२४ आखेर ५% ,सुट तसेच जे मालमत्ताधारक ऑन लाईन कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस जुन,जुलै,व ऑगष्ट २०२४ आखेर देय सामान्यकरामध्ये ३% सूट देणे योग्य होईल.तसेच महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहानाकरिता चार्जिग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इतर इलेक्ट्रीक्ल वाहनधारकांना चार्जिग सुविधदा उपलब्ध केल्यास शासन निर्णयानुसार सूट देणे योग्य होईल.</u>

तसेच मनपा हद्दीतील <u>महिलाच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५% व दिव्यांग व्यक्तीच्या नांवे असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्यकरामध्ये ५%,स्वतंत्र सैनिक व त्याच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस सामान्य करामध्ये ५०%, व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर सामन्य करामध्ये प्रति वर्ष ५% सूट देण्यात आली आहे.</u>

पंरतू मालमत्ताधारकांस मालमत्ताकराचे मागणी बिले देण्यास विंलब झाल्याने व मालमत्ताधारकाचा कर भरणा करण्यास प्रतिसाद पहाता मनपा प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिं.१०/०६/२०२४ रोजीच्या ठरामध्ये अंशता दुरूस्ती करणे योग्य होईल <u>त्यानुसार जे मालमत्ताधारक दिलेल्या मुदतीमध्ये मालमत्ताकराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस मालमत्ताकरामध्ये माहे १५ जुलै २०२४ आखेर ७% व १६ जुलै २०२४ ते ३० ऑगष्ट २०२४ आखेर ५%, सुट तसेच दरम्याच्या कालावधीमध्ये ऑन लाईन कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस अतिरिक्त सामान्यकरामध्ये ३% सूट लागू राहील.</u>

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

मनपा प्रशासकीय ठराव क्रं.१९६ दिं.१०/०६/२०२४ अन्वये देण्यात आलेल्या मालमत्ता कर सवलतीमध्ये अंशता खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात येत आहे.

१. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास १ जुलै २०२४ ते १५ जुलै २०२४ ७% मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.
२. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास १६ जुलै २०२४ ते ३१ जुलै ६% मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.
३. २०२४-२५ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास ऑगष्ट २०२४ पर्यंत ५% मालमत्ता करामध्येसुट देण्यात येत.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक: 202 दिनांक. 01/07/२०२४

विषय:- लातूर शहर म.न.पा. हद्दीतील अनियमित भुखंडास गुंठेवारी विकास नियामाधीन करणेसाठी एक वर्षाची मुद्दवाढ मिळणेकरिता विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

संदर्भ:- असोसिएट ऑफ कंन्सल्टींग इंजिनीअर& आर्केटेक्ट,लातूर यांचे निवेदन दि.१४/०३/२०२४ रोजीचे

<u>प्रस्ताव:-</u>

महाराष्ट्र शासनाचे गुंठेवारी विकास नियमाकुल बाबत परिपत्रक क्र.अनबां-१०२०/ ४८०/प्र.क्र/७९/ २०००/भाग-२० दि.०५/०५/२००१ लागू केलेला आहे.तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण)अधिनियम २००१ यांच्या कलम ३ मधील पोट- कलम १ मध्ये १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० रोजी दाखल करण्यात आलेली आहे.त्यामुळे अधिनियमातील कलम ४(१) नुसार हा अधिनियम अमंलात आलेपासून सहा महिन्या आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा कालावधीसाठी संबंधित भुखंडधारक गुंठेवारी विकास नियमाधीन अर्ज करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

यापुर्वी मा. सर्वसाधारण सभा मध्ये ठराव क्रं.१४९ अन्वये दि.३१/१०/२०२३ रोजी फक्त सहा महिन्या पर्यंत मुदत देणेत आलेली आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी,लातूर यांनी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ ची अधिसुचना दि.१२/०३/२०२१ रोजीच्या अधिसुचनेच्या नमुद नियामांचे पालन करणेसाठी दि.३१/०९/२०२१ रोजी परिपत्रक काढण्यात आले आहे.त्यामध्ये मुद्दया नुसार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ च्या अधिसुचनेनुसार ३१ डिसेंबर २०२० पर्यंतचे भुखंड/ प्लॉटची उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून नियमानुसार मोजणी करून घेणे बंधनकारक केले आहे.उक्त अधिनियमातील कलम ४(१) नुसार प्राप्त प्रकरणातील अर्जान्वये भुखंडधारकास उपअधिक्षक भूमी अभिलेख,लातूर यांच्याकडून मोजणी करणेस परिपत्रकाच्या तरतुदीन्वये नियमानुसार शिफारस करण्यात येते.परिपत्रकानुसार भुखंडाचे / प्लॉटचे मोजणीचे दर निश्चीत केलेले आहेत.त्याप्रमाणे भुखंडधारक हे मोजणीची फिसचा भरणा करून मोजणी करून घेत असल्याने मोजणीस साधारणत: तीन ते चार महिने वेळ लागत असल्याने मोठ्या प्रमाणात प्रस्ताव हे प्रलंबित राहत आहेत.मा.सर्वसाधारण ठराव क्र.१४९ प्रमाणे कालावधी हा दि.३१/१०/२०२३ रोजी संपलेला आहे. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ अन्वये गुंठेवारी विकास अद्यापही अस्तित्वात असून तो नियमधिन करणेसाठी अर्ज प्रात होत आहेत.गुंठेवारी विकास अधिनियमातील कलम ४ (१) अन्वये नियोजन प्राधिकरण याअर्थी ०१ जुलै ते ३१ जुलै २०२४ (एक महिना) या कालावधीसाठी गुंठेवारी विकास नियमाकुल करणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र गुंठेवारी विकास(नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण)सुधारीत अधिनियम २०२१ व तसेच लातूर शहर हद्दीतील सद्यस्थितीत मंजूर विकास योजना (सु+वा.क्षे.) प्रमाणे लातूर शहर मनपा हद्दीतील अनाधिकृत विकास नियमीत करणेसाठी मुदतवाढ देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner

<u>निर्णय:-</u> महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम-२०२१ च्या अधिसुचना प्रसिध्द झाल्यानुसार ३१ डिसेंबर २०२० पुर्वी अस्तीत्वात आलेले / हस्तांतरीत झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करणेसाठी चालु असून त्या करिता मागील तत्कालीन मा.सर्वसाधरण सभा ठराव क्र.१४९ अन्वये दि.३१/१०/२०२३ पर्यंत मुद्दवाढ देण्यात आली होती. सदरची मुदतवाढ संपलेली आहे. तरी सध्यस्थितीत अधिनियमातील कलम ४(१) नुसार प्रस्ताव दाखल करुन घेण्यासाठी लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.३१ डिसेंबर २०२० च्या पुर्वी अस्तीत्वात आलेले हस्तांतरीत, झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणेस्तव ०१ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्रं. 203 दिनांक 09/07 / 2024

---

1) परिभाषित अंशदान निवृती वेतन / राष्ट्रीय निवृतीवेतन योजनाअंतर्गत खात्यावरील जमा झालेल्या रक्कमावर व्याजदर आकारणी करणे बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे बाबत.
2) सर्वसाधारण रस्ता अनुदान निधी अंतर्गत हाती घेतलेल्या कामांना मान्यता मिळणे बाबत.

प्रस्ताव -

1) शासन निर्णय क्रं. अंनिओ 1005/126/सेवा-4, दि. 31/10/2005 अन्वये सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृतीवेतन योजना म्हणजे 'परिभाषीत अंशदान निवृतीवेतन योजना केंद्राच्या "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना समाविष्ट करण्यात आले आहे.

तत्कालिन नगरपरिषद लातूर मधील 01 नोव्हेंवर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृतीवेतन योजना दि. 05/01/2010 च्या आदेशान्वये लागु करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं. संकिर्ण-2021/प्र.क्रं. 119/नवि-20 दि. 22 फेब्रुवारी 2022 अन्वये महानगरपालिकामध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे.

लातूर शहर महानगरपालिका, लातूर येथील परिभाषित अंशदान निवृती वेतन लागू असलेले कार्यरत कर्मचारी यांच्या जमा असलेल्या रकमेवर सन 2010 पासून ते सन 2017 पर्यंत वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार कर्मचा-यांच्या जमा झालेल्या अंशदानावर व्याज देण्यात आलेले आहे. सन 2018 मध्ये नवीन परिभाषित अंशदान निवृती वेतन कर्मचा-यांच्या जमा असलेल्या रकमेतून बँकेत गुंतवणूक केल्यानुसार मुदतठेव गुंतवणूकीवर मिळणा-या व्याजाप्रमाणे अंशदायी योजना वर्गणीधारकांना व्याजदर 6.55% प्रमाणे प्रदान करण्यात यावे अशी मान्यता तत्कालिन आयुक्त, मनपा लातूर यांनी दि. 19 नोव्हेंबर 2018 रोजी दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांनी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना जमा झालेल्या अंशदानावर शासन निर्णयानुसार सन 2010 ते 30/09/2017 पर्यंतचे व्याजदर खालीप्रमाणे आहेत.

साल-सन	शासन निर्णयाप्रमाणे व्याजदर
2009-2010	8
2010-2011	8
01/04/2011 ते 30/11/2011	8
01/12/2011 ते 31/03/2012	8.6
2012-2013	8.7
2013-2014	8.7
2015-2016	8.7
01/04/2016 ते 30/09/2016	8.1
01/10/2016 ते 31/12/2016	8
01/01/2017 ते 31/03/2017	8
01/04/2017 ते 30/06/2017	7.90
01/07/2017 ते 30/09/2017	7.80

Scanned with OKEN Scanner

वँकेत मुदतठेव स्वरुपात गुंतवणूक केल्यानुसार मुदतठेवीवर सन 2019-20 पासून खालीलप्रमाणे व्याजदर प्राप्त होत आहेत.

साल सन	बँकेकडुन मुदतठेवीवर प्राप्त होणारे व्याज दर
2019-2020	7.10 %
2020-2021	5.80 %
2021-2022	5.00 %
2022-2023	7.15 %
2023-2024	7.25 %

तरी लातूर शहर महानगरपालिका लातूर मधील अधिकारी कर्मचारी यांना त्यांच्या परिभाषीत अंशदान योजनेअंतर्गत / राष्ट्रीय निवृतीवेतन योजनाअंतर्गत जमा असलेल्या रकमेवर व्याज देणे बाबत चा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

2) विषयः- सर्वसाधारण रस्ता अनुदान निधी अंतर्गत हाती घेतलेल्या कामांना मान्यता मिळणे बाबत..

प्रस्ताव -

सर्वसाधारण रस्ता अनुदान योजना अंतर्गतचा पुर्वीचा शिल्लक असलेला निधी रु.63,05,925/- खालील 06 कामे प्रस्तावित करण्यांत आली आहेत.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-2015/प्र.क्र.90/नवि-16 मंत्रालय, मुंबई-32 दि. 16 जानेवारी, 2016 नुसार हाती घेतलेल्या कामांचा ठराव घेणे आवश्यक आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.प.किंमत
1.	प्र.क्र.12 शेख यांच्या घरापासून ते सगर घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे.	10,00,000.00
2.	प्र.क्र.13 श्री संतोष वानपते, भांडेकर रस्ता सी.सी.करणे.	10,00,000.00
3.	प्र.क्र.04 गंगाधाम येथे डॉ. पटेल घरासमोर रस्ता सी.सी. करणे.	10,00,000.00
4.	प्र.क्र.12 इस्माईल बागवान घरापासून देशमुख घरापर्यंत रस्ता सी.सी. करणे.	10,00,000.00
5.	प्र.क्र.12 चौधरी नगर येथे शिवाजी कावळे ते महामरे सी.सी.रस्ता करणे.	10,00,000.00
6.	प्र.क्र.01 याहिया कॉलनी येथे सी.सी. रस्ता करणे.	10,00,000.00
	एकुण रुपये-	60,00,000.00

तरी सर्वसाधारण रस्ता अनुदान योजना अंतर्गतवरील कामांना मान्यता मिळणेच्या निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार अधिकारी / कर्मचारी यांच्या परिभाषित अंशदान निवृती वेतन / राष्ट्रीय निवृतीवेतन योजनाअंतर्गत खातेवर जमा असलेल्या रकमा बँकेत मुदतठेवी स्वरुपात ज्या व्याजदराने गुंतवणुक केली आहे ते व्याजदर देणे व यापुढेही बँकेत जमा होणा-या रकमा बँकेत मुदतठेवी स्वरुपात ज्या व्याजदराने गुंतवणुक करण्यात येणार आहेत ते व्याजदर देणेस मान्यता देण्यात येते.

तसेच बांधकाम विभागाने सादर केलेले सर्वसाधारण रस्ता अनुदान योजना अंतर्गतचा पुर्वीचा शिल्लक असलेला निधी रु. 63,05,925/- मधून प्रस्तावनेमधील 06 कामांना मान्यता देण्यांत येते. प्रशासनाने शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे व सदरची कामे योग्य दर्जाचे होतील याची खबरदारी घ्यावी.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक 204------ ठराव क्रमांक 204--- दिनांक 09 /07 /2024

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 9 मधील 600 लाभार्थ्यांपैकी 358 लाभार्थ्यांनी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार श्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थीचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 9 मधील 358 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 9 मधील 358 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 9 मधील 358 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांक: 12/07/2024

ठराव क्र. 8219 दि. 905

<u>ठराव ठराव क्र.</u> <u>अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक अग्नी अग्निशमन वाहने</u>

1) Design,Construction,Fabrication,Erection Testing and Commissioning of 14 KL Fire Water Bowser on 28 ton GVW BS-VI Chassis व बॉडी बांधकामसह 01 नग.
2) Design, Construction,Fabrication,Erection Testing and Commissioning of Fire Water Tender on 16 ton GVW BS-VI Chassis व बॉडी बांधकामसह 02 नग.

खरेदी करणे, करिता म्हणजे अग्निशमन अधिकाऱ्यांचे जिल्हास्तर अधिकार व बळकटी करण योजने अंतर्गत सन 2024-25 च्या जिल्हा वार्षिक योजनेतून किंवा इतर उपलब्ध निधीतून अंदाजे रक्कम रुपये 4,51,51,000/- कोटी निधी मागणी करणे बाबत.

प्रस्ताव:-

लातूर शहर महानगरपालिका लातूर अग्निशमन विभागाकडे एकूण विविध प्रकारचे सध्या 1 वॉटर टेंडर जुने 2, नविन -2,मल्टीपर्पज फिरे Tender 2, Q.R.V.(टेंडरसह)1,असे एकूण 07 वाहने आहेत. त्यापैकी 2 वॉटर टेंडर पूर्ण पणे जूने/खराब झाले आहेत ते 14-15 वर्षे जूने झाले आहेत. व सतत बंद पडत आहेत. शासकीय परिपत्रकानुसार 10 वर्षा पूर्तिचे वाहने निकामी करून नविन वाहने खरेदी करणेचा प्रस्ताव आहेत.

सध्या लातूर शहर व परिसरात औद्योगिक वसाहत खुप मोठ्या प्रमाणात विस्तारित होत आहे सतत लहान-मोठे आगीच्या दुर्घटना घडतात. त्यातल्या त्यात शहरात मोठ्या प्रमाणात बाजार पेठ आहे.अशा ठिकाणी लहान आग लागली तरिही 1 - 2 उपलब्ध अग्निशमन वाहने पाठवावी लागतात सध्या स्थितीत लातूर अग्निशमन विभागाकडे 2 water tender नविन व 2 मल्टीपर्पज फिरे Tender उपलब्ध आहेत. लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या अग्निशमन विभाग करिता आग-आपत्ती घटनेचे व VIP बंदोबस्त/ कॅमल्याच्या वेळचे समाधान कारक कार्य करणे आणि मर्यित व वित्त हानी टाळणे करिता खालिल अत्याधुनिक अग्निशमन वाहने व साहीत्याची आवश्यकता आहे.

अ.क्र.	वाहनाचा तपशिल	नग	अंदाजे अपेक्षित खर्च
1	Design,Construction,Fabrication, Erection,Testing and Commissioning of14KL Fire Water Bowser on 28 ton GVW BS-VI Chassis. (Inclusive Of Chassis)	01	1,70,75,000/-
2	Design,Construction,Fabrication,Erection Testing and Commissioning of Fire Water Tender on 16 ton GVW BS-VI Chassis. (Inclusive Of Chassis)	02	2,80,76,000/-
	अंदाजे एकूण		**4,51,51,000/-**

जिल्हा वार्षिक योजना सन- 2024-25 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू. 4,51,51,000/- कोटी निधी उपलब्ध करून देणे बाबत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटीकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत 1) Fire Water Bowser on 28 ton खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह - 01 आणि Fire Watef Tender on 16 ton खूलि चेचीस व बॉडीबांधकाम सह- 02 खरेदी करणे करिता कमी-जास्त प्रमाणात अंदाजे रक्कम रू. 4,51,51,000/- कोटी खर्च अपेक्षित आहे.

तेव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2024-25 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू.4,51,51,000/- अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशासकिय मान्यतेस्तव सादर.

<u>निर्णय:-</u> अत्याधुनिक अग्निशमन वाहने खरेदी करिता रू.4,51,51,000/- जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2024-25 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रू. 4,51,51,000/- अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र..206.. दिनांक .15/07/2024.....

विषय क्र.

विषय :- लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या शाळांना आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25 अंतर्गत प्राप्त होणारे रु 50लक्ष च्या ई लर्निंग साहित्य खरेदी करणे बाबत

लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 03,05,06,09,11,13,14,24,26,32 लातूर करिता मा. आमदार रामराव पाटील रातोळीकर यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25 करिता वरील 10 शाळांना ई लर्निंग साहित्य खरेदी करण्याकरिता प्रत्येकी शाळा रु. 5 लक्ष पर्यंत असे एकूण 50 लक्ष च्या विकास कामांची तरतूद केल्याचे दि. 26/06/2024 च्या पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती जिल्हा लातूर यांनी कळविले आहे व ही सर्व कामे आयुक्त महानगरपालिका यांचे मार्फत पूर्ण करण्याचे आदेशीत करावे असे कळविले आहे

त्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिका मधील वरील शाळांना ई लर्निंग साहित्य खरेदी करणे बाबत अंदाजपत्रक प्रशाकीय समिती समोर प्रस्ताव सादर

<u>निर्णय :</u>

लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या शाळांना आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25 अंतर्गत प्राप्त होणारे रु 50लक्ष च्या ई लर्निंग साहित्य खरेदी करण्याकरिता सादर करावयाच्या अंदाज पत्रकास व निधी मागणीस प्रशासकीय मान्यता देण्यात येते

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 206 दिनांक 26/06/२०२४

विषय :- राजा सिद्धोधन बुद्ध विहारास धार्मिक तीर्थक्षेत्राचा दर्जा देणे बाबत.

प्रस्तावना –

मा.आ. श्री. संजय बनसोडे, मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, बंदरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ९५० दि. १९/०७/२०२४ अन्वये श्री. सोनवणे आनंद दगडू, अध्यक्ष, राजा सिद्धोधन चॅरीटेबल ट्रस्ट, लातूर यांचे प्राप्त निवेदनानुसार नमूद बुद्ध विहारास धार्मिक तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

तरी राजा सिद्धोधन बुद्ध विहार येथे सर्व धार्मिक कार्यक्रम पार पडत असल्याने सदर बुद्ध विहारास धार्मिक तीर्थक्षेत्राचा तीर्थक्षेत्र दर्जा – क देणेबाबत मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे शिफारस करणे योग्य.

तरी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय – वरीलप्रमाणे मा.आ. श्री. संजय बनसोडे, मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, बंदरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ९५० दि. १९/०७/२०२४ अन्वये श्री. सोनवणे आनंद दगडू, अध्यक्ष, राजा सिद्धोधन चॅरीटेबल ट्रस्ट, लातूर यांचे प्राप्त निवेदनानुसार नमूद बुद्ध विहारास धार्मिक तीर्थक्षेत्राचा तीर्थक्षेत्र दर्जा – क देणेसाठी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे शिफारस करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 208 दिनांक 26 / 07 / 2024

विषय :- लातूर महानगरपालिका हद्दीतील चौक, परीसर, रस्ता दुभाजक, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा, म.न.पा. दवाखाने, कारंजे व इतर म.न.पा. कार्यालये यांचे दुरुस्ती, सुशोभिकरण, निगा व देखभाल ३ वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन विकसीत करणे.

<u>प्रस्ताव –</u>

लातूर महानगरपालिका हद्दीतील चौक, परीसर, रस्ता दुभाजक, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा, म.न.पा. दवाखाने, कारंजे व इतर न.न.पा. कार्यालये यांचे दुरुस्ती, सुशोभिकरण, निगा व देखभाल करणे निधी अभावी व पुरेशा मनुष्यबळाअभावी शक्य होत नाही. याकरीता सदरचे काम ३ वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन व्यापारी संस्था, सामाजिक संस्था, बँका यांचेमार्फत विकसीत करणे शक्य होणार आहे. मनपाने ठरवून दिलेले किमान दर एजन्सीधारकास भरणे बंधनकारक राहील व मनपाने मंजुर केलेल्या डिझाईन प्रमाणे एजन्सीधारकास काम करावे लागेल. सदरील ठीकाणी मनपा मार्फत विकासकाम प्रस्तावित झाल्यास त्या कालावधीमध्ये जागा महापालीकेकडे हस्तांतर करावे लागेल. सदरील ठीकाणी जाहीरात करण्यासाठी जाहीरात कर मनपाकडे भरावे लागेल.

ए) लातूर शहरातील प्रमुख चौक

1. महात्मा गांधी चौक
2. छत्रपती शिवाजी महाराज चौक
3. महात्मा बसवेश्वर चौक
4. राजीव गांधी चौक
5. स्वामी विवेकानंद चौक
6. अहिल्यादेवी होळकर चौक परीसर
7. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय समोरील चौक (महात्मा बसवेश्वर उद्यान)
8. राजर्षी शाहू महाराज चौक
9. दयानंद कॉलेजच्या परिसरातील फुटपाथ
10. उड्डाणपुलाखालील मोकळी जागा
11. म.न.पा. हद्द प्रवेशद्वार

बी) मुख्य मार्गावरील दुभाजक

1. क्रिडा संकुल ते राजीव गांधी चौक (औसा रोड) दुभाजक - 1.5KM
2. जुने जिल्हाधिकारी कार्यालय कॉर्नर ते निकी बार कॉर्नर (बार्शी रोड) दुभाजक -3.5KM
3. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवीन रेणापूर नाका (अंबेजोगाई रोड) दुभाजक -2KM
4. अण्णाभाऊ साठे चौक ते गरूड चौक मधील दुभाजक (नांदेड रोड) - 1.7KM

Scanned with OKEN Scanner

5. महात्मा गांधी चौक ते उड्डाणपूल सुरू दुभाजक - 1 KM

सी) लातूर शहरातील कारंजे

1. तहसील कार्यालयासमोर
2. नाना-नानी पार्क समोर
3. सी-लाय वर्ल्डच्या समोरील बाजुस
4. पीव्हीआर चौक
5. गांधी चौक
6. अण्णाभाऊ साठे चौक
7. विवेकानंद चौक
8. कायमखानी पेट्रोल पंपासमोर

डी) मनपा शाळा

1. मनपा शाळा क्रमांक 2 जय नगर गरुड चौक, लातूर
2. मनपा शाळा क्रमांक 3 बदाडे नगर, लातूर
3. मनपा शाळा क्रमांक 5 आनंद नगर, लातूर
4. मनपा शाळा क्रमांक 6 बसवेश्वर चौक, लातूर
5. मनपा शाळा क्रमांक 9 मंठाळे नगर, मार्केट यार्ड, लातूर
6. मनपा शाळा क्र. 10 आर्वी गायरान, लातूर
7. मनपा शाळा क्र. 11 सेल गल्ली, लातूर
8. मनपा शाळा क्र. 13 नवीन काजी मोहल्ला, लातूर
9. मनपा शाळा क्र. 14 खाडगाव रोड, लातूर
10. मनपा शाळा क्र. 15 बालेपीर गल्ली, लातूर
11. मनपा शाळा क्र. 16 राजीव नगर, बाभळगाव रोड, लातूर
12. मनपा शाळा क्र. 23 सुभेदार रामजी नगर, लातूर
13. मनपा शाळा क्र. 24 विकास नगर, लातूर
14. मनपा शाळा क्र. 26 लेबर कॉलनी, लातूर
15. मनपा शाळा क्रमांक 28 इंडिया नगर, लातूर
16. मनपा शाळा क्र. 32 बरकत नगर, लातूर

ई) रुग्णालये

1. इंडिया नगर UPHC, जुना MIDC रोड, इंडिया नगर, लातूर
2. गौतम नगर UPHC, पंचायत समिती खणी भाग मागे, लातूर
3. मंथळे नगर UPHC, मनपा शाळा क्र. 9, मंथळे नगर, लातूर
4. सिद्धार्थ सोसायटी UPHC, MNP शाळा क्रमांक 11, सेल गल्ली, लातूर
5. बौद्ध नगर UPHC, यशवंत शाळेच्या मागे, लातूर
6. राजीव नगर UPHC, मनपा शाळा क्र. 6, राजीव नगर, लातूर

Scanned with OKEN Scanner

7. तावरजा कॉलनी UPHC, मनपा शाळा क्र. 3, बदाडे नगर, लातूर
8. ठाकरे चौक UHWC, ठाकरे चौक, लातूर
9. सावेवाडी UHWC, सावेवाडी, लातूर
10. आनंद नगर UHWC, आनंद नगर, लातूर
11. संजय नगर UHWC, संजय नगर, लातूर
12. वैशाली बौद्ध विहार UHWC, वैशाली बौद्ध विहार, लातूर
13. शिवाजी गृहनिर्माण संस्था UHWC, पद्मा नगर, लातूर
14. पंडित जवाहरलाल नेहरू हॉस्पिटल, मनपा शाळा क्रमांक 4, काळे गल्ली, लातूर
15. मोहल्ला क्लिनिक हॉस्पिटल, खोरी गल्ली, लातूर
16. लेबर कॉलनी हॉस्पिटल, लेबर कॉलनी, लातूर

एफ) लातूर शहरात विविध ठीकाणी दीशादर्शक फलक बसविणे.

सदर ई-ऑक्शन करीता बाबनिहाय बयाना रक्कम (EMD) व मुळ किंमत (Base Price) खालीलप्रमाणे राहील.

जाहीरातीचे ठीकाण	बयाना रक्कम (EMD)	मुळ किंमत (Base Price)
चौक / उड्डाणपुलाखालील जागा	रु. 5000/-	रु. 25000/-
रस्ता दुभाजक	रु. 5000/-	रु. 25000/-
कारंजे	रु. 5000/-	रु. 10000/-
म.न.पा. शाळा / इमारत	रु. 5000/-	रु. 10000/-
म.न.पा. हॉस्पिटल	रु. 5000/-	रु. 10000/-
दीशादर्शक फलक	रु. 5000/-	रु. 10000/-

वरीलप्रमाणे काम करणेसाठी जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्धी देऊन प्रस्ताव मागविणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :-

वरील प्रमाणे बांधकाम विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार लातूर महानगरपालिका हद्दीतील चौक, परीसर, रस्ता दुभाजक, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, म.न.पा. शाळा, म.न.पा. दवाखाने, कारंजे व इतर म.न.पा. कार्यालये याचे दुरुस्ती, सुशोभिकरण, निगा व देखभाल 3 वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन विकसीत करणेस याद्वारे मान्यता देण्यात येते. सदरचे कामामध्ये मालमता विभाग, बांधकाम विभाग व उद्यान विभाग यानी समन्वय ठेऊन काम करावे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

स्वच्छता विभाग

<u>प्रशासकिय ठराव</u>

ठराव क्रं - 20e

दि 30/06/२०२४

विषय: लातूर शहरामध्ये विविध ठिकाणी १० सार्वजनिक आकांक्षित शौचालय बांधणेबाबत.

संदर्भ: पत्रक्र.राअस/SBM-२/३७४/२३-२४ दिनांक -२८/०३/२४

प्रस्ताव:

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत नागरी अभियान(ना.)२.० च्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० राबविण्यात येत आहे. सदरील अभियाना अंतर्गत दिलेले ODF++ चे उद्दीष्ट पुर्ण करणे व विविध ठिकाणी सार्वजनिक आरोग्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील वाढती लोकसंख्या विचारात घेता सार्वजनिक शौचालयांची आवश्यकता आहे. लातूर शहर महानगरपालिका हे महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक शहर आहे. लातूर शहर महानरगरपालिकेची लोकसंख्या २०११ पासून ३,८९,९२० एवढी असून ती सध्या अंदाजीत ५ लक्ष एवढी आहे. आज रोजी शहरात एकूण १२ सार्वजनिक शौचालय उपलब्ध आहेत. हे शौचालय शहरातील वाढती लोकसंख्या व सार्वजनिक आरोग्याच्या अनुषंगाने अपुरे आहेत.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत दिलेले ODF चे उद्दीष्टे पुर्ण करणे व सार्वजनिक आरोग्याच्या अनुषंगाने गर्दीचे ठिकाण व पर्यटन स्थळ या ठिकाणी आकांक्षित शौचालय बांधणे उचित वाटते. लातूर शहर महानगरपालिका मालमत्ता विभाग व स्वच्छता विभाग यांच्या संयुक्त पाहणीने सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी मनपाच्या मालकीचे ट्युशन एरिया(उद्योग भवन),राजीव गांधी चौक,भाजी मार्केट,गांधी चौक, गांधी चौक पोलीस स्टेशन,जुने बस स्टॅन्ड,यशोदा टॉकीज नवीन बस स्टॅन्ड,अंबेजोगाई रोड,औसा रोड,क्रीडा संकुल अशी १० ठिकाणे निश्चित केली आहे.

लातूर शहर महानगरपालिकेतील मालमत्ता विभाग व स्वच्छता विभागाने संयुक्त पाहणी करून खालील ठिकाणे आकांक्षित शौचालय बांधणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (क) विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	कामाचे नाव
1.	औसा रोड वरील क्रीडा संकुल गेट समोरील परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे.
2.	राजीव गांधीच चौकाजवळ परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे.
3.	अष्टविनायक मंदिर उद्योग भवन परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे.
4.	राजधानी पाणी टाकीच्या पाठीमागे रोड लगत सार्वजनिक शौचालय बांधणे.
5.	गांधी मार्केट येथील उद्यान परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे
6.	बस स्टॅन्ड पाठीमागील भाजी मार्केट परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे.
7.	गांधी चौक पोलीस स्टेशन समोरील परिसरात सर्वजनिक शौचालय बांधणे.
8.	जुने बस स्टॅन्ड येथील मनपाच्या जागेमध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे.
9.	यशोदा टॉकीज समोरील परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे
10.	अंबेजोगाई रोडवरील कॉलेज समोरील परिसरात सार्वजनिक शौचालय बांधणे

निर्णय :- लातूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता विभाग / मालमत्ता विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे १० ठिकाणी शौचालय बांधणेसाठी निधी मागणीसाठी संचालक भारत मिशन मुंबई यांना प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर
(विद्युत विभाग)

ठराव क्र. 210 दि.31/07/२०२४

विषयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर वरवंटी कचरा संकलन व विघटन प्रक्रीया केंद्र या ठिकाणी विद्युत पुरवठा करीता एलटी केबल टाकणे.

लातूर शहर महानगरपालिका लातूर चे कचरा संकलन व विघटन प्रक्रीया केंद्र नांदगाव रोड वरवंटी या ठिकाणी आसुन कच-यावरील विविध प्रक्रीया करीता मशनरी उभा करण्यात आलेल्या आहेत. या पुर्वी त्या ठिकाणी ११० एच पी चा लोड असलेले मशनरी कार्यरत होते. त्या ठिकाणी सध्या वाढीव मशनरी बसविण्यात आलेल्या आहेत. या सर्वांचा विद्युत भार जवळपास ४५० एचपी होत आहे. या मुळे त्या ठिकाणी एलटी विद्युत कनेक्शन ऐवजी एचटी विद्युत कनेक्शन विज वितरण कंपनी कडुन देण्यात येत आहे. या करीता विज वितरण कंपनीचे एचटी कनेक्शन करीताची मान्यता क्र. अधिक्षक अभियंता लातूर पत्र क्र. SE/Latur/TS-II/0907/Dt.01/03/2024 अन्वये तांत्रीक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्या ठिकाणी एचटी लाईन कनेक्शन करीता क्युबीकल मिटर व ६३० केव्हिए चे ट्रान्सफॉर्मर उभे करून एचटी कनेक्शन घेणे करीता ई निविदा मागवुन काम करण्यात येत आहे.

विज वितरण कंपनी कडुन एलटी कनेक्शन बंद करून नवीन एचटी कनेक्शन देणे करीता विज वितरण कंपनीच्या नियमानुसार सदरील कनेक्शन हे कचरा संकलन व विघटन प्रक्रीया केंद्राच्या कंम्पाउंड च्या आत मुख्य गेटच्या जवळ देणार असल्याकारणाने नवीन बसविण्यात येत असलेले एचटी कनेक्शन ट्रान्सफॉर्मर व क्युबीकल मिटर हे प्रक्रलपाच्या मुख्य गेटवर बसविण्यात आलेले आहे. त्या ठिकाणाहुन सध्या तेथे असलेल्या मशनरी यामध्ये जवळपास ४०० मिटरचे अंतर आहे. त्यामुळे त्या ठिकाणी विद्युत पुरवठा देणे करीता XLPE 400 sq mm व 120 sq mm केबलची आवश्यकता आहे.

सदरील केबलचे काम हे यापुर्वीच्या कामामध्ये नाही. त्यामुळे कामाची निकड पाहता त्या ठिकाणी विद्युत पुरवठा करीता लागणारे केबल पुरवठा करणे व मशनरी करीता विद्युत पुरवठा जोडणे करीताचे अंदाजपत्रकानुसार जवळपास १३२४०००/- रूपय खर्च आपेक्षीत आहे. सदरील खर्च हा मनपा निधी लेखाशिर्ष (कच-यापासुन खत निर्मीती) G-22 या मध्ये करणे आहे. तरी सदरील काम करून घेणेच्या निर्णयास्तव.

निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर चे कचरा संकलन व विघटन प्रक्रीया केंद्र नांदगाव रोड वरवंटी या ठिकाणी आसुन कच-यावरील विविध प्रक्रीया करीता मशनरी उभा करण्यात आलेल्या आहेत. या साठी वाढीव विद्युत भार असल्याने सदर ठिकाणी केबल व्दारे विद्युत पुरवठा करणे व तात्काळ त्या ठिकाणी सर्व मशनरी चालु करणेची मान्यता देण्यात येते.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Light -Light

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर
(विद्युत विभाग)

ठराव क्र. 211 दि.31/01/2024

विषयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर व ईईएसएल कंपनी मधील ठराव रद्द करणे.

लातूर शहर महानगरपालिका लातूर व ईईएसएल कंपनी मध्ये दि.२०/०७/२०१७ रोजीच्या ठराव क्र. ८ अन्वये करारनामा होऊन लातूर शहरातील उर्जा बचतीचे पथदिवे बसवणे व ऊर्जा बचत प्रकल्प राबवणे बाबत करारनामा २०१८ मध्ये झाला होता. परंतु सदर कंपनीने त्यांच्या कामात अक्षम्य दिरंगाई व दुर्लक्ष केल्याने लातूर शहरातील पथदिव्याची व्यावस्था कोलमडली आहे.

सदर कंपनीस करारनाम्यातील अट क्र. १० अन्वये

१. मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/४९२४/२०२३-२४/दि.०७/०८/२०२३.
२. मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/५६१०/२०२३-२४/दि.०५/०९/२०२३
३. मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/६८२८/२०२३-२४/दि.२७/१०/२०२३
४. मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/ १४२७ /२०२३-२४/दि.२७/२/२०२४.
५. मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/ २७७२ /२०२३-२४/दि.२३/४/२०२४. अन्वये दंडात्मक कार्यर्यवाही करत असले बाबत व पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम चालु करणे बाबत सुचना करूनही सुधारणा झालेली नाही त्यामुळे सदर कंपनी व महानगरपालिका यांच्यात झालेला करार अटी व शर्तीतीतील अट क्र.१६ अन्वये पुर्तता न झाल्याने व करारनाम्याचा भंग झाल्याने करारनामा रद्द करण्या करीता कायदेशीर नोटीस दि.१४/०६/२०२४ व मनपा कार्यालयीन पत्र जा.क्र./लाशामनपा/विद्युत/ ३७०७ /२०२३-२४/दि.१२/६/२०२४ शासनाकडे पाठविण्यात येउनही आपणाकडुन कोणत्याही प्रकारचे सुधारणा झालेली नाही. यामुळे महानगरपालिका लातूर व ईईएसएल कंपनीमध्ये झालेला करारनामा रद्द करून महानगरपालिका स्तरावरती काम करणे बाबतचा ठराव घेण्यात येतो.

निर्णयः- शहरातील पथदिवे चालु ठेवणे हे नागरीकांसाठी आत्यावश्यक प्राथमीक सुविधा आहे. सदर सुविधा बंद राहिल्याने कायदा व सुव्यवस्था राखता येत नाही. शहरात पथदिव्याची व्यवस्था कोलमडल्याने अंधार पसरून चोरी व अनैतीक प्रकार व त्याचे तक्रारीत वाढ झालेली आहे.

ईईएसएल कंपनीने माहे सप्टेंबर २०२३ पासुन देखभाल दुरूस्ती करणे, पथदिवे स्वंयचलित यंत्रणा बंद करण्यात आलेली आहे. यामुळे महानगरपालिके वरती विद्युतचा आर्थिक भार वाढलेला आहे. या बाबत करारनाम्यातील अट क्र.१० प्रमाणे लातूर महानगरपालिका लातूर यांनी वेळोवळी दंडात्मक कार्यवाही बाबत वरील संदर्भा प्रमाणे कळविण्यात आलेले आहे. परंतु आपण त्याची दखल घेउन काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र.१६ नुसार कार्यवाही बाबत आपणास कार्यालयीन कायदेशीर नोटीस दिनांक १४/०६/२०२४ ने कळविले आहे. तरीही आपणाकडुन कसल्याही प्रकारची पथदिवे चालु करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

शहरात सण उत्सव तसेच निवडणुक कालावधी असल्याने शहरातील पथदिवे बंद असल्याने त्याचा फार मोठा ताण लातूर शहर महानगरपालिके वर पडलेला आहे. त्यामुळे करारनाम्यातील अटी शर्तींचा भंग झालेला असल्याने कायदा व सुव्यावस्था प्रश्न निर्माण झालेला आहे. तरी लातूर शहर महानगरपालिका ,लातूर व ईईएसएल कंपनी यांच्यातील करारनामामधील अटी व शर्ती भंग झाल्याने करारनामा रद्द करण्याचा निर्णय लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी घेतलेला आहे. तरी लातूर शहर महानगरपालिका लातूर व ईईएसएल कंपनी मधील करारनामा रद्द करण्यात येतो. तसेच महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत प्रशासनास आदेशीत करण्यात येते.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

(शिक्षण विभाग)

ठराव क्र. 212 दिनांक - 01/05/2024

प्रस्ताव- लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सुरू असलेल्या महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक 5, 11, 14, 16, 28 लातूर या शाळांमध्ये पाचवीचा वर्ग चालू करणे बाबत.

महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्रमांक प्राशाव-2023 प्रक्र.97 एसएम-5 दिनांक 15/3/2024 नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये चौथीचा वर्ग आहे. तेथे पाचवीचा वर्ग सुरू करणे आवश्यक आहे. त्यानुसार लातूर महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या चौथीपर्यंतच्या प्राथमिक शाळांमध्ये पाचवीचा वर्ग चालू करणे आवश्यक आहे.

वरील शासन निर्णय नुसार महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक 5, 11, 14, 16, 28 लातूर यांच्या शाळा व्यवस्थापन समितीने पाचवीचा वर्ग चालू करण्याविषयी ठराव घेतलेला आहे. तसेच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी वर्ग चालू करण्यासाठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत.

सदरील शाळांमध्ये इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू केल्यानंतर महानगरपालिका शाळांमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणाची सोय होणार आहे. त्यामुळे वरील शाळांमध्ये पाचवीचा वर्ग चालू करण्याची विनंती करण्यात येत आहे.

करिता लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत चालण्यात येणाऱ्या महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक 5, 11, 14, 16, 28 लातूर या शाळांमध्ये इयत्ता पाचवीचा वर्ग चालू करण्याच्या प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

निर्णय

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत सुरू असलेल्या महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक 5, 11, 14, 16, 28 लातूर या शाळांमध्ये इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 213 **दि.** 02 / 08 / 2024

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना (दुसरी वेळ) रावविणेच्या कामाच्या निविदा दर मंजुरी बाबत.

संदर्भ - 1. ई-निविदा मागवलेला दि. 15.03.2024 ते 01.04.2024
2. ई-निविदा उघडणेचा दि. 02.04.2024
3. कंत्राटदार यांना वाटाघाटी करिता देण्यात आलेले पत्र दिनांक 18.04.2024
4. कंत्राटदार यांचे निविदा दर वाटाघाटी अंती कमी केलेले पत्र दिनांक 19.04.2024
5. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांना दर निश्चिती पडताळणी करणे बाबत पत्र दि. 23.04.2024
6. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांचे दर निश्चिती पडताळणी केले बाबत पत्र दि. 30.04.2024
7. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव दिनांक 08.05.2024
8. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 18 जुन 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.
9. कंत्राटदार यांचे कमी केलेले निविदा दरा बाबत पत्र दिनांक 13.06.2024
10. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना दर मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव दिनांक 14.06.2024
11. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 21 जुन 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.
12. स्वःहिस्सा उभारणीबाबतचा प्रशासकीय ठराव क्रं. 199 दिनांक 24.06.2024
13. मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील मनपा स्वःहिश्श्याचा निधी उभारणी बाबत पत्र दि. 25.06.2024
14. लाईफ फर्स्ट कॉन्सेप्ट ॲन्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि., पुणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेपत्र दि. 02.07.2024
15. मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक 16 जुलै 2024 च्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना (दुसरी वेळ) राबविणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 09/2023-24 Tender ID 2024_LMC_1035520_1 मागविण्यात आले होते.

प्रस्तावित निविदेस एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार संदर्भ क्रं. 2 अन्वये निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये 1) आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट), मुंबई 2) भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद 3) जयदिपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नरिमन पॉईंट, मुंबई असे एकुण तीन निविदाधारक प्राप्त झाले. सदर निविदा धारकाचे कागदपत्रांची तपासणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता उपरोक्त निविदाधारकापैकी जयदिपराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नरिमन पॉईंट, मुंबई हे अपात्र ठरले आहेत. उर्वरीत दोन निविदाधारक आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई व भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद हे पात्र ठरल्याने दोन्ही पात्र निविदा धारकांचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. पात्र निविदा धारकांचा दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्रं.	निविदाधारकाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1.	आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई	217,82,79,400/-	9.990% अधिक म्हणजेच रक्कम रु. 239,58,89,512.06/-
2.	भुरलम कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि., आर.पी. रोड, सिकंद्राबाद		20.430% अधिक म्हणजेच रक्कम रु. 262,33,01,881.42/-

प्राप्त दोन निविदा धारकाचे दरापैकी सर्वात कमीचे दर आर ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे असल्याने संदर्भ क्रं. 3 अन्वये अंदाजपत्रक दराने काम करणेकरीता वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले असता संदर्भ क्रं. 4 अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. 217,82,79,400/- पेक्षा 9.75% अधिकने काम करण्यास समर्थता दर्शविली. संदर्भ क्रं. 5 अन्वये सदर दर निश्चिती करावे किंवा कसे यासंबंधी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजी नगर यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याकरिता कळविण्यात आले असता संदर्भ क्रं. 6 अन्वये मजीप्रा, छत्रपती संभाजी नगर यांनी निविदेतील दर हे सन 2023-24 दरसुचीनुसार असुन अद्यावत आहेत तरी कंत्राटदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने बाजार भावाप्रमाणे दराबाबत कार्यवाही करणे बाबत कळविले. संदर्भ क्रं. 7 अन्वये मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियांन), नगर विकास विभाग, मुंबई यांना 9.75% अधिकचे दर निविदा मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव पाठविण्यात

Scanned with OKEN Scanner

आला. परंतू संदर्भ क्रं. ४ अन्वये मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीमध्ये लातूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन जास्तीचा वाढीव निधी उभारणी बाबत आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांनी खातरजमा करावी व तसेच फेरवाटाघाटी करुन राज्यस्तरीय तांत्रिक समिती समोर नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले. राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार संदर्भ क्रं. 9 अन्वये कंत्राटदार यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा ४.४०% जास्तीने काम करण्यास समर्थता दर्शविली. संदर्भ क्रं. 10 अन्वये मा. अध्यक्ष तथा प्रधान सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक समिती (अमृत अभियान), नगर विकास विभाग, मुंबई यांना लातूर शहर अमृत 2.0 अभियान अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा +४.४०% दराने निविदा मंजुरी बाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव पाठविण्यात आला. संदर्भ क्रं. 11 मा. प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत समितीने लातूर महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती व महानगरपालिकेस अमृत 2.0 व नगरोत्थान योजनेअंतर्गत यापुर्वी मंजूर असलेल्या प्रकल्पाकरीता स्वहिश्यापोटी मोठा निधी उभारावा लागणार आहे. या प्रकल्पाकरीता देखील प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधी व मुळ निवीदा किंमतीपेक्षा जादा दराने निविदा आल्यामुळे स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणे लातूर महानगरपालिकेस क्रमप्राप्त ठरत आहे. एकंदरीत स्वहिश्यासाठी आवश्यक संपुर्ण निधी उभारण्याची लातूर महानगरपालिकेची जबाबदारी राहिल व त्यासाठीचा आवश्यक ठराव व तरतुद लातूर महानगरपालिकेने समितीसमोर सादर करावा तसेच कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाला Financial Closure शिवाय कार्यादेश (Work Order) देऊ नये. अशी समितीने शिफारस केली. संदर्भ क्रं. 12 च्या प्रशासकीय ठराव क्रं. 193 दिनांक 24.06.2024 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अंतर्गत पाणी पुरवठा प्रकल्पाकरीता प्रकल्पातील स्वहिश्यापोटी आवश्यक निधीची रक्कम उभारणी करणे व तसेच राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मुळ निविदा किंमतीपेक्षा जादा दराने निविदा मंजुर केल्यास स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणे महानगरपालिकेस क्रमप्राप्त आहे. त्यासाठी महानगरपालिकेने 15 वा / 16 वा वित्त आयोग अनुदानातुन स्वहिःस्सा पोटी निधी चिन्हांकित करुन ठेवावा, मालमत्ता व इतर करापोटी वसुल होणा-या रक्कमेतुन निधीची तरतुद व तसेच मनपा फंड, म्युनिसिपल बॉन्ड, मुन्क्रा लोन, कर्ज व इतर पर्यायी स्त्रोतांचा अवलंब करुन स्वहिश्याची अधिकची रक्कम उभारणी करणे करिता मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्रं. 13 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा योजनेचा मनपा स्वःहिश्याचा निधी उभारणीबाबत ठराव व तरतुदीबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी बाजारभावाबाबत अधिकची चौकशी केली असता DI Pipe चे दरामध्ये अंदाजपत्रक दर व बाजारभावच्या दरामध्ये खुप तफावत असुन आर अॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली यांनी सादर केलेले अंदाजपत्रक दरापेक्षा ४.४० % जास्तीचे दर समर्थनिय असुन सदर कामामध्ये प्रमुख काम हे DI Pipe चा पुरवठा हे आहे भविष्यात आणखिन दरामध्ये वाढ झाल्यास त्याचा अतिरीक्त आर्थीक बोजा महापालिकेवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी संदर्भ क्रं. 14 अन्वये शिफारस केली आहे. संदर्भ क्रं. 15 मा. प्रधान सचिव, नवि-2 यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीचे इतिवृत्त अन्वये समितीने मंजुर प्रकल्प किंमतीपेक्षा अधिकची रक्कम उभारण्याची जबाबदारी लातूर महानगरपालिकेची राहील. त्यासाठीचा आवश्यक ठराव व तरतूद लातूर महानगरपालिकेने करणे आवश्यक राहील असे नमुद केले त्यास आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी सहमती दर्शविली म्हणुन समितीने सदर प्रकल्पाचे कार्यादेश देण्यास समितीने मान्यता दिली. सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेले पाणी आरक्षण मंजुरी जलसंपदा विभागाकडुन सक्षम पातळीवर प्राप्त झाल्याची खातरजमा करुन, आवश्यक परवानग्या घेऊन व प्रकल्पातील उर्पांगाच्या जागा महानगरपालिकेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करुन तसेच सदर प्रकल्पासाठी आवश्यक स्वहिःश्श्याच्या निधीची तरततुद करुन आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी संबंधित कामाचे कार्यादेश निर्गमित करावे असे समितीने सुचित केले. निविदा प्रक्रियेनुसार पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने व प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण करण्यासाठी विहीत कार्यपध्दतीनुसार आवश्यक कार्यवाही करावी तसेच, प्रकल्पासाठी स्वहिःश्श्याची आवश्यक तरतुद, आवश्यक जागा, विविध विभागांच्या आवश्यक परवानग्या व प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक इतर तांत्रिक बाबींची पुर्तता करुन आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी कार्यादेश निर्गमित करावा.

तरी आर अॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे सर्वात कमीचे +४.४०% जास्तीने म्हणजे रु. 2369967987.20/- दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय :- राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मंजुर केलेल्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणेसाठीच्या कामास अंदाजपत्रक दरापेक्षा +४.४०% जास्तीने म्हणजे रु. 2369967987/- दरास मान्यता देऊन कार्यादेश देण्याकरिता मान्यता दिली आहे व तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी दर मंजुरी बाबत शिफारस केल्यानुसार मे. आर अॅन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., बोरीवली (वेस्ट) मुंबई यांचे सर्वात कमीचे +४.४०% जास्तीने म्हणजे रु. 2369967987/- दरास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. वरील कामाचे कार्यादेश तात्काळ देऊन कामे कालावधीत पुर्ण करुन घेण्यात यावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 214 दिनांक 09/08 / 2024

विषय - लातूर शहर महानगरपालिका,लातूर हद्दीतील असलेले शहर वाहतुक बस थांबेचे दुरुस्ती व सुशोभीकरणाचे कामे जाहीरातीचे हक्क देऊन विकसित करणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिका,लातूर हद्दीत असलेले मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतुन तयार करण्यात आलेले शहर वाहतुक बस थांबे विवेकानंद चौक, गंजगोलाई, गांधी चौक, क्रिडा संकुल, बांधकाम भवन, पाच नंबर चौक, एकमत शहर थांबा, साई चौक, जुना रेणापुर नाका, एस.टी विभागीय कार्यशाळा येथील शहर बस वाहतुकीचे थांबेचे दुरुस्ती व सुशोभिकरण 2 वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन व्यापारी, सामाजिक संस्था,बँका यांच्या मार्फत विकसित करणे शक्य होणार आहे. मनपाने ठरवुन दिलेले दर एजन्सीधारकास भरणे बंधनकारक राहिल

अ) लातूर शहरातील शहर बस थांबे गरूड चौक ते नविन कलेक्टर ऑफिस

1. विवेकानंद चौक शहर बस थांबा
2. गंजगोलाई शहर बस थांबा
3. गांधी चौक शहर बस थांबा
4. बार्शी रोड एक नंबर
5. 5 नं. पीव्हीआर चौक शहर बस थांबा
6. एकमत ऑफिस, शहर बस थांबा

ब) लातूर शहरातील शहर बस थांबे राजीव गांधी चौक ते साई चौक

1. क्रिडा संकुल शहर बस थांबा
2. जुना रेणापुर नाका शहर बस थांबा
3. एस.टी विभागीय कार्यशाळा शहर बस थांबा
4. साई नाका शहर बस थांबा

क) लातूर शहरातील शहर बस थांबे छत्रपती चौक ते राजीव गांधी चौक

1. बांधकाम भवन शहर बस थांबा – 1 व 2 (पुर्व भाव व पश्चिम भाग)

जाहीरातीचे ठिकाण	बयाणा रक्कम (EMD)	मुळ किंमत (Base Price)
गरूड चौक ते नविन कलेक्टर ऑफिस पर्यंतचे बस थांबे (वरील अ प्रमाणे)	रू.5000/-	रू.10,000/-
राजीव गांधी चौक ते साई चौक पर्यंतचे बस थांबे (वरील ब प्रमाणे)	रू.5000/-	रू.10,000/-
लातूर शहरातील शहर बस थांबे छत्रपती चौक ते राजीव गांधी चौक (वरील क प्रमाणे)	रू.5000/-	रू.10,000/-

वरीलप्रमाणे काम करणेसाठी जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्धी देऊन प्रस्ताव मागविणे आवश्यक आहे. तरी वरीलप्रमाणे परिवहन विभागामार्फत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

PTO

Scanned with OKEN Scanner

निर्णय :-

वरील प्रमाणे परिवहन विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका,लातूर वरील **अ,ब व क** प्रमाणे दुरुस्ती देखभाल, सुशोभिकरण व निगा 2 वर्ष कालावधीसाठी जाहीरातीचे हक्क देऊन विकसीत करणेस याद्वारे मान्यता देण्यात येते. सदरचे कामामध्ये परिवहन विभाग,मालमत्ता विभाग व उद्यान विभाग यांनी समन्वय ठेऊन काम करावे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 215 दिनांक 09 / 08 / 2024

विषयः- अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा करणे या योजना अंतर्गतच्या कामाबाबत.

संदर्भः -१) शासन निर्णय क्र.नाक्षेवि-२०२३/प्र.क्र.८४/का-९, दि.१५ मार्च, २०२४
२) जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांचे पत्र क्र.२०२३-२४/अल्पसंख्याक/का-६/११५४ दि.११.०६.२०२४
३) या कार्यालयाचा प्रस्ताव पत्र क्र.लामनपा/बांध./४९३६/२०२४-२५ दि.०१.०८.२०२४

प्रस्तावना-

संदर्भ क्र.०१ च्या अल्पसंख्यांक विभागाच्या शासन निर्णयान्वये सन २०२३-२४ साठी खालील कामांना मंजूरी मिळाली असून कायान्वयन यंत्रणा महानगरपालिका आहे. त्यानुषंगाने जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्र.०२ अन्वये जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांनी सदर कामांची अंदाजपत्रके आवश्यक कागदपत्रासह सादर करणेसाठी कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रु.(लक्ष)
१.	प्रभाग क्र.०४ मध्ये न्यू काझी मोहल्ला डी.पी. ते रुखय्याबेगम हायस्कुल गेट पर्यंत सी.सी. रस्ता करणे.	२०.००
२.	प्रभाग क्र.०४ मध्ये न्यू काझी मोहल्ला येथे शेख आरेफ घर ते शेख खाजा भाई घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे.	१०.००
३.	प्रभाग क्र.०२ मध्ये मस्जिद इस्माईल ते पठाणसाब घरापर्यंत सी.सी. रस्ता करणे.	१०.००

तथापि, सदर कामे ही म.न.पा. मार्फत हाती घेतले किंवा नाही ? याबाबत संबंधित प्रभाग अभियंता यांनी सदर ठिकाणांची प्रत्यक्ष स्थळ पहाणी/खात्री करुन संबंधित प्रभाग अभियंता यांनी खालील कामे म.न.पा.मार्फत हाती घेतले नसलेबाबतचा अभिप्राय दिले आहेत. त्यानुषंगाने संदर्भ क्र.०३ च्या पत्रान्वये खालील कामांना प्रशासकिय मान्यता मिळणेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे. परंतू सदर कामाचा ठराव देणेसाठी समक्ष सुचना दिले आहे.

तसेच महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरामध्ये भूमीगत गटारची कामे चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे ना-हरकत (NOC) घेऊनच कामांची सुरुवात करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः- अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा करणे या योजना सन २०२३-२४ अंतर्गतच्या ०३ कामांना मान्यता देण्यांत येते. तसेच साल-सन २०२४-२०२५ साठी अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा करणे या योजना अंतर्गत मंजूर होणा-या कामांनाही मान्यता देण्यांत येते.

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरामध्ये भूमीगत गटारची कामे चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे ना-हरकत (NOC) घेऊनच कामांची सुरुवात करणेच्या अटीस अधिन राहून मान्यता देण्यांत येते. तसेच सदरची कामे योग्य दर्जाचे होतील याची खबरदारी घ्यावी.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 216 दिनांक 09/08 / 2024

विषयः- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२३-२०२४ अंतर्गतच्या कामाबाबत.

संदर्भः -१) शासन निर्णय क्र.मनपा-२०२४/प्र.क्र.४०(७०)/नवि-१६(ई-७३१३७१) मंत्रालय, मुंबई-३२ दि. २६ फेब्रुवारी, २०२४

२) शासन शुध्दीपत्रक क्र. मनपा-२०२३/प्र.क्र.४०(७०)/नवि-१६(ई-७३१३७१) मंत्रालय,मुंबई-३२ दि. ०९जुलै, २०२४

३) उपविभागीय अभियंता, सार्व.बांधकाम उपविभाग क्र.२, लातूर यांचे पत्र क्र. तां.शा./ दि.१०.०७.२०२४

प्रस्तावना-

संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" योजना अंतर्गत सन २०२३-२४ करिता लातूर महानगरपालिकेस रु.६.०० कोटीच्या खालील कामास मंजूरी देण्यांत आली आहे.तथापि, संदर्भ क्र.०२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये कार्योन्वयन यंत्रणा **"महानगरपालिका"** या ऐवजी **"सार्वजनिक बांधकाम विभाग"**असल्याचे कळविलेवरुन संदर्भ क्र.०३ च्या पत्रान्वये उपविभागीय अभियंता, सार्व.बांधकाम उपविभाग क्र.२, लातूर यांनी सदर कामांसाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे मिळणेची विनंती केली आहे.

सदर कामे ही म.न.पा., मार्फत हाती घेतले किंवा नाही ? याबाबत संबंधित प्रभाग अभियंता यांनी सा.बां.विभागामार्फत तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांच्या ठिकाणास प्रत्यक्ष स्थळ पहाणी/खात्री करुन संबंधित प्रभाग अभियंता यांनी खालील कामे म.न.पा.मार्फत हाती घेतले नसलेबाबतचा अभिप्राय दिले आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रु.(लक्ष)
१.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
४.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
५.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
६.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
७.	प्रभाग क्र.०२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
८.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
९.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१०.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
११.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१२.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१३.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१४.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१५.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००

Scanned with OKEN Scanner

१६.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१५.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
१८.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
१९.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
२०.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
२१.	प्रभाग क्र.१२ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
२२.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२३.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२४.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२५.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
२६.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
२७.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२८.	प्रभाग क्र.०१ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
२९.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३०.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३१.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३२.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३३.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३४.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
३५.	प्रभाग क्र.११ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
३६.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३७.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३८.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
३९.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
४०.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण / रस्ता करणे.	१०.००
४१.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
४२.	प्रभाग क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी बांधकाम करणे.	१०.००
४३.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
४४.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
४५.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
४६.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
४७.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
४८.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
४९.	प्रभाग क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५०.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५१.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५२.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५३.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५४.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५५.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
५६.	प्रभाग क्र.१६ मध्ये विविध ठिकाणी नाली बांधकाम करणे.	१०.००
५७.	प्रभाग क्र.१२ मध्ये गणपती मदिर सभागृह बांधकाम करणे.	१०.००
५८.	प्रभाग क्र.१२ मध्ये लादीकरण/रस्ता करणे.	१०.००
५९.	प्रभाग क्र.१२ मध्ये लादीकरण/रस्ता करणे.	१०.००

Scanned with OKEN Scanner

६०.	प्रभाग क्र.१२ मध्ये नाली बांधकाम करणे.	१०.००

तरी वरिल ६० कामांसाठी लागणारे आवश्यक प्रमाणेपत्रे सार्वजनिक बांधकाम विभागास देणेच्या व संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्ती सार्वजनिक बांधकाम विभागास बंधनकारक असणेच्या निर्णयास्तव सादर.

तसेच महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अतर्गत शहरामध्ये भूमीगत गटारची काम चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे ना-हरकत (NOC) घेऊनच कामांची सुरुवात करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः- "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" योजना सन-२०२३-२०२४ अंतर्गतच्या ६० कामांसाठी लागणारे आवश्यक प्रमाणेपत्रे सार्वजनिक बांधकाम विभागास देणेस मान्यता देण्यांत येते. तसेच संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्ती सार्वजनिक बांधकाम विभागास बंधनकारक राहतील. तसेच साल-सन २०२४-२०२५ साठी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" योजना अंतर्गत मंजूर होणा-या कामांनाही मान्यता देण्यांत येते.

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरामध्ये भूमीगत गटारची कामे चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे ना-हरकत (NOC) घेऊनच कामांची सुरुवात करणेच्या अटीस अधिन राहून मान्यता देण्यांत येते. तसेच सदरची कामे योग्य दर्जाचे होतील याची खबरदारी घ्यावी.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं. 217... दिनांक - 16/08/2024

प्रस्ताव-

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या शादीखाना / मंगल कार्यालय व्यापारी संकुल येथील हॉलचे भाडे ठरवुन जाहीर लिलाव करण्यास मान्यता देणेस निर्णय घेणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका यांनी सन 1911 मध्ये शादीखाना / मंगल कार्यालय बांधकाम पूर्ण होऊन ते महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे. सदर ठिकाणी शादीखाना / मंगल कार्यालय हॉल मनपाने सुसज्ज अशी नागरीकांसाठी सोयीसुविधा निर्माण करून दिली आहे. शादीखाना बांधण्याचा मुख्य उद्देश हा लातूर शहरातील नागरीकांसाठी लग्न समारंभासाठी व शुभ कार्यासाठी अल्पदरात देणे हा आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब अधिसूचना दिनांक- २८ एप्रिल २०२३ अन्वये लातूर शहरातील मनपाच्या मालकीचे असलेल्या शादीखाना/ मंगल कार्यालय भाडे निश्चीतीबाबत आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीचे गठीत करणे बाबतची मा.आयुक्त,अतिरिक्त आयुक्त, जिल्हा उप/सह निबंधक (मुद्रांक) , कॉटणी व मुद्रांक विभाग, महसुल व वनविभाग , सह आयुक्त (नगर प्रशासन), सहायक संचालक, नगर रचना, विभाग, लिपीक विभाग, अध्यक्षाव्दारे नियुक्ती केलेली राज्य शासकीय,उपायुक्त किंवा मालमत्ता विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत असुन उक्त समितीची बैठक दिनांक १६.०८.२०२४ रोजी मा.आयुक्त,मनपा, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शादीखाना/ मंगल कार्यालय याचे भाडे वार्षिक १८७०४/- रू. ०.१ % प्रमाणे घेण्याचे व जाहिर लिलाव करून संस्थेस/ठेकेदारास देण्याचे ठरले.

तरी या भागातील खाजगी मंगल कार्यालयाच्या भाड्याच्या दराचा विचार करून शहरातील नागरीकांना भाड्याने दिल्यास मनपास आर्थिक उत्पन्न प्राप्त होणार आहे तसेच गरिब सामान्य कुटुंबांना विविध कार्यासाठी हॉल उपलब्ध होइल. तरी समितीने निश्चीत केलेल्या हॉलचे प्रति महा १८७०४/- रुपये भाडे ठरवुन खाजगी संस्थेस/ ठेकेदार यांना देखभाल व दुरुस्ती करीता व जाहिर लिलाव करणे करीता निर्णय घेणेस्तव सविनय सादर.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार शादीखाना / मंगल कार्यालय हॉल मनपाने मनपा निधीतून बांधकाम केले आहे. शादीखाना बांधण्याचा मुख्य उद्देश हा लातूर शहरातील नागरीकांसाठी लग्न समारंभासाठी व शुभ कार्यासाठी अल्पदरात देणे हा आहे. तरी या भागातील खाजगी मंगल कार्यालयाच्या भाड्याच्या दराचा विचार करून शहरातील नागरीकांना भाड्याने दिल्यास मनपास आर्थिक उत्पन्न प्राप्त होणार आहे. तरी समितीने निश्चीत केलेल्या हॉलचे प्रति महा १८७०४/- रुपये भाडे ठरवुन खाजगी संस्थेस/ ठेकेदार यांना देखभाल व दुरुस्ती करीता व जाहिर लिलाव करणे करीता मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

कोंडवाडा विभाग

प्रशासकिय ठराव

ठराव क्र. : - 218 दिनांक 21/08/2024

विषय : लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी नवी मंबई यांच्या मार्फत म.न.पा. हद्दीत रस्त्यावर मोकाट फिरणारे जनावरे तसेच अपघातग्रस्त, जखमी, आजारी जनावरे पकडुन कोंडवाड्यामध्ये बंदीस्त करण्यात आलेल्या जनावरापैकी 7 दिवसानंतर बेवारस घोपीत झालेले जनावरे कायमस्वरुपी संगोपनासाठी गोरक्षण संस्थेकडे वर्ग करण्यास तात्रिक कारणामुळे विलंब झाल्यास दररोज रक्कम 350/- रु. प्रति जनावर प्रति दिवसाप्रमाणे निवीदा धारकास 10 दिवसापर्यंतचाच संगोपन खर्च आदा करणे व बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरुपी संगोपनासाठी गोरक्षण संस्थेस विनामुल्या वर्ग केल्यानंतर एकट्ठा रक्कम 1000/- रु. प्रमाणे प्रति जनावर चारा खर्च म्हणून गोरक्षण संस्थेस आदा करणे मंजूरी बाबत.

संदर्भ:- 1) स्थायी समिती सभा दि.24/12/2021 विषय क्र.2 ठराव क्र.217

2) प्रशासकीय ठराव दि.30/11/2022 ठराव क्र.59

3) प्रशासकीय ठराव दि.08/03/2023 ठराव क्र.85

4) करारनामा दि.15/03/2023

5) प्रशासकीय ठराव दि.27/02/2024 ठराव क्र.183

6) प्रशासकीय ठराव दि.04/03/2024 ठराव क्र.187

7) देखरेख समिती बैठक दि.28/05/2024

8) अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी नवी मंबई यांच्याशी कामाचा करारनमा व कामाचे आदेश जा.क्र/ लाशमनपाला/ को.वि./ 1754/2023-24 दि.05/03/2024

9) मे. अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी नवी मंबई यांचे पत्र दि. 02/07/2024 आवक क्र. 18647

प्रस्तावणा :-

उपरोक्त विषय व संदर्भानुसार प्रस्ताव सादर,

संदर्भ क्र 01 नुसार स्थायी समिती सभा दि.24/12/2021 विषय क्र. 2 ठराव क्र. 217 नुसार गोरक्षण संस्थांशी चर्चा होऊन संगोपन खर्च प्रति जनावर प्रति दिवस 200/- रुपये ऐवजी 500/- रुपये गोरक्षण संस्थेस अदा करण्यास सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच जनावरास मनपाचा निश्चित दंड म्हणून प्रथम वेळेस 1000/- रुपये व दुसऱ्या वेळेस 2500/- रुपये मान्यता झालेली आहे.

संदर्भ क्र 02 प्रशासकीय ठराव दि. 30/11/2022 ठराव क्र.59 नुसार श्री गुरु गणेश जीवराज जैन गोरक्षण संस्था आंबेजोगाई रोड, लातूर यांच्या मागणी नुसार मोकाट बेवारस जनावरांना संगोपन खर्च म्हणून प्रति जनावर प्रति दिवस 500/- रुपये प्रमाणे 7 दिवसाचे 3500/- रुपये प्रमाणे एकुण 26 बेवारस जनावरांचे रक्कम रु.91000/- सदर गोरक्षण संस्थेस अदा करण्यात आलेला असून तसेच इथून पुढे बेवारस मालक नसलेल्या जनावराचे संगोपन खर्च 500/- रुपये प्रमाणे प्रति दिवस प्रति जनावर 7 दिवसाचे 3500/- रुपये संबंधीत गोरक्षण संस्थेस आदा करणे बाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र 03 प्रशासकीय ठराव दि.08/03/2023 ठराव क्र. 85 नुसार कोंडवड्यात दाखल केलेले जनावरास घेण्यास मालक 7 दिवसापर्यंत आल्यास जनावर मालकास परत करताना आकारण्यात येणारा मनपा दंड प्रथम वेळेस 3000/- रुपये व दुसऱ्या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडल्यास मनपा दंड 6000/- रुपये राहील. तिसऱ्या वेळेस त्याच मालकाचे मोकाट जनावर पकडून कोंडवड्यात दाखल केल्यास थेट जनावर जप्तीची कारवाई करण्यात येईल. तसेच बाहेरगावी गोरक्षण संस्थेची करार झाल्यास मनपा दंड 5000/- रुपये + वाहतूक खर्च प्रति जनावर मालकाने मनपाकडे जमा करणे बाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

// //

Scanned with OKEN Scanner

संदर्भ क्र 04 श्री गुरु गणेश जीवराज जैन गोरक्षण संस्था आंबेजोगाई रोड, लातूर यांच्याशी दि.15/03/2023 रोजी मोकाट जनावरे महानगरपालिकेचे पकडून दाखल करणे बाबत करारनामा करण्यात आला. सन 2024-25 या वर्षात सदरील गोरक्षण संस्थेने मनपाकडून जनावरे घेण्यास संबंधित गोरक्षण संस्थेने करारनामा करण्यास तोंडी नकार दिल्यामुळे खाजगी रित्या कोंडवाडा चालविण्यासाठी गोरक्षण संस्था/ सेवाभावी संस्था /महिला बचत गट/ मजूर सहकारी संस्था/ बेरोजगार संस्था/ खाजगी ठेकेदार यांच्याकडून दि. 06/12/2023 रोजी मनपा संकेतस्थळावर कोटेशन अपलोड करण्यात आले होते. त्यानुसार 14/12/2023 रोजी 03 कोटेशन प्राप्त झाले होते. 03 कोटेशन पैकी अशोक स्वच्छता सेवा मंडळ, वाशी, नवी मुंबई यांचे पत्र दि. **03/01/2024 नुसार अतिरिक्त अटी घातल्यामुळे कोटेशन नामंजूर करण्यात आले.**

संदर्भ क्र 05 लातूर शहर महानगरपालिका हद्दीत कोंडवाड्यासाठी स्वत:ची मनपाकडे जागा व पशुवैद्यकीय दवाखान्याची सोय नसल्यारमुळे मोकाट, बेवारस, आजारी फिरणा-या जनावरांना उदा. गाय, बैल, म्हेस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी ईत्यादी जनावरे पकडुन स्वत:चे वाहन, जागा, आजारी जनावरांना औषधोऊपचार करणे व 7 दिवस संगोपन करणे नंतर प्रशासनाच्या आदेशानुसार गोरक्षण संस्थेंकडे बेवारस जनावरे वर्ग करणे ईत्यादी कामे करण्यारसाठी कंत्राठी पध्दरतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था, खाजगी ठेकेदार यांच्या कडुन ई-निवीदा काढणेस्तव व कामे करुण घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र 06 नवीन ई-निविदा बावत चर्चा करण्यात येऊन नवीन ई-निविदा करण्याचे मान्य करण्यात आले व ई-निविदा सूचना क्र. 1/2023-24 LMC-995553-1 दिनांक 02/02/2024 मागण्यात आले व दि. 15/02/2024 रोजी 03 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी L1- अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी, नवी मुंबई यांचे निविदा दाखल करण्यात आली होती. त्यांच्या निविदेतील दर जास्तीचे असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि. 28/02/2024 रोजी पाचरण करण्यात आले होते. अशोक स्वच्छता सेवा मंडल, जे.एन.-1/69 बी/9, सेक्टर, 9 वाशी नवी मुंबई यांनी वाटाघाटीनंतर मोकाट, बेवारस, आजारी जनावरे उदा. गाय, बैल, म्हेस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी इत्यादी जनावरे पकडणे. आजारी जनावरांना औषधोपचार करणे, 7 दिवस संगोपन करून प्रशासनाच्या आदेशावरून बेवारस जनावरे गोरक्षण संस्थेकडे सोडणे इ. कामाकरीता ऑनलाईन तक्ता क्र. 8 नुसार दर व अनुक्रमांक 01 ते 06 कामानुसार वाटाघाटीमध्ये कमी केलेल्या दरास प्रशासकीय ठराव दि.04/03/2024 ठराव क्र. 187 मान्यता देण्यात आली आहे.

वाटाघाटी नंतर सादर केलेले दर तक्ता क्र. 8

अ.क्र.	कामाचे नाव	नग संख्या प्रति जनावर	दिनांक 28/02/2023 वाटाघाटी चर्चा नंतरचे सुधारित दर
1	लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट /बेवारस/आजारी फिरणारे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव, लहान जनावरे व शेळी इत्यादी जनावरे पकडणे **प्रति जनावर** अ) गाय, बैल, म्हैस, रेडा, गाढव ब) लहान जनावरे 3 वर्षापर्यंत क) शेळी	 01 01 01	 **रू. 2500/-** **रू. 2500/-** **रू. 1500/-**
2	कोंडवाडयातील मोकाट/ बेवारस/ आजारी जनावारांचे संगोपन करणे **प्रति दिवस प्रति जनावर** (सात दिवसापर्यंत)	01	**रू. 500/-**
3	कोंडवाडयातील मोकाट/ बेवारस/ आजारी जनावरास औषधोपचार करणे. लहान जनावरे, मोठे जनावरे **प्रति जनावरे सात दिवसाप्रमाणे** अ) मोठे जनावर **(किरकोळ आजार)** ब) लहान जनावर **(किरकोळ आजार)** क) मोठे जनावर **(गंभिर आजार)** ड) लहान जनावर **(गंभिर आजार)**	 01 01 01 01	 **रू. 550/-** **रू. 500/-** **रू. 4000/-** **रू. 4000/-**
4	मनपा हद्दीच्या 10 कि.मी. पुढे अतिरिक्त वाहन भाडे इंधनसहित प्रति कि.मी. चे दर	01 कि.मी.	**रू. 60/-**
5	कामाची मुदत 1 वर्ष **संपल्यानंतर प्रत्येक कामाच्या तपशिलावर संगोपन खर्च वगळून दरवाढ प्रतीवर्षी 5% प्रमाणे देण्यात यावे.**	01	**रू. 930.50/-** **प्रति वर्षी 5% प्रमाणे वाढ**
6	कोंडवाडयात मृत झालेल्या जनावारांचे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे. **प्रति जनावर**	01	**रू. 3000/-**

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त दरास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता दि. 04/03/2024 ठराव क्र. 187 नुसार दरास मान्यता देण्यात आली. त्यानुसार अशोक स्वच्छता सेवा मंडळ वाशी नवी मुंबई यांना कार्यारंभ आदेश जा.क्र/लाशामनपाला/को.वि/1754/23-24 दि.05/03/2024 नुसार लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट फिरणारे मोकाट, बेवारस, अपघातग्रस्त, आजारी जनावरे पकडून कोंडवाड्यात दाखल करणे, तसेच संगोपन करणे व ईतर कामे करण्याचे आदेश देण्यात आले .

जनावरे कोंडवाड्यात दाखल केल्यानंतर बंदिस्त केलेल्या दिनांकापासुन 7 दिवसापर्यत प्रति जनावर प्रति दिवस 500/- रुपये प्रशासकीय ठराव दि.08/03/2023 ठराव क्र.85 नुसार निविदाधारकास निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे देण्याचे मान्य केलेले आहे. कोंडवाड्यामध्ये जनावरास 07 दिवस पूर्ण झाल्यानंतर बेवारस घोषित झालेले जनावरे निशुल्क कायम स्वरुपी संगोपन करण्यासाठी गोरक्षण संस्थेकडे वर्ग करण्याकरिता मनपाकडून जनावरे घेण्यासंबंधी लातूर गोरक्षण संस्थेस समक्ष भेट घेऊन व फोन द्वारे, व पत्रव्यवहार दि.21/05/2024, दि.11/06/2024 रोजी निळकंठेश्वर गोरक्षण संस्था साखरा पाटी, तसेच श्री गोरक्षण संस्था सोमनाथपुर उदगीर यांच्याशी केले असता बेवारस जनावरे घेण्यासाठी चारा, जागा व आर्थिक कारणास्तव जनावरे घेण्यास गोरक्षण संस्थेकडून लेखी व तोंडी मेसेज द्वारे नकार देण्यात आलेला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी नवी मंबई यांच्या मार्फत महानगरपालिका हद्दीतील रस्यावर मोकाट फिरनारे जनावरे तसेच आपघातग्रस्त, जखमी, आजारी जनावरे पकडुन कोंडवाड्यामध्ये बंधीस्त करण्यात आलेल्या जनावरापैकी ७ दिवसानंतर बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरुपी संगोपन करण्यासाठी गोरक्षण संस्थेतकेडे वर्ग करण्यास तात्रिक कारणामुळे विलंब झाल्यास दररोज रक्कम 350/- रु. प्रति जनावर प्रति दिवसाप्रमाणे मुदतीचे 7 दिवस संपल्यानंतर निवीदा धारकास 10 दिवसापर्यंतचाच संगोपन खर्च रू. 350/- प्रमाणे पुर्वलक्षीप्रभावाणे अदा करणे व या कालावधी जनावर मालक जनावर परत घेण्यासाठी आल्यास नियमाप्रमाणे विहित कालावधीत दर्शविल्यानुसार मनपा दंड, संगोपन खर्च व वाढीव दिवसाचा संगोपन खर्च, जनावराची व मालकाची ओळख पटवून जनावर परत देणेसाठी कार्यवाही करणे.

बेवारस घोषीत झालेले जनावरे कायम स्वरुपी गोरक्षण संस्थेस विनामुल्य वर्ग केल्यानंतर एकट्ठा रक्काम रु. 1000/- प्रमाणे प्रति जनावर चारा खर्च म्हणून गोरक्षण संस्थेस अदा करणे.

प्रशासकिय ठराव दि. 08/03/2023 ठराव क्र. 85 मध्ये नमुद केल्यानुसार सदर मुद्दयामध्ये दुरूस्ती करून शहरात किंवा बाहेरगावी गोरक्षण संस्थेस बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरूपी वर्ग केल्यानंतर जर जनावर मालक जनावर परत घेण्यास आल्यास सदरील गोरक्षण संस्थेनी कोंडवाडा विभाग प्रमुखाशी संपर्क साधुन कोंडावाडा विभाग प्रमुख यांनी जनावर मालकाकडून मनपा दंड रू. 5000/- ऐवजी रू. 3000/- व संगोपन खर्च प्रति दिवस रू. 500/- प्रमाणे 7 दिवसापर्यंत व 7 दिवसाव्यतीरिक्त वाढीव दिवसाचा चारा / संगोपन खर्च रू. 350/- प्रति दिवस प्रती जनावराप्रमाणे तसेच नियमानुसार वाहतूक खर्च भरणा करून जनावर परत देण्याची कार्यवाही करावी.

या व्यतीरिक्त गोरक्षण संस्थेने जनावर मालकास जनावर देताना गोरक्षण संस्थेचा झालेला खर्च नियमानुसार जनावर मालकाकडून वसुल करावा. याबाबत मा. उपायुक्त यांच्याशी चर्चा करून सदरील ठराव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे मंजुरीस्तव सादर.

प्रशासकिय निर्णय :-

लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत अशोक स्वच्छता सेवा मंडल वाशी नवी मंबई यांच्या मार्फत म.न.पा. हद्दीत रस्त्यावर मोकाट फिरणारे जनावरे तसेच अपघातग्रस्त, जखमी, आजारी जनावरे पकडुन कोंडवाड्यामध्ये बंदीस्थ करण्यात आलेल्या जनावरापैकी 7 दिवसानंतर बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरुपी संगोपनासाठी गोरक्षण संस्थेकडे वर्ग करण्यास तात्रिक कारणामुळे विलंब झाल्यास दररोज रक्कम 350/- रु. प्रति जनावर प्रति दिवसाप्रमाणे निवीदा धारकास 10 दिवसापर्यंतच चारा/ संगोपन खर्च अदा करणे व या कालावधीत जनावर मालक जनावर परत घेण्यास आल्यास नियमाप्रमाणे विहित कालावधीत दर्शविल्यानुसार मनपा दंड, संगोपन खर्च व वाढीव दिवसाचा संगोपन खर्च, जनावराची व मालकाची ओळख पटवून जनावर परत देणेसाठी कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरुपी संगोपनासाठी गोरक्षण संस्थेस विनामुल्या वर्ग केल्यानंतर एकट्ठा रक्कम 1000/- रु. प्रमाणे प्रति जनावर चारा खर्च म्हणून गोरक्षण संस्थेस आदा करण्यात येईल.

बेवारस घोषीत झालेले जनावरे कायमस्वरूपी गोरक्षण संस्थेकडे वर्ग केल्यानंतर जनावर परत घेण्यास जनावर मालक आल्यास कोंडवाडा विभाग प्रमुख यांनी जनावर मालकाकडून मनपा दंड रू. 3000/-, संगोपन खर्च रू. 500/- प्रति दिवस प्रति जनावर 7 दिवसापर्यंत तसेच वाढीव दिवसाचा संगोपन खर्च रू. 350/- प्रति जनावर प्रती दिवसाप्रमाणे तसेच नियमानुसार वाहतूक खर्च वसूल करून जनावर परत देण्याची कार्यवाही करावी.

या व्यतिरिक्त गोरक्षण संस्थेने जनावर मालकास जनावर देताना गोरक्षण संस्थेचा झालेला खर्च नियमानुसार जनावर मालकाकडून वसुल करावा. उपरोक्त प्रमाणे ठरावास प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.-~~219~~--------ठराव क्रं.----~~219~~---------- दिंनाक 26/08/२०२४

विषयः-मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

"लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी,अंतर्गत कर संकलन केंद्र स्थापन करणे बाबत.प्रस्ताव मागवणे व आलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर."

प्रस्तावनाः-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराच्या उत्तपनाचे एकमेव स्त्रोत,मालमत्ताकर असल्याने तसेच शहरामध्ये मालमत्ताकराची व पाणी पट्टी कराची वसूली मोठया प्रमाणात थकीत असल्याने व क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र मोठया प्रमाणात व्यापलेले असल्याने कर वसूलीसाठी मनपाचे मनुष्यबळ कमी असल्याने वसूली लिपीक कर वसूलीसाठी सर्व मालमत्ताधारकांपर्यंत पोहोचू शकत नसल्याने यांचा परिणाम मालमत्ताकर वसूलीवर होत असून वसूलीचे उदिष्ट साध्य करता येत नाही.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम १९४९ प्रकरण आठ नियम ५५-अ अन्वये मालमत्ता कराची रक्कम भरण्याच्या सुविधेसाठी विषेश तरतूद असून या अधिनियमान्वये कराची रक्कम किंवा अन्य कोणत्याही देय रक्कम भरण्यास पात्र असणा-या कोणत्याही व्यक्तीस, महानगरपालिकेने तिच्या अधिकार क्षेत्रात प्रसृत (Circulating) होणा-या दोन अग्रगण्या वर्तमानपत्रांमध्ये जाहीर नोटीस देऊन त्याबाबतची विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेत किंवा कोणत्याही अभिकरणाकडे त्या रक्कमेचा भरणा करण्याच्या सुविधेचा उपयोग करून घेता येईल.आणि स्वतःला अशा सुविधेचा उपयोग करून घेणारी व्यक्ती,आयुक्त निर्धारित करील त्याप्रमाणे,अशा बँकेकडे किंवा यथास्थिती, अभिकरणाकडे त्या संबंधितील अशी फी भरण्यास पात्र असेल. अशी तरतूद आहे.

मालमत्ताधारकांना कर भरणा करणे सोईचे व्हावे यासाठी उक्त अधिनियमातील तरतूदीन्वये क्षेत्रातील कार्यक्षेत्रामध्ये सहकारी बॅका,राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था व ई महासेवा केंद्रमध्ये मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा मालमत्ताधारकामार्फत ऑनलाईन करून घेण्यासाठी कर संकलन केंद्र स्थापण करण्याबाबत मा.आयुक्त यांनी दिं.०६/०८/२०२४ रोजी मान्यता दिली असल्याने शहरातील क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी,अंतर्गत भौगोलिक रचनेनुसार कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येकी पाच केंद्र स्थापन करणे योग्य होईल संबधित कर संकलन केंद्रास मालमत्ताकर व पाणी पट्टीकराच्या जमा होणा-या वसूलीवर काही मोबदला ठरवून देऊन कर वसूलीचे केंद्र उपलब्ध करून दिल्यास मालमत्ताधारकांना कर भरणा करणे सोईचे होईल व त्यामुळे मनपाच्या महसूली उत्पनात वाढ होईल.

तसेच मनपा संर्कीण लेखार्शीष असलेल्या तरतूदीतील निधी या कामी खर्च करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी, अंतर्गत कर संकलन केंद्र स्थापण करण्यासाठी सहकारी बॅका,राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था व ई महासेवा केंद्र यांच्या मार्फत प्रस्ताव मागविण्यात यावे आणि कर संकलन केंद्र चालू करण्यात मान्यता देण्यात येते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय निहाय पाच कर संकलन केंद्र स्थापण करण्यात यावे, या बाबतच्या अटी व शर्तीसह द्विपक्षीय करारनामा करण्यासाठी उप-आयुक्त कर संकलन विभाग यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

तसेच स्थापण करण्यात आलेल्या कर संकलन केंद्रामार्फत वसूली करण्यास मान्यता देण्यात येते. निवड झालेल्या कर संकलन केंद्रास व्यवस्थापणा करिता वित्तीय सहाय्य हे वसूली झालेल्या प्रमाणात देण्यात येईल. त्यानुसार ज्यानी मालमत्ताकर व पाणी पट्टी कर वसूली (व्याज/शास्तीची वसूली वगळून) ५० लक्ष पूर्ण केल्यास (५० हजार), १ कोटी पूर्ण केल्यास (७५ हजार), २ कोटी रू वसुली पूर्ण केल्यास (२ लक्ष) व २ कोटी रू.पुढील रक्कमेवर रू.(३ लक्ष) मोबदला म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते. सदरचा मोबदला हा वरील देण्यात आलेल्या मासिक अहवालावरुन देण्यात यावा. कर संकलन केंद्रास व्यवस्थापणा करिता वित्तीय सहाय्य मोबदला व्यतीरिक्त कोणत्याही प्रकारचे दुरूस्ती.स्टेशनरी चार्ज अथवा इतर चार्ज देय राहणार नाहीत.

कर संकलन केंद्रास ऑसेन्टेक एजन्सीमार्फत फक्त ऑनलाईन पध्दतीने वसूली करण्यासाठी, मालमत्ता सर्च करणे इ.कामासाठी युजर आयडी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
ग्रंथालय विभाग

ठराव क्रः- 220 दि. 29/08/2024

विषयः- श्री शिवछत्रपती ग्रंथालयाचे नुतनीकरण करण्यासाठी १०,००० स्क्वे.फुट जागा उपलब्ध करणे बावत.

प्रस्तावनाः- लातूर जिल्हा सार्वजनीक ग्रंथालय संघाचे ३९ वे वार्षीक अधिवेशन दि. २७/०१/२०२४ रोजी दयानंद सभागृहामध्ये संपन्न झाले होते. या अधिवेशनासाठी मा.ना. संजयजी बनसोडे, मा.आ. अमितजी देशमुख, मा.आ. अभिमन्युजी पवार, ग्रंथालय संचालक, उपसंचालक मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष इत्यादी प्रमुख लोकांची उपस्थीती होती.

सदरील अधिवेशनात ठराव क्र. ७ अन्वये श्री शिवछत्रपती ग्रंथालय मनपा लातूर या ग्रंथालयाच्या नविन इमारत बांधकामासाठी शासनाकडून ५ कोटी नीधीची मागणी करणे बाबत मा.आ. अमितजी देशमुख यांनी ठराव मांडला व त्यास मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मा. रामजी मेखले यांनी अनुमोदन देऊन ठराव सर्वानुमते पारीत झाला.

वरील ठरावाच्या अनुशंघाने श्री शिवछत्रपती ग्रंथालयाच्या पाठीमागील बाजुस असलेल्या जवळपास १०,००० स्क्वे.फुट जागेमध्ये नविन ग्रंथालयाच्या वास्तुची निर्मीती करण्यासाठी शासन स्तरावरुन ऐतीहासीक वास्तुचे जतन अंतर्गत ५ कोटीचा निधी मागविण्यासाठी आर्थीक व प्रशासकीय मंजुरीसाठी समीती समोर ठेवण्यात येणारी टिपणी मंजुरीस्तव सविनय सादर .

निर्णयः-

श्री शिवछत्रपती ग्रंथालयाच्या पाठीमागील बाजुस उपलब्ध असलेल्या १०,००० स्क्वे.फुट जागा तसेच सध्या अस्तित्वात असलेली ग्रंथालयाची जागा असे दोन्ही मिळून अशा एकत्रित भूखंडावर नविन ग्रंथालय इमारत करण्यासाठी या ठरावा द्वारे सर्वानुमते मान्यता देण्यात येते. यासाठी सर्वप्रथम ग्रंथालयाच्या पाठीमागील जागेचा वापर करुन नविन बांधकाम करण्यात यावे व त्यानंतर श्री शिवछत्रपती ग्रंथालय नविन पाठीमागील जागेमध्ये शिफ्ट झाल्यानंतर सध्या अस्तित्वात असलेली जागा पाडून नविन जागेसोबत सदरील बांधकाम करण्यात यावे. तसेच यासाठी लागणाऱ्या निधीसाठी जिल्हा ग्रंथालय संघाच्या ठराव क्र. ७ दि. २७/१/२०२४ अन्वये शासनास निधी मागविण्या करिता रितसर प्रस्ताव मनपाच्या बांधकाम विभागा मार्फत तयार करुन तात्काळ शासनास सादर करावा व निधी उपलब्ध झाल्यानंतरच वर नमुद केलेल्या जागेमध्ये बांधकाम करावे.

वरिल प्रमाणे श्री शिवछत्रपती ग्रंथालयाचे नुतनीकरण करण्यासाठी जागा बाबत आर्थीक व प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 221 दि. 03/09/२०२४

विषय – घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी संकलन विलगीकरण वाहतूक आणी महापालिका घनकचराप्रक्रिया करणे.

प्रस्ताव –

ई-निविदा सूचिका क्र.०२ घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी संकलन विलगीकरण वाहतूक आणी महापालिका घनकचराप्रक्रिया करणे करीता दि.११.०६.२०२४ ते ०५.०७.२०२४ पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Tender ID No.2024_LMC_1040469_1 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या व विहीत वेळेत एकूण ०३ निविदा प्राप्त झाले असल्याने निविदेचा लिफाफा क्र.१ (तांत्रिक) उघडण्यात आले असून पात्र निविदा धारकांचे लिफाफा क्र.०२ (आर्थीक) दि.२०.०८.२०२४ रोजी मा.अति.आयुक्त यांच्या मान्यतेने उघडण्यात आला तरी सदर निविदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	Name	Door to Door Collection and segregation of Municipal solid waste MSW 2016 Rules in LCMC	Transporting of Municipal solid waste at Varvanti as per MSW 2016 Rules in LCMC for		Processing of Municipal solid waste at Varvanti as per MSW 2016 rules for		Total
		Per household	Wet waste (Per Ton)	Dry waste (Per Ton)	Wet waste (Per Ton)	Dry waste (Per Ton)	
१	**M/S Ashok Enterprises**	**3.94**	**1587**	**1747**	**689**	**497**	**4523.94**
२	Konark Infrastructure Ltd.	4.50	1790	1950	715	650	5109.50
३	R AND B INFRA PROJECT PRIVATE LIMITED	5.00	1890	2000	800	700	5395

तरी सर्वात कमी दर **M/S Ashok Enterprises** यांचे असून दि.२०.०८.२०२४ रोजी वाटाघाटी करीता पत्र देण्यात आले असून दि.२१.०८.२०२४ रोजी मा.आयुक्त यांच्या कक्षात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेले वाटाघाटी बैठकीतनंतर **M/S Ashok Enterprises** यांनी सुधारीत सादर केलेल दर खालील प्रमाणे.

अ.क्र	कामाचे तपशील	एकक	दि.२१.०८.२०२४ रोजी वाटाघाटी नंतरचे सुधारीत दर (आकडे रू.)
१	Door to Door Collection and segregation of Municipal solid waste MSW 2016 Rules in LCMC	Per Household	3.91
२	Transporting of Municipal solid waste at Varvanti as per MSW 2016 Rules in LCMC for 1) Wet waste	Per Ton Per Day	1580
३	2) Dry waste	Per Ton Per Day	1740
४	Processing of Municipal solid waste at Varvanti as per MSW 2016 rules for 1) Wet waste	Per Ton Per Day	680
५	2) Dry waste	Per Ton Per Day	491

Scanned with OKEN Scanner

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी M/S Ashok Enterprises चे दर रू. ४,४९४.९१/- (अक्षरी चार हजार चारशे चौ-यानव्व रूपये एक्यानव्व पैसे) सर्वात कमी असून M/S Ashok Enterprises यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी संकलन विलगीकरण वाहतूक आणी महापालिका घनकचराप्रक्रिया करणे या कामासाठी सर्वात कमी दर M/S Ashok Enterprises चे दर रू. ४,४९४.९१/- (अक्षरी चार हजार चारशे चौ-यानव्व रूपये एक्यानव्व पैसे) यांचे दरास अर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक -222---- ठराव क्रमांक -222- दिनांक 06 /09 /2024

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 10 मधील 1223 लाभार्थ्यांपैकी 904 लाभार्थ्यांनी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भ्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थींचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 10 मधील 904 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 10 मधील 904 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 10 मधील 904 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं.223. दिनांक -06/09/2024

<u>प्रस्ताव</u>-

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या शादीखाना / मंगल कार्यालय व्यापरी संकुल येथील हॉलचे जाहिर लिलावास मान्यता देणेस निर्णय घेणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका सर्वे नं 1911 येथे शादीखाना / मंगल कार्यालय बांधकाम पुर्ण होऊन ते महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे. सदर ठिकाणी शादीखाना / मंगल कार्यालय हॉल मनपाने सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना निधीतून बांधकाम केले आहे. शादीखाना बांधण्याचा मुळ उद्देश हा लातूर शहरातील नागरीकासाठी लग्न समारंभासाठी व शुभ कार्यासाठी अल्पदरात देणे हा आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार -ब अधिसुचना दिनांक- २६ एप्रिल २०२३ अन्वये लातूर शहरातील मनपाच्या मालकीचे असलेल्या शादीखाना/ मंगल कार्यालय भाडे निश्चीतीबाबत आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीचे भाडेदर करणे यासाठी मा.आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, जिल्हा उप/सह निबंधक (मुद्रांक), नोंदणी व मुद्रांक विभाग, महसुल व वनविभाग, सह आयुक्त (नगर प्रशासन), सहायक संचालक, नगर रचना, विकास विभाग, अध्यशाव्दारे नियुक्ती केलेली तज्ञ व्यक्ती, उपायुक्त किंवा मालमत्ता विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत असुन उक्त समितीची बैठक दिनांक १६.०८.२०२४ रोजी मा.आयुक्त,मनपा, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शादीखाना/ मंगल कार्यालय याचे भाडे मासिक १८७०४/- रू. ०.५ % प्रमाणे घेण्याचे व जाहिर लिलाव करूण संस्थेस/ठेकेदारास देण्याचे ठरवलेले आहे. व मा. प्रशासकीय ठराव क्रं. 217 दिनांक - 16/08/2024 नुसार शादीखाना / मंगल कार्यालय हॉल मनपाने मनपा निधीतून बांधकाम केले आहे. शादीखाना बांधण्याचा मुळ उद्देश हा लातूर शहरातील नागरीकासाठी लग्न समारंभासाठी व शुभ कार्यासाठी अल्पदरात देणे हा आहे. तरी या भागातील खाजगी मंगल कार्यालयाच्या भाडयाच्या दराचा विचार करुन शहरातील नागरीकांना भाड्याने दिल्यास मनपास आर्थिक उत्पन्न पाप्त होणार आहे. तरी समितीने निश्चीत केलेल्या हॉलचे प्रति महा १८७०४/- रुपये भाडे ठरवुन खाजगी संस्थेस/ ठकेदार यांना देखभाल व दुरुस्ती करीता व जाहिर लिलाव करणे करीता मान्यता देण्यात येते. असा ठराव पारीत करण्यात आला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने दि. 26/08/2024 रोजी जाहिर लिलाव घेण्यात आला आहे.सदर जाहिर लिलावामध्ये शासकिय बोली 18704- रु मासीक भाडयावर ठेवण्यात आली होती. सदर लिलावामध्ये एकुण 03 नागरीकांनी सहभाग नोंदविला होता ते पुढीलप्रमाणे 1. शेख युसुफ नसीमसाब, 2. मुस्तकिम अरीफ सय्यद, 3. सुब्हान महेबुबसाब शेख असे आहेत. सदर जाहिर लिलावामध्ये शेख युसुफ नसीमसाब यांनी 18704/- मासीक भाडेची बोली लावण्यात आली. व मुस्तकिम अरीफ सय्यद यांनी 19704/- मासीक भाडेची बोली लावली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेस्तव सविनय सादर.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार शादीखाना / मंगल कार्यालय हॉलचा दि. 26/08/2024 रोजी जाहिर लिलाव करण्यात आला आहे. सदर जाहिर लिलावामध्ये मुस्तकिम अरीफ सय्यद यांची 19708/- मासीक भाडयाची उच्चतम बोली असल्याने सदर हॉल त्यांना देखभाल व दुरुस्ती व लातूर शहरातील नागरीकासाठी लग्न सभारंभासाठी व शुभ कार्यासाठी अल्पदरात देणे या अटीवर मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं.224 दिनांक -19/09/2024

प्रस्ताव-

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये 15 बस थांब्याचे बांधकाम करणे या कामासाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत मान्यता देणेस निर्णय घेणे बाबत.

मा. उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रं.1, लातूर यांनी विनंती केली आहे, लातूर शहर मतदारसंघात 26 विविध ठिकाणी बसस्टॉप उभे करणे या कामास मा. आ. श्री. अमित विलासराव देशमुख लातूर शहर मतदार संघ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी 15 बसस्टॉप महानगर पालिका हददीमध्ये येतात. विषयांकित कामाचे निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून काम तात्काळ सुरु करायचे आहे. तरी या कामाकरिता ना हरकत प्रमाणपत्र विहित नमुन्यामध्ये देण्यात यावे ही विनंती. असे पत्रात नमूद केले आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी लातूर यांचे प्र.मा. आदेश/जा.क्रं.जीनीस-ला/आस्थाविका/2022-23/कार्या-2/583 दि.31/03/2023 अन्वये सदर बांधकाम करणेच्या कामास मान्यता दिलेली आहे. तसेच मनपा हददीतील 15 बसस्टॉप खालीलप्रमाणे आहेत.

अनु.क्रं.	बसस्टॉप ठिकाण	अनु.क्रं.	बसस्टॉप ठिकाण
1	नवीन रेणापून नाका (अहिल्यादेवी पुतळयाजवळ डावी बाजू)	9	नंदी स्टॉप पुरणमल लाहोटी पॉलिटेक्निक समोर
2	छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोलीस स्टेशन जवळ	10	संविधान चौक (शौचालयाजवळ) (विदययो)
3	विवेकानंद चौक डावी बाजुस	11	जुने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डावी बाजु
4	सम्राट चौक (विदययो)	12	जुने जिल्हाधिध्कारी कार्यालयासमोर उजवी बाजु
5	गुळ मार्केट चौक शौचालयाजवळ	13	महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड, डावी बाजु
6	राजीव गांधी चौक (डावी बाजु)	14	महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड, उजवी बाजु
7	राजीव गांधी चौक (उजवी बाजु)	15	गंजगोलाई
8	नंदी स्टॉप वसतीगृहासमोर		

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार लातूर शहर गतदार संघात 15 बसस्टॉप खालीलप्रमाणे आहेत.

अनु.क्रं.	बसस्टॉप ठिकाण	अनु.क्रं.	बसस्टॉप ठिकाण
1	नवीन रेणापून नाका (अहिल्यादेवी पुतळ्याजवळ डावी बाजू)	9	नंदी स्टॉप पुरणमल लाहोटी पॉलिटेक्निक समोर
2	छत्रपती शिवाजी महाराज चौक शेजे पोलीस स्टेशन जवळ	10	संविधान चौक (शौचालयाजवळ) (विदययो)
3	विवेकानंद चौक डावी बाजुस	11	जुने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डावी बाजु
4	सम्राट चौक (विदययो)	12	जुने जिल्हाधिध्कारी कार्यालयासमोर उजवी बाजु
5	गुळ मार्केट चौक शौचालयाजवळ	13	महिला तंजनिकेतन, बार्शी रोड, डावी बाजु
6	राजीव गांधी चौक (डावी बाजु)	14	महिला तंजनिकेतन, बार्शी रोड, उजवी बाजु
7	राजीव गांधी चौक (उजवी बाजु)	15	गंजगोलाई
8	नंदी स्टॉप वसतीगृहासमोर		

वरील प्रमाणे 15 महानगरपालिका हददीमध्ये बसस्टॉपवर 18 चौ.मी. जागेवर बांधकाम केल्यानंतर लातूर शहरातील नागरीकांना सोईचे होणार असल्यामुळे महानगरपालिकेतील आवश्यक विभागातील नाहरकत देणे व सदर ठिकाणी बसस्टॉप बांधकाम करणे या कामास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं.225 दिनांक - 19/09/2024

<u>प्रस्ताव</u>-

लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये जाहिरात बॅनर्स/होर्डींग्ज बसविण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देणेस निर्णय घेणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये विविध ठिकाणी ईमारतीवर, जमीनीवर जाहिरात बॅनर्स/होर्डींग्ज लावणेसाठी विविध जाहिरात एजन्सींनी प्रस्ताव दाखल केलेले आहेत. सदर प्रस्तावावर जाहिरात बॅनर्स/होर्डींग्ज बाबत शासन निर्णय व ईतर अनुषंगिक बाबींचा अभ्यास करुन प्रस्तावाची छाननी करुन स्वंयस्पष्ट शिफारसीचा अहवाल सादर करणेकरीता समिती गठित करणेसाठी मा. आयुक्त महोदय यांनी दि. 02/07/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे दि. 05/07/2024 रोजीच्या आदेशाप्रमाणे खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आलेली आहे.

1. डॉ. पंजाब खानसोळे, उपायुक्त - अध्यक्ष
2. श्री. रवि कांबळे, मालमत्ता व्यवस्थापक - सदस्य
3. श्री. अशोक येवरीकर, अभियंता (मानधन) - सदस्य
4. वाहतूक पोलीस निरिक्षक, वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर - सदस्य
5. प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर - सदस्य

उपरोक्त समितीची दि. 23/08/2024 रोजी सदर प्रस्तावाची छाननी करणेसाठी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सदर प्रस्तावाची छाननी करुन कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली व दि. 27/08/2024 रोजी सदर जाहिरात बॅनर्स/होर्डींग्जचे ठिकाणाची पाहणी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे उपरोक्त समिने संयुक्तरित्या एकूण 86 होर्डिंग्ज ठिकाणाची पाहणी केलेली आहे. व सदर ठिकाणी जाहिरात बॅनर्स/होर्डिंग्जला परवानगी देणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. सदर पाहणीचा अहवाल सादर केलेला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे मा. प्रशासकीय ठराव क्रं. 80 दि. 22/02/2023 नुसार निश्चित करण्यात आलेल्या परवाना शुल्क भरुन घेऊन परवानगी देणेसाठी शिफारस मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे सदर प्रकरणा बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेस्तव सविनय सादर.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार जाहिरात एजन्सींनी दाखल केलेले 86 प्रस्तावास समितीच्या अहवालाप्रमाणे जाहिरात करण्यास मा. प्रशासकीय ठराव क्रं. 80 दि. 22/02/2023 नुसार निश्चित करण्यात आलेल्या परवाना शुल्का प्रमाणे परवाना शुल्क भरुन घेऊन मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांकः- 220 दि.20/09/2024

प्रस्तावः-

विषयः- वीजतंत्री (इलेक्ट्रीशियन) (श्रेणी-3 तांत्रिक सेवा) हे नवीन पदे मंजूर करणेबाबत

मा.उप सचिव,महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक लामपा- 2012/261/ प्र.क्र.40/ नवि-24,दि.28/5/2013 अन्वये सहपत्र क्र. 1 ते 22 मध्ये नमुद करण्यातं आल्यानुसार एकूण 1246 पदांचा आकृतीबंध नवनिर्मित लातूर शहर महानगरपालिके करीता शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे.

2) निविदेतील अट क्र 13 मधील अ.क्र.07 पान क्रं 35 नुसार लातूर शहर महानगरपालिकेकडे सादर केलेल्या वेळेपत्रकानुसार घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे कामामध्ये कचरा उचलण्यास कंत्राटदार अपयशी ठरल्यास प्रतिकुटूंब प्रतिदिन दंड रू.500/- असे मुळ करारनाम्यामध्ये नमूद आहे सदरील तरतूद हि रू.5/- ऐवजी नजरचुकीने रू.500/- झाली असल्याची कंत्राटदाराचे म्हणणे आहे तसेच घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे कामामध्ये एकूण घराच्या 15% घरास दंड आकारण्यात येऊ नये 85% पेक्षा कमी घरांना भेटी दिल्यास रू.500/- ऐवजी रू.५/- प्रमाणे दंड आकारणी करीता मान्यता देण्यात येत आहे

Scanned with OKEN Scanner

१/ जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत ५ लाख रु. पर्यंतची कामे ही अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,०००/- च्या खालील असतील अशी कामे ग्रामपंचायत मार्फत करण्यात यावीत. ५ लाख रु. वरील कामे ही जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावीत.

२/ जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत ५ लाख रु. पर्यंतची कामे ही अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,०००/- च्या खालील असतील अशी कामे ग्रामपंचायत मार्फत करण्यात यावीत. ५ लाख रु. वरील कामे ही जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावीत.

३/ जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत ५ लाख रु. पर्यंतची कामे ही अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,०००/- च्या खालील असतील अशी कामे ग्रामपंचायत मार्फत करण्यात यावीत. ५ लाख रु. वरील कामे ही जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावीत.

सचिव

जालना नगर सेवा प्राधिकरण, जालना

अध्यक्ष

जालना नगर सेवा प्राधिकरण, जालना

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर

आरोग्य विभागाअंतर्गत (पशुवैद्यकीय विभाग)

प्रशासकीय ठराव

दि. 17/04/2025

ठराव क्र :- 307

विषयः- उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन मुलुंड मुंबई यांना भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरण प्रकल्पाच्या करारनाम्याची मुदत १ वर्ष वाढविणे बाबत.

संदर्भ :- १) उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन मुलुंड मुंबई ४०००८२ व मा.आयुक्त लातूर मनपा लातूर करार दि. ११/०३/२०२२ व कार्यादेश दि.१४/०३/२०२२

२) उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन यांचे पत्र दि.२२/०१/२०२५ (करार संपत असले बाबत.)

३) उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन यांचे पत्र भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरण प्रकल्पाच्या करारनाम्याची मुदत वाढविणे बाबत.(देय दरात १०%) वाढवुन देणे बाबत.

४) भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड भारत सरकार यांचे पत्र F.NO.24-02/2020-21/ABC दि.०५/०४/२०२२ (शिफारस केलेले दर)

प्रशासकीय मंजुरीचे आदेश

ज्याअर्थी संदर्भ क्र. १,२,३ च्या प्रस्तावानुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र १ अन्वये उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन मुलुंड मुबई व मा.आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्यात झालेला करारनामा मुदत दि.३१/०३/२०२५ पर्यंत आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.२ व ३ नुसार उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन सचिव यांचे भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरण कार्यक्रमाची मुदत वाढविण्याबाबत तसेच १०% वाढीव दर देणे बाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. संदर्भ क्र. १ (करारनामा दि.११/०३/२०२२) नुसार सर्व अटी व शर्थी कायम राहतील.

अनु क्र.	कामाचे स्वरूप	रक्कम
1)	भटक्या श्वानाचे निर्बीजीकरण व लसीकरण कार्यक्रम तसेच अपघात ग्रस्त व पिसाळलेल्या श्वानांचे उपचार व बंदोबस्त करणे (मागील करारनाम्याच्या अटी व शर्तीस अधिन राहुन)	मागील करारातील दर ९९९/- १०% वाढीव दर एकुण १०९८/- प्रति श्वान दर 1098/- (प्रती श्वान)

निर्णयः- उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुलुंड या संस्थेला भटके श्वान निर्बीजीकरण व लसीकरण कार्यक्रम मागील करारातील (११/०३/२०२२) अटी व शर्तीनुसार नविन दराप्रमाणे रुपये 1098/- काम करण्यास यापुढील एक वर्षासाठी मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रतिलिपी :-

~~1)मुख्य लेखाधिकारी, लातूर शहर महानगरपालिका लातूर यांना अनुपालनार्थ देण्यात येते.~~

~~2) मुख्य लेखापरिक्षक, लातूर शहर महानगरपालिका लातूर यांना अनुपालनार्थ देण्यात येते.~~

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 302 दि.16/04/2024

विषय :- स्वच्छ भारत मिशन (नागरी) क्षमता बांधणी (Capacity Building) निधीतुन प्रशिक्षणास लागणारे साहित्य घेणे.

प्रस्ताव :-

लातूर शहर महानगरपालिका, स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत Capacity Building बाबीसाठी अंतर्गत रु.६२,४९,६६७/- (अक्षरी बासष्ठ लक्ष एकोणपन्नास हजार सहाशे सदूसष्ठ रुपये) ची तरतूद आहे. तरी क्षमता बांधणी अंतर्गत निधीतुन प्रशिक्षणास लागणारे साहित्य घेणे करीता मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेनुसार दि.28.03.2025 ते दि.04.04.2025 पर्यंत www.mahatenders.gov.in येथे मा.अति आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने ई-निविदा क्र. 2025_LMC_1166035_1 प्रकाशीत करण्यात आली होते. तरी विहीत वेळेत एकुण 03 निविदाधारक प्राप्त झाले असून प्राप्त निविदाधारकांचा लिफाफा क्र.१ (तांत्रिक) उघडण्यात आले असून पात्र निविदा धारकांचे लिफाफा क्र.२ (आर्थीक) दि.16.04.2024 रोजी आयुक्त महादेय यांच्या मान्यतेने उघडण्यात आला असून दर खालील प्रमाणे

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	दर
१	RAJVEER ENTERPRISES	371820/-
२	Sunshine Solutions And Consultancy	375120/-
३	Artophics	408400/-

वरील प्रमाणे सर्वात कमी दर RAJVEER ENTERPRISES यांचे दर रु. 3,71,820/- अक्षरी तीन लक्ष ऐकाहत्तर हजार आठशे वीस रुपये रुपये सर्वात कमी असून RAJVEER ENTERPRISES यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – स्वच्छ भारत मिशन (नागरी) क्षमता बांधणी (Capacity Building) अंतर्गत लातूर महानगरपालिकेच्या कर्मचारी-यास प्रशिक्षणास लागणारे साहित्य घेणे करीता RAJVEER ENTERPRISES यांचे दर रु. 371820/- यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

नगर सचिव

लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय ठराव क्रं. 309.. दिनांक -22/04/2025

विषय-

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाना किरकोळ दुरुस्ती व सौर ऊर्जा बसविणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिकेतील गाळयामध्ये गाळे धारकांना किरकोळ दुरुस्ती व व्यापारी संकुलातील छतावर सौर ऊर्जा बसविणेसाठी मागणी होत आहे. तसेच महाराष्ट्र शासनातर्फे सौर ऊर्जा बसविणेसाठी नागरीकांना प्रोत्साहन करणेसाठी विविध योजना राबवित आहेत. त्याअनुषंगाने लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांना सौर ऊर्जा बसविणेसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करुन परवानगी देणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

अनु.क्रं.	सौर ऊर्जा प्लांट साईज	परवाना फिस	परवाना नुतनीकरण फीस प्रति चौ.फुट 1.5 रु प्रति महा जागा भाडे	एकुण
1	500 चौ.फुट	10,000	9,000	19,000
2	1000 चौ.फुट	10,000	18,000	28,000
3	1500 चौ.फुट	10,000	27,000	37,000
4	2000 चौ.फुट	10,000	36,000	46,000

तसेच लातूर शहर महानगरपालिकेतील गाळयामध्ये किरकोळ दुरुस्ती (फरशी, गिलावा, फर्निचर इ. कामे) करण्यासाठी प्रतिगाळा रु 10,000/- फीस भरुन घ्यावे व त्यासाठी संबंधिताकडून शपथपत्र घेवून गाळा / दुकान जागा खाली करुन देताना पुर्ववत गाळा करुन देणेच्या अटीवर परवानगी देण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त प्रमाणे सौर ऊर्जा बसविणेसाठी व किरकोळ दुरुस्ती करणेसाठी फीस आकारणी केल्यानंतर लातूर शहर महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल व सौर ऊर्जा बसविणेसाठी गाळे धारकांना सुविधा उपलब्ध होईल.

उपरोक्त परवानगी देतेवेळी मनपा अभियंता यांची नाहरकत घेवूनच परवानगी देणे योग्य राहील.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलातील गाळे धारकांना सौर ऊर्जा बसविण्यासाठी व किरकोळ दुरुस्ती करण्यासाठी फीस आकारणी करुन परवानगी देणेसाठी मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

प्रशासक
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर
प्रशासकीय ठराव

ठराव क्रं. 310

दिंनाक 28/04/२०२5

विषयः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियम २१ (२) अन्वये महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मिळकती (इमारत व जमीनी) यांचे पुनः कर मुल्यांकन करणे कामी खाजगी एजन्सी नियुक्त करण्यासाठी ई-निवीदा मागविण्यासाठी विषय विचार विनिमय करून निर्णय घेण्यास्तव मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्याकडे सादर.

प्रस्तावनाः-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ता सर्वेक्षणाचे काम सन २०१७-१८ या अर्थिक वर्षामध्ये पूर्ण करून प्रत्यक्ष कर वसूलीस सुरवात करण्यात आली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियम २१(२)अन्वये महानगरपालिकेस दर पाच वर्षानी महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मिळकती (इमारत व जमीनी) यांचे पुनः कर मुल्यांकन करणे आवश्यक आहे. सदर कामाकरिता महापालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्ता जी.आय.एस. अधारित प्रत्यक्ष स्थळ सर्वेक्षण करुन युनीक प्रॉपर्टी आयडेंटीटी कोड (यु.पी.आय.सी) ची नोंदणी करुन मालमत्ता नोंदवही तयार करणे, मालमत्ता कर मुल्यांकना करिता तांत्रिक सर्वेक्षण व म.न.पा. निर्देशीत माहिती संकलीत करणे, संपुर्ण मालमत्तेचे अद्यावत स्थळ दर्शक संगणीकृत नकाशे काढणे, मालमत्तेचे सर्वेक्षण अहवालाचे कॉपीराईट नोंदणीकृत संगणक अज्ञावली संगणीकरण करणे, सर्व मालमत्तेचे संगणीकृत नकाशे व फोटो डाटाबेसला जोडणे, शहराचा जी.आय.एस. अधारित करमुल्यांकन झोन दर्शक नकाशा तयार करणे तसेच म.न.पा. निर्देशीत दरानुसार मालमत्ताची करमुल्य निर्धारन प्रारुप यादी, मालमत्तेचे प्रकरणे, करमुल्यांकनाची अंतिम यादी तयार करणे व वरील प्रमाणे करनिर्धारणाचे कामाकरिता नोदंणीकृत संगणक आज्ञावली व सर्वमुल्यनिर्धारन डाटा ऑनलाईन करणे, ऑनलाईन मुल्यनिर्धारन सेवा तसेच ऑनलाईन मालमत्ता कर भरणा प्रणाली द्वारा सुधारीत दर व घसारा तक्ता अन्वये फेर कर मुल्यांकन करणे अभिप्रेत आहे.

सध्या स्थितीत महापालिका हद्दीत एकुण १०७६४५ मिळकती नोंदणीकृत आहेत. मात्र वाढते नागरीकरण,नवीन बांधकामे, जुन्या बांधकामात सुधारणा करुन झालेल्या सुधारीत व वाढीव बांधकामे बघता संपुर्ण प्रभागामध्ये प्रत्यक्ष स्थळावर जाऊन संपुर्ण मिळकतीचे नोंदणी अभियान घेऊन शंभर टक्के मिळकतीची कर आकारणी मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर अद्यापर्यंत कर न लागलेल्या मिळकती उघडकीस येतील व त्यांच्यावर कर आकारणी करुन म.न.पा. चे महसूली उत्पन्न मोठ्या प्रमाणवर वाढवीणे शक्य होईल. त्यापुढे संपुर्ण मिळकतीचे प्रत्यक्ष स्थळ मोजणी, सर्वेक्षण तांत्रीक कर मुल्यांकनाकरिता आवश्यक माहिती संकलन करुन अद्यावत स्थळ दर्शक नकाशा तयार करणे,कामात पारदर्शकता, अचुकता आणण्याकरिता प्रत्येक मिळकतीचे अद्यावत डिजीटल फोटोग्राफ काढणे, संपुर्ण कामाचे व सर्वेक्षणाची माहिती त्वरीत उपलब्ध होण्याकरिता संगणीकीकरण करणे व मिळकतीचे फोटो, माहिती संगणीकृत नकाशे डाटाबेसला जोडणी करुन मिळकतधारकांस उपलब्ध करुन दिल्यास क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार, बांधकामाचा उपयोग(वाणिज्य वापर,औद्योगीक वापर,मिश्र वापर,रहिवाशी वापर) इत्यादी बाबीमध्ये सुसुत्रता व पारदर्शकता येऊन वाढीव मिळकत करावाबत मिळकतधारकांना संपुर्ण माहिती महानगरपालिकेच्या वतीने देता येईल.

उपरोक्त कामास जी.आय.एस. प्रणालीचा वापर करुन शहराचा झोन निहाय करमुल्यांकन झोन नकाशा तयार करुन शहरातील विभीन्न भागातील प्रमुख बाजारपेठा, वाणीज्य वस्ती, उच्च निवासी वस्ती, मध्यम निवासी वस्ती व झोपडपट्टी भाग याची नोंद घेऊन नकाशावर दाखविण्यात येऊ शकेल व त्यामुळे करआकारणीस दर तक्ता समान भाग (झोन) समान दर पध्दती किंवा भांडवली मुंल्य ख-या अर्थाने लागू करता येईल व त्यामुळे करआकरणी मध्ये समानता आणता येईल.

महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ताचे सर्वेक्षण अहवाल अन्वये मालमत्तेचा झोन, बांधकामाचा प्रकार, बांधकामाचा वापर, बांधकामाचे करपात्र क्षेत्रफळ यावर अधारित बांधकामाच्या वयानुसार घसारा तक्ता अन्वये गुणांकन करुन <u>अपेक्षित वार्षीक भाडेमुंल्य दर तक्तानुसार किंवा भांडवली मुंल्यावर</u> प्रत्यक्ष क्षेत्रफळावर अधारित कर आकारणी प्रस्तावीत करण्याकरिता सदरची माहिती अंत्यत आवश्यक आहे व महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्ता (जुन्या व नविन) करिता एक समान निकप, लावुन करआकारणी समानता, सुसुत्रता व पारदर्शकता आणण्याकरिता संपुर्ण मालमत्तांना प्रत्यक्ष क्षेत्रफळावर अधारित कर आकारणी करता येऊ शकेल.

मालमत्ताची करआकारणी प्रत्यक्ष <u>वार्षीक भाडेमुंल्यावर किंवा भांडवली मुंल्यावर</u> आकारणी प्रस्तावीत करता येईल त्यामुळे म.न.पा.च्या आर्थिक उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होईल.

Scanned with OKEN Scanner

महापालिकेच्या कर आकारणी बाबतच्या संपुर्ण कार्यवाहीसह, अत्याधुनिक पध्दती व तांत्रिक कौशल्य तसेच महाराष्ट्र राज्य व देशातील इतर करआकरणी झालेल्या महानगरपालिकांनी यशस्वीरित्या राबविलेल्या पध्दतीने व या क्षेत्रात मोठया प्रमाणात समान कामाचा अनुभव असणा-या अनुभवी संस्था / कंपनी / कंपनी द्वारे करणे योग्य होईल.

उपरोक्त काम हे तांत्रिक दृष्टया अंत्यत वैशिष्टपुर्ण व विशिष्ट कौशल्य असणारे असुन त्यामध्ये मोठया प्रमाणात व कुशल कर्मचारी तसेच संगणीकीकरण व स्टेशनरीचा अंतर्भाव असुन तसेच सदरचे काम वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने या क्षेत्रात अनुभवी, कार्यक्षम व नोंदणीकृत कंपणी, एजन्सीकडून निविदा प्रक्रियेव्दारे कंत्राटपध्दतीने देणे गरजेचे व महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्न वाढीच्या दृष्टीने हिताचे आहे. करीता सदर कामासाठी ई-निवीदा प्रक्रिया करण्यास सदर विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची कर आकारणी आकारणी सन-२०१७-१८ मध्ये करण्यात आली होती. महानगरपालिकेच्या उत्त्पन्नाचा मुख्य स्त्रोत म्हणून मालमत्ताकराकडे पहिले जाते.महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कर लावण्याचा महानगरपालिकेला अधिकार आहे.मिळकतीचे सर्वेक्षण केल्यामुळे कर आकारणी न झालेल्या मिळकतीचा शोध घेता येईल.महानगरपालिकेला जमीन व इमारतीवर कर लावण्याचा अधिकार शासनाने दिला आहे. या करापोटी जमा झालेली रक्कम शहराच्या विकासत्मक कामासाठी वापरली जाते. महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या अनुषंगाने भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित मालमत्ताकर प्रणालीची अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतीची कर आकारणी भाडेमुंल्य दरावर किंवा भांडवली मूंल्य आधारित करणे आवश्यक आहे. महापालिकेच्या कर आकारणी बाबतच्या संपुर्ण कार्यवाहीसह, अत्याधुनिक पध्दती व तांत्रिक कौशल्य तसेच महाराष्ट्र राज्य व देशातील इतर करआकरणी झालेल्या महानगरपालिकांनी यशस्वीरित्या राबविलेल्या पध्दतीने व या क्षेत्रात मोठया प्रमाणात समान कामाचा अनुभव असणा-या अनुभवी संस्था / कंपनी / कंपनी द्वारे ई-निवीदा मागविण्यास मान्यता देण्यात येते.व या कामी होणार खर्च हा म.न.पा. निधि किंवा इतरत्र शासकीय योजना निधि अंतर्गत करण्यास तसेच ई-निवीदा मागणविण्यासाठी होणा-या खर्चास अर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.311 ठराव क्रं.311 दिनाक 28/04/2025

विषय:-मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

"लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील २०२५-२६ या आर्थीक वर्षामध्ये विविध घटकातील मालमत्ताधारकांस चालू वर्षांच्या मालमत्ता करामध्ये सुट देणे बाबतचा विषय विचारविनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर."

प्रस्तावना:-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराच्या उत्तपनाचे एकमेव स्रोत मालमत्ताकर असून सन २०२५-२६ या अर्थिक वर्षामध्ये थकीत मालमत्ता व उपकराची मागणी मोठया प्रमाणत वसूल होणे बाकी असल्याने, सदर थकीत रक्कम वसूल करण्यासाठी तसेच महानगरपालिकेच्या उत्तपन वाढीच्या दृष्टीकोणातून महानगरपालिका हद्दीतील विविध घटकाना थकीत व चालू कराचा एक रक्कमी भरणा करणा-या मालमत्ताधारकाम सामान्य करामध्ये खालील प्रमाणे लाभ देवुन कर वसूली करणे महानगरपालिकेच्या अर्थिक हिताचे होईल.या बाबत इतर महानगरपालिकाना विचारणा केली असता सदर महानगरपालिकेने मालमत्ताकर व मनपाच्या उपकरावर वेगवेळी सूट देण्यात आल्याची प्रत सादर केली आहे.या बाबतच्या अधिनियमातील तरतूदी खालील प्रमाणे सादर.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील (कलम १४० अ व १४० ब अन्वये) मुदतीमध्ये मालमत्ताकराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांस चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकरामध्ये माहे एप्रिल व मे २०२५ आखेर ७ %, जुन २०२५ आखेर ६%,व जुलै २०२५ आखेर ५% ,सुट देणे योग्य होईल तसेच जे मालमत्ताधारक ऑन लाईन कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस मे,जुन,जुलै, २०२५ आखेर चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकरामध्ये ५% सूट तसेच ऑगष्ट २०२५ ते सप्टेंबर २०२५ पर्यत २% सूट देणे योग्य होईल. तसेच महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहानाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इतर इलेक्ट्रीक्स वाहनधारकांना चार्जिंग सुविधदा उपलब्ध केल्याम शासन निर्णयानुसार सूट देणे योग्य होईल.

तसेच मनपा हद्दीतील महिलाच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेस मालमत्ता करामध्ये ५% व दिव्यांग व्यक्तीच्या नांवे असलेल्या एका निवासी मालमत्तेस मालमत्ताकरामध्ये ५%,स्वतंत्र सैनिक व त्याच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस मालमत्ता करामध्ये ५०%, व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प राबवणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर सामन्य करामध्ये प्रति वर्ष ५% सूट देणे योग्य होईल तसेच सदरचा लाभ इमारतीमध्ये व इमारतीच्या परिसरामध्ये दोन्ही प्रकल्प जरी राबवण्यात आले असतील तरीही एकच बाबीचा लाभ मालमत्ताधारकांस देणे योग्य होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराच्या उत्तपनाचे एकमेव स्रोत मालमत्ताकर असून सन २०२५-२६ या अर्थिक वर्षामध्ये थकीत मालमत्ता व उपकराची मागणी मोठया प्रमाणत वसूल होणे बाकी असल्याने, सदर थकीत रक्कम वसूल करण्यामाठी तसेच महानगरपालिकेच्या उत्तपन वाढीच्या दृष्टीकोणातून महानगरपालिका हद्दीतील विविध घटकाना थकीत व चालू कराचा एक रक्कमी भरणा करणा-या मालमत्ताधारकाम सामान्य करामध्ये खालील प्रमाणे लाभ देवुन कर वसूली करणे महानगरपालिकेच्या अर्थिक हिताचे होईल.

१. २०२५-२६ या आर्थीक वर्षातील थकबाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्याम एप्रिल व मे २०२५ आखेर पर्यंत चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ता करामध्ये (सामान्य करामध्ये) ७% सुट देण्यात येत.

२. २०२५-२६ या आर्थीक वर्षातील थकवाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास जुन २०२५ पर्यंत चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ता करामध्ये (सामान्य करामध्ये)६ % सुट देण्यात येत.

३. २०२५-२६ या आर्थीक वर्षातील थकवाकीसह कराचा भरणा एक रक्कमी केल्यास जुलै २०२५ पर्यंत चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ता करामध्ये (सामान्य करामध्ये) ५% सुट देण्यात येत.

४. महिलाच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेस चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामान्य करामध्ये) ५% सूट देण्यात येते.

५. दिव्यांग व्यक्तीसच्या नांवे असलेल्या एका निवासी मालमत्तेस चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामान्यकरामध्ये) ५% सूट देण्यात येते (शासन नियमानुसार व जिल्हा शैल्यचिकीत्सक यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र लाभधारकास सादर करणे आवश्यक असेल.)

६. स्वतंत्र सैंनिक व त्यांच्या पत्नीच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेस चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामान्य करामध्ये) ५०% सूट देण्यात येते

७. सन २०२५-२६ या अर्थिक वर्षामध्ये आपल्या इमारती व इमारतीच्या परिसरामध्ये रेनवॉटर हार्वस्टींग प्रकल्प तसेच सौर उर्जा प्रकल्प रावबणा-या मालमत्ताधारकांस सलग तीन वर्ष प्रकल्प कार्यन्वीत असल्यानंतर चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामन्य करामध्ये) प्रति वर्ष दोन्ही बाबीसाठी ५% सूट देण्यात येते.

८. जे मालमत्ताधारक ऑन लाईन कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामन्य करामध्ये) एप्रिल,मे,जुन,जुलै, २०२५ आखेर ५% सूट देण्यात येते.तसेच ऑगष्ट २०२५ ते संप्टेंबर २०२५ पर्यत २% सूट देण्यात येते

९. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ अन्वये स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहानाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इतर इलेक्ट्रीक्ल वाहनधारकांना चार्जिंग सुविध्दा उपलब्ध केल्यास शासन निर्णयानुसार देय चालू अर्थिक वर्षाच्या मालमत्ताकर (सामन्य करामध्ये) २% सूट देण्यात येते.

जे मालमत्ताधारक उक्त देण्यात आलेल्या मुदतीमध्ये थकीत व चालू मालमत्ताकराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ मधील प्रकरण आठ कलम ४१ अन्वये प्रति महा २% शास्तीची आकारणी करुन वसुली करण्यात यावी.तसेच मालमत्ता सील,आटकावणी करण्याचे अधिकार क्षेत्रीय अधिकारी ए,बी,सी,डी,यांना प्रधान करण्यात येत आहे, तसेच वरील योजनांपैकी (महिलांकरीता / दिव्यांग / इलेक्ट्रीक / स्वातंत्र सैनिक / माजी सैनिक / रेनवाटर / सोलार) पैकी केवळ एकच योजना लागू राहिल. त्यासोबत मालमत्ता करावरील सुट व ऑनलाईन सुट नियमानुसार लागू राहील.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

स्थायी समिती सभा दिनांक 13.10.2015

विषय क्रं. 34- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 11 व 8 कराधान नियम अन्वये लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण मिळकतीचे स्थळ सर्व्हेक्षण, फेर करमुल्यनिर्धारण करण्याच्या कामासाठी आलेल्या निविदेवर व सदर कामासाठी दिलेल्या दरावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

प्रस्तावः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 11 चे कलम 127 व 129 कराधान नियम अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम 15 (2) अन्वये लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण मिळकतीचे स्थळ सर्व्हेक्षण, अपेक्षित वार्षिक भाडेमुल्य अथवा भांडवली मुल्यनिर्धारण पध्दतीने फेर करमुल्यनिर्धारण पध्दतीने फेर करमुल्य निर्धारण करणे आवश्यक आहे.

सदरील कामासाठी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रसिध्दी देवून तीन वेळेस ई निविदा मागवण्यात आल्या होत्या व प्रत्येक वेळेस मागवण्यात आलेल्या निविदापैकी फक्त एकच निविदा पात्र झाली असल्याने चौथ्या वेळेस निविदा मागवण्यात आली असून या कामी फक्त एकच निविदा प्राप्त झाली आहे.

उपरोक्त काम हे तांत्रिक दृष्टया अत्यंत वैशिष्टयपूर्ण व विशेष कौशल्य असणारे असून त्यामध्ये मोठया प्रमाणात कुशल कर्मचारी तसेच संगणकीकरण व स्टेशनरीचा अंतर्भाव असून सदरचे काम महानगरपालिका कर्मचारीद्वारे पूर्ण करणे शक्य वाटत नाही. करीता या क्षेत्रात अनुभवी, कार्यक्षम व नोंदणीकृत कंपनी, एजन्सीकडून निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटपध्दतीने देणे गरजेचे व महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने हिताचे आहे. महानगरपालिकेच्या कर आकारणीबाबतच्या संपूर्ण कार्यवाहीसह, अत्याधुनिक पध्दती व तांत्रिक कौशल्य तसेच महाराष्ट्र राज्य तसेच देशातील इतर कर आकारणी झालेल्या महानगरपालिकेनी यशस्वतीरित्या राविलेल्या पध्दतीने व या क्षेत्रात मोठया प्रमाणावर समान कामाचा अनुभव असणा-या अनुभवी संस्था / कंपनीद्वारा करण्याकरीता ई-निविदा पध्दतीने निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. त्याकरीता नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन महाराष्ट्र राज्यात अनेक न.प. व मनपामध्ये उपरोक्त यशस्वीप्रमाणे काम व संगणकीकरणाचे कामे पूर्ण केलेल्या एजन्सी स्थापत्य कंसलटन्स प्रा.लि. यांची लघुत्तम व पात्र निविदा प्राप्त झाली असून सदर एजन्सीसोबत वाटाघाटी करणे देखील पूर्ण झाले आहे.

सदर कामामध्ये लातूर महानगरपालिका हददीतील संपूर्ण मालमत्तांना जी.आय.एस. आधारीत प्रत्यक्ष स्थळावर नोंदणी अभियानाद्वारे युनिक प्रॉपर्टी आयडेंटीटी कोड (UPIC) ची नोंदवही तयार करणे, मालमत्ता करमुल्यांकनाकरीता तांत्रिक सर्व्हेक्षण व महानगरपालिका निर्देशित माहिती संकलित करणे, संपूर्ण मालमत्तांचे अदयावत संगणकीकृत स्थळ नकाशे काढणे, तसेच मालमत्तांची तांत्रीक माहितीचे विवरण तक्ता तयार करणे, वार्डनिहाय मालमत्तांचे डिजीटल फोटो काढणे, मालमत्ताचे सर्वेक्षण अहवालाचे कॉपीराईट नोंदणीकृत संगणक अज्ञावलीत संगणकीकरण करणे, सर्व मालमत्तांचे संगणकीकृत नकाशे व फोटो डाटाबेसला जोडणे, शहराचा GIS आधारीत करमुल्यांकन झोनदर्शक नकाशा तयार करणे तसेच महानगरपालिका निर्देशित दरानुसार मालमत्तांची करमुल्य निर्धारण प्रारुप यादी, मालमत्तांचे प्रकरणे, सुचना नोटीस, करमुल्यांकनाची अंतिम यादी तयार करणे व वरील प्रमाणे करनिर्धारणाचे कामाकरीता नोंदणीकृत संगणक आज्ञावली पुरविणे व मालमत्ता कराची ऑनलाईन भरणा करणेकरिता आज्ञावली तसेच वसुली करीता मोबाईल ॲप्लीकेशन प्रणाली पुरविणे अंतर्भूत आहे.

सर्वेक्षण अहवाल अन्वये मालमत्तेचा झोन, बांधकामाचा प्रकार, बांधकामाचा वापर, बांधकामाचे करपात्र क्षेत्रफळ यावर आधारीत व बांधकामाचे वयानुसार घसारा तक्ता अन्वये गुणांकन करुन अपेक्षित वार्षीक भाडेमुल्य दरतक्तानुसार प्रत्यक्ष क्षेत्रफळावर आधारीत कर आकारणी प्रस्तावीत करणेकरीता सदरची माहिती अत्यंत आवश्यक आहे व महानगरपालिकेच्या हद्दीतील संपूर्ण मालमत्ता (जुन्या व नविन) करीता

Scanned with OKEN Scanner

मनपा स्थायी समिती ठराव क्रं.३४ दिनांक १३/१०/२०१५ अन्वये गांनी मालमत्ता सर्वेक्षणाच्या कामासाठी एजन्सी नियुक्त करण्यासाठी दिलेल्या मान्यतेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याबाबत मा.महालेखाकार (लेखा परिक्षा) महाराष्ट्र,नागपूर यांनी आक्षेप क्रं.२ नोंदवल्याप्रमाणे अभिनव प्रशासकीय कार्यालोर मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

मुख्य कार्यालय मेन रोड लातूर

(शिक्षण विभाग)

ठराव क्र.313 दिनांक 29/04/2025

विषय क्र.

विषय :-लातूर शहर महानगरपालिकेअंतर्गत महानगरपालिका शाळांना CSR मिळणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत एकूण १६ शाळा सुरु असून एकूण १५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून सर्व शाळांतील विद्यार्थी गरिब परिस्थितीतील आहेत. सदरील लातूर शहर महानगरपालिकेच्या शाळेची पटसंख्या १५०० असून इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात.

सदरील महानगरपालिका शाळेतील १५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी खाजगी कंपन्या, सरकारी बँका, फाऊंडेशन यांच्या CSR फंड मधून शालेय साहित्य मागणी करणेकरिता प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रशासकिय मान्यतेस्तव सादर.

निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत एकूण १६ शाळा सुरु असून एकूण १५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून सर्व शाळांतील विद्यार्थी गरिब परिस्थितीतील असून सदरील लातूर शहर महानगरपालिकेच्या शाळेची पटसंख्या १५०० असून इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थींसाठी CSR फंडातून साहित्य मागविण्यासाठीचा प्रस्ताव खाजगी कंपन्या, सरकारी बँका, फाऊंडेशन यांना पाठविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - ३१५ दिनांक. 02/05/ 2025

विषय – लातूर शहर महानगरपालिकेच्या दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर उर्जा पॅनल व सौर पानबुडी पंप संलग्न साहित्यासह बसवुन पाणीपुरवठा करणे

प्रस्ताव –

लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीचे शहरामध्ये एकुण 1064 विंधन विहीरी आहेत. सदर विंधन विहीरीवर विदयुत पंप बसावुन मिनी वॉटर योजनेद्वारे नागरीकांना पाणीपुरवठा केला जातो. एकुण विंधन विहीरीपैकी दलित वस्ती भागात 300 विंधन विहीरी असुन त्यापैकी 130 विंधन विहीरीवर सौरउर्जा पॅनल व सौर पानबुडी पंप बसविण्यासाठी जागा उपलब्ध आहे. सदयस्थितीत 130 विंधन विहीरीवरील सौर उर्जा पॅनल व सौर पानबुडी पंप संलग्न साहित्यासह बसविल्यास अंदाजित तीन लक्ष इतक्या रक्कमेचे विदयुत बिल प्रति महिना बचत होणार आहे. त्याकरीता सौरउर्जा पानबुडी पंप संलग्न साहित्यासह बसवुन पाणीपुरवठा चालू करणे आहे.

शहरातील दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर उर्जा पॅनल व सौर पानबुडी पंप संलग्न साहित्यासह बसवुन पाणीपुरवठा चालू करणेसाठी अंदाजित रक्कम 4,18,27,500/- रूपये इतका खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावित कामासाठी जिल्हा नियोजन समिती (DPDC) अंतर्गत निधी मागणी करणे योग्य राहिल.

निर्णय –

शहरातील दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर उर्जा पॅनल व सौर पानबुडी पंप संलग्न साहित्यासह बसवुन पाणीपुरवठा चालू करणे हे प्रस्तावित कामे जिल्हा नियोजन समिती (DPDC) अंतर्गत करणे करीता प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 374 दिनांक 01/04/२०२५

विषय :- जनहिताच्या / उपयोगी कामांच्या मागणी / विनंती पत्रावर योग्य ती कार्यवाही होणे बाबत.

प्रस्तावना – प्रशासनाकडे शहरातील नागरीकांनी विकास कामे करणेसाठी आलेल्या निवेदनानुसार व समक्ष भेटून केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने खालील कामे करणे गरजेचे असल्याने जिल्हा वार्षिक योजना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना अंतर्गत हाती घेणेसाठी सादर.

अ.क्र.	कामाचे नाव	अं. किंमत रु.
१	आर्वी गायरान येथे नाला व नाल्यावर पुल बांधणे.	१,३०,६१,७८०.००
२	आर्वी गायरान येथील स्मशानभूमी विकसीत करणे.	१९,३८,२०७.००

तसेच जिल्हा वार्षिक योजना नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत खालील कामे हाती घेणेसाठी सादर.

अ.क्र.	कामाचे नाव	अं. किंमत रु.
१	साई येथे म.न.पा. च्या जागेत डोम कैनल उभारणे.	१,००,००,०००.००
२	वरवंटी कचरा डेपो येथे मृत प्राण्यांसाठी Incenerator बसविणे.	५०,००,०००.००
३	जिल्हा परीषद कार्यालयाजवळील नाला बांधणे.	२२,२५,०००.००
४	पार्थ होटेल ते लांदगाव पेस रोड नाली बांधणे.	७७,७५,०००.००
५	रेल्वे स्टेशन ते रींगरोड रस्ता सुशोभिकरण करणे.	२,००,००,०००.००
६	ट्युशन एरीयामध्ये हायमास्ट व सी.सी.टी.व्ही. बसविणे.	२५,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना व नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२५-२६ साठी प्राप्त होणा-या निधीमधून हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

मुख्य कार्यालय मेन रोड लातूर

(शिक्षण विभाग)

ठराव क्र..316..

दिनांक 08/05/2015

विषय क्र.

विषय :- लातूर शहर महानगरपालिका शाळा क्र.९ येथील तीन कंत्राटी शिक्षक (माध्यमिक) यांना सेवेत कायम करणे बाबत.

मनपा शाळा क्र.०९ मंठाळे नगर लातूर येथे सन २०१५-१६ पासून इयत्ता ८ वी ते १० वी चे वर्ग सुरू करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शिक्षण उपसंचालक लातूर विभाग,लातूर यांनी महानगरपालिका शाळा क्र,०९ मंठाळे नगर लातूर येथे माध्यमिक , मराठी माध्यमिक शाळा स्वतःच्या आर्थिक उत्पन्नातून सुरू करण्यास मान्यता दिली आहे .

सदर माध्यमिक शाळेकरीता तीन कंत्राटी शिक्षण सेवक (मानधनावर) नेमणूक करण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले. मनपा निवड समिती मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित करून पात्र उमेदवारांच्या तोंडी व प्रात्यक्षित परीक्षा घेऊन तीन कंत्राटी माध्यमिक शिक्षण सेवक म्हणून ०३ उमेदवारांची १)मराठी / इंग्रजी विषयासाठी श्री. दिवे विलास माधवराव (एम.ए.बी.एड्.खुला प्रवर्ग) २) सामाजिक शास्त्र विषयासाठी श्रीमती. पठाण जबीन अब्दुलरहेमान (एम.ए.बी.एड्.खुला प्रवर्ग) 3) विज्ञान / गणित विषयासाठी श्रीमती.सांगवीकर संगिता बिभीषण (एम.एस्सी.बी.एड्. प्रवर्ग –अ.जा.) यांची ९ वी व १० वी च्या वर्गा करिता अध्यापनासाठी गठीत समितीव्दारे निवड करण्यात आली.

निवड समितीने निवडलेल्या उमेदवारास एकत्रीत मानधन रु.८,०००/- प्रतीमाह प्रमाणे तीन माध्यमिक शिक्षण सेवक यांना प्रथमता सहा माहिन्यासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले. परंतु नियुक्ती आदेशातील अट क्र.०९ नुसार केलेल्या मुल्यांकनानुसार श्रीम.सांगवीकर या अपात्र ठरल्या. १.श्री.दिवे विलास माधवराव २.श्रीमती.पठाण जबीन अब्दुलरहेमान या कंत्राटी शिक्षण सेवकांना आकरा महिन्याच्या कालावधीसाठी फेर मुदतवाढ देण्यात आली.

निवड समितीने निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारामधूनच श्रीम.जवळगेकर ज्योती बालाजी यांना कंत्राटी शिक्षण सेवक प्रतीमाह मानधन रु.८,०००/- प्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात आले.

लातूर शहर मनपा शाळा क्र.०९ येथील तीन कंत्राटी शिक्षकांना सेवा सातत्य देऊन १०० टक्के वेतन अनुदान महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल व त्यातील श्रीमती.ज्योती बालाजी जवळगेकर यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने त्यांच्या बाबत न्यायालयीन निकालाच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येते असा ठराव पारीत झाला आहे.

निर्णय:- लातूर शहर मनपा शाळा क्र.०९ येथील १) श्री.दिवे विलास माधवराव २) श्रीमती.पठाण जबीन अब्दुलरहेमान ३) श्रीमती.ज्योती बालाजी जवळगेकर या तीन कंत्राटी शिक्षकांना सेवा सातत्य देऊन १०० टक्के वेतन अनुदान महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल तसेच माध्यमिक वर्गासाठी कायमस्वरुपी सेवेत कायम करण्यासाठी अतिरिक्त पद निर्मिती करुन समायोजन करण्यास व संबंधितांच्या वेतन भत्ते यांचा भार उचलण्यास महानगरपालिकेची सहमती आहे. तरी संबंधित शिक्षकांना कायमस्वरुपी सेवेत कायम करण्यासाठी प्रस्तावास मान्यता देवून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येते.

नगर सचिव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 317 दि. 14/05/2025

विषय - नळ नसताना किंवा एकाच नावावर दोन नोंदी असलेल्या ग्राहकांचे देयका बाबत प्रशासकीय मान्यता देणे.

प्रस्ताव -

लातूर शहराचा पाणी पुरवठा हा साल-सन 2010-2014 पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असल्यामुळे त्यांनी साल-सन 2014 ला नळाच्या नोंदी आपल्याकडे हस्तांतरीत केले.

1. लातूर शहर पाणी पुरवठा अंतर्गत लातूर शहरातील ब-याच मालमत्ता धारकांचे नावावर दोन नळाचे नोंदी आहेत तसेच त्यांच्याकडे नळ कनेक्शन नसताना मालमत्ता धारकांचे नावाचे नोंदी घेण्यात आले आहेत.
2. तसेच ब-याच ठिकाणी पाईप लाईन नसताना त्या भागातील नळ कनेक्शनच्या नोंदी संगणकामध्ये घेण्यात आले आहेत. परंतू सद्यस्थितीत पाणी पट्टी देयके हे मालमत्ता करात समाविष्ठ करण्यांत आले असल्यामुळे ज्या मालमत्ता धारकांकडे नळ कनेक्शन नाही अशा मालमत्ता धारकांना सुध्दा पाणी कर आकारण्यात आलेले आहे.
3. तसेच ज्यांच्याकडे एकच नळ कनेक्शन असताना परंतू नळाची नोंद ही दोन किंवा अधिक असल्याने पाणी देयके जास्तीचे आकारण्यात येत आहे.
4. तसेच काही तक्रार अर्ज प्राप्त झाले असतानाही ते प्रलंबित असल्या कारणाने संबंधित जलकुंभाचे शाखा अभियंता यांनी तक्रार अर्जावर स्थळ पाहणी करुन नळ नसले बाबत तसेच एकच नळ कनेक्शन असल्याचे पंचनामे करुन कार्यालयात सादर केले आहेत.
5. ब-याच प्राप्त अर्जावरुन नळाचा घरगुती वापर असताना त्याच्या नोंदी मिश्र अशा झालेल्या आहेत.
6. तसेच पाणी पट्टी देयके हे घरपट्टी मध्ये एकत्रिकरण केल्यामुळे त्रुटींचे (अतिरीक्त वाढीव पाणी पट्टी देयके) प्राप्त झालेले अर्जांची व वेळोवेळी प्राप्त होणा-या तक्रारी अर्जांची छानणी करुन सुधारीत पाणीपट्टी देयके तयार करणे.

तरी सोबत जोडलेल्या तक्रार अर्जांवर उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

सध्या पाणीपट्टी कराचे देयके हे मालमत्ता करांमध्ये एकत्रित केल्यामुळे नागरिकांच्या थकबाकीबद्दल, नळ नसतांना नळ कनेक्शन दाखवले बाबत, घरगुती वापर असताना व्यावसायिक वापर दाखवले बाबत, इत्यादींच्या तक्रारी प्राप्त असुन पाणीपुरवठा विभागाने तक्रारींची शहानिशा करुन पाणीपट्टी करांची देयके सुधारीत करण्यात यावी. पाणीपट्टी करांमध्ये थकबाकी व इतर रक्कम कमी किंवा जास्त करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 318 दि. 15/05/2025

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजना मलशुध्दीकरण केंद्र व स्टेशनच्या बांधकामासाठी पाटबंधारे विभागाची जागा महानगरपालिकेस हस्तांतर करणे बाबत.

संदर्भ - 1. या कार्यालयाचे पत्र क्रं. 1163 दिनांक 27.02.2023
2. कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्रं. 1, लातूर यांचे पत्र क्रं. जा.क्रं./तांत्रिक शाखा क्रं. 1 / 715 दिनांक 14.03.2024
3. या कार्यालयाचे पत्र क्रं. 2020 दिनांक 15.03.2024
4. मा. अध्यक्ष, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी घेतलेली बैठकीतील विषय क्रं. 83/24
5. उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग क्रं. 4, लातूर यांचे पत्र क्रं. जा.क्रं./पाउविक्र. 4 ला/तांशा/181 सो दि. 20.02.2025
6. या कार्यालयाचे पत्र क्रं. 2759 दि. 27.03.2025
7. कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्रं. 1, लातूर यांचे पत्र जा.क्रं.लापविक्र 1 ला/ तांशा-1/987 दि. 08.04.2025

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजनेतील मलशुध्दीकरण केंद्र व पंपींग स्टेशनसाठी कातपूर तलावाच्या बुडीत क्षेत्रातील जागा मिळणेबाबत संदर्भ क्रं. 1 अन्वये कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्रं. 1, लातूर यांना कळविण्यात आले. संदर्भ क्रं. 2 अन्वये 1. विषयांकित कामाकरिता आवश्यक असणारी जमीन कायमस्वरुपी हस्तांतरित करण्याकरिताचा प्रस्ताव तयार करुन आगामी नियामक मंडळात ठेवण्यासाठी त्वरीत सादर करावा. 2. नियामक मंडळाच्या मान्यतेनंतरच प्रत्यक्षात जलसंपदा विभागाच्या मालकीच्या जागेवर बांधकाम करण्यात यावे. 3. लातूर महानगरपालिकेकडून नियामक मंडळाच्या मान्यतेनुसार आवश्यक जागेचे मुल्य भरण्याचे हमीपत्र देण्यात यावे. हे हमीपत्र नियामक मंडळाचे प्रस्तावात जोडुन सादर करावयाचे आहे. या अटीस अधिन राहुन ना-हरकत देण्याबाबत कळविण्यात आले. तद्नंतर संदर्भ क्रं. 3 अन्वये महानगरपालिकेने हमीपत्र व वरील अटीस अधिन राहुन प्रस्ताव तयार करुन नियामक मंडळास सादर करण्या बाबत कळविण्यात आले. संदर्भ क्रं. 4 अन्वये मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या बैठकीमध्ये लातूर शहर महानगरपालिकेस मलशुध्दीकरण केंद्र व स्टेशनच्या बांधकामासाठी कातपूर लघु पाटबंधारे प्रकल्प कव्हा ता. जि. लातूर येथील तलावाच्या बुडीत क्षेत्रातील 2.16 हेक्टर जागेची महामंडळाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार येणारी किंमत जलसंपदा विभागास भरणा करुन जमीन कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास नियामक मंडळाची सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. असे कळविले. सदर जागा महानगरपालिकेस हस्तांतर करणे करिता संदर्भ क्रं. 5 अन्वये जमिनीचे मुल्यांकन प्रपत्र सादर करुन रक्कम भरण्याचे कळविले. जमिनीचे मुल्यांकन प्रपत्र खालील प्रमाणे आहे.

Scanned with OKEN Scanner

कातपूर लपा तलावाची जमीन मलशुध्दीकरण केंद्र व पंपींग स्टेशन उभारणी करिता लातूर शहर महानगरपालिकेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यासाठी रेडी रेकनर बाजारभाव मुल्यानुसार / मा. उच्च न्यायालयाच्या कलम 18 नुसार मुल्यांकन

जमिनीचे मुल्यांकन प्रपत्र

अ.क्रं.	भुधारकाचे नांव	स. नं.	संपादित क्षेत्र हे/आर	क्षेत्र चौ.मी.	एकुण रक्कम
1	मौजे. वासनगाव	33	0.16	1600	8160000
2	मौजे खोपेगाव	46	0.80	8000	4299200
3	मौजे खोपेगाव	47	1.20	12000	6448800
				एकुण रक्कम रु.	**18908000**

वरील जमिनीचे मुल्यांकन प्रपत्रानुसार रक्कम रु. 1,89,08,000/- भरण्या बाबत संदर्भ क्रं. 6 नुसार बँक अकाऊंट डिटेल्स या कार्यालयास कळविण्या यावे अशी मागणी करण्यात आली. त्यानुषंगाने संदर्भ क्रं. 7 अन्वये लातूर शहर महानगरपालिकेस मलशुध्दीकरण केंद्र व स्टेशनच्या बांधकामासाठी बँक डिटेल्स कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्रं. 1 यांनी खालील प्रमाणे सादर केले आहे.

Bank Name	Account No.	IFSC Code
State Bank of India Br. Ausa Road, Latur	62175111132	SBIN0020885

तरी केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजना मलशुध्दीकरण केंद्र व स्टेशनच्या बांधकामासाठी जमिनीचे मुल्यांकन हस्तांतर दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजना मलशुध्दीकरण केंद्र व स्टेशनच्या बांधकामासाठी पाटबंधारे विभागाची जागेचे मुल्यांकन हस्तांतर दर भरणा करुन महानगरपालिकेने सदर जागा कायमस्वरुपी ताब्यात घेण्यात यावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 319 दि. 15/05/2025

विषय - महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन (राज्यस्तर) अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना (भाग-2) राबविणे कामाच्या निविदा दर मंजुरी बाबत.

प्रस्ताव -

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन (राज्यस्तर) अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना (भाग-2) राबविणेच्या कामासाठी ई-निविदा सुचना क्रं. 03/2024-25 (दुसरी वेळ) Tender ID 2025_LMC_1166815_1 मागविण्यात आले होते. ई-निविदा बाबतची माहिती खालील तपशिला प्रमाणे आहे.

1. ई-निविदा मागवलेला दि. 02.04.2025 ते 02.05.2025 .
2. ई-निविदा उघडणेचा दि. 05.05.2025

प्रस्तावित निविदेस एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बिड रिपोर्ट वरुन निदर्शनास आलेनुसार दिनांक 05.05.2025 रोजी निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये 1) अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद, 2) जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि., अहमदाबाद, 3) एल.सी. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., अहमदाबाद असे एकुण तीन निविदाधारक प्राप्त झाले. सदर निविदा धारकाचे कागदपत्रांची तपासणी निविदा समिती सदस्य यांनी केली असता उपरोक्त निविदाधारकापैकी एल.सी. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., अहमदाबाद अपात्र ठरले आहेत. उर्वरीत दोन निविदाधारक अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद व जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद हे पात्र ठरल्याने दोन्ही पात्र निविदा धारकांचा अर्थिक लिफाफा उघडण्यात आला. पात्र निविदा धारकांचा दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्रं.	निविदाकार	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1.	अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद	229,72,92,179/-	1.99% अधिकचे म्हणजेच रक्कम रु. 2343008293.36
2.	जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि. अहमदाबाद		3.51% अधिकचे म्हणजेच रक्कम रु. 2377927134.48

प्राप्त दोन निविदा धारकाचे दरापैकी सर्वात कमीचे दर अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 229,72,92,179/- पेक्षा 1.99 % अधिकचे म्हणजेच रक्कम रु. 2343008293.36 होते. परंतू दिनांक 15 / 05 / 2025 च्या पत्रान्वये वाटाघाटीसाठी कळविण्यात आले असता अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांनी सदर काम हे अंदाजपत्रक दराने करण्याचे कळविले.

तरी अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक दराचे म्हणजे रु. 229,72,92,179/- दर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

निर्णय :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन (राज्यस्तर) अंतर्गत लातूर शहरासाठी भुयारी गटार योजना (भाग-2) राबविणेसाठी अंकिता कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांचे अंदाजपत्रक दरास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत असुन शासन परिपत्रकाप्रमाणे प्रस्ताव नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई व राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात यावा व शासन निर्देशाप्रमाणे आयुक्त यांनी कार्यादेश देण्याची कार्यवाही तात्काळ करावी. तसेच सदर योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार 30% मनपा हिस्सा, म्युनिसीपल बॉन्ड, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्त आयोग अनुदान, UIDF, ई. यांचा वापर करुन भरणा करणेस याद्वारे सुध्दा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 320 दिनांक 15/05/2025

विषय :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यस्तर योजना अंतर्गत कामातील बदलास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना – महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यस्तर योजना अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेच्या रस्ते विकास प्रकल्पास शासन निर्णय क्र. बैठक-2022/प्र.क्र.62/नवि-33 दि. 10 मार्च 2022 अन्वये प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतर सदर कामासाठी ई-निविदा प्रक्रीया पुर्ण करुन कामाचे कार्यादेश संबंधीत न्युनतम दराचे निविदाधारकांस देण्यात आलेले आहेत.

सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी कांही कामे तांत्रिक अडचणीमुळे होऊ शकत नसल्याने सदर कामांऐवजी नवीन कामांना मान्यता देऊन याबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे. नविन कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी न होणारी कामे

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची किंमत
1	Construction of drain at venkatyesh nagar galli no. 1	317800.00
2	Construction of drain at telli galli / bodewali galli.	476700.00
3	Construction of nala drain at sai baba nagar (1 side)	442650.00
4	Construction of drain at badgire to jadhav nivas (1 side)	255375.00
5	Construction of drain at haribhao nagar namdev kamble to sandip kamble(1 side)	227000.00
6	Construction of drain at malwati road mahesh sonar to dyanand kamble (1 side)	198635.00
7	Construction of drain at dhondi ram sirsat to nankarnabai maske .	652625.00
8	Construction of road at islampura galli no. 2	947100.00
9	Construction of road at islampura kasim pathan tailor to mohsin Khalid	1076250.00
10	Construction of drain at juni kapad galli thage kirana to super shop infront .	1169050.00
11	Construction of C.C. road at muneer maniyar to chand shaikh or jalal pathan to patel shaikh house (A+B)	1778406.00
12	Construction of road at gaffar khan kirana to shaikh khurshid.	1391270.00
13	Construction of C.C. road at sufa masjid to MK function hall.	967840.00
14	Construction of C.C. road at vaid vasti tayappa chavhan to shankar chavahn house.	725880.00
15	Construction of road at vilasnagar prakash kamble toi shahji nath kale.	1113016.00
16	Construction of C.C. road at Sali galli vibhote house beside.	1451760.00
17	Construction of C.C. road at vilasnagar prakash kamble toi shahjinath kale.	1198484.00
18	Construction of C.C. road at Sali galli vibhote house beside.	1237565.00
19	Construction of C.C. road at vaid vasti tayappa chavhan to shankar chavahn house.	781620.00
20	Construction of C.C. road at makdum kureshi to bashir bagwan .	1380480.00
21	Construction of C.C. road at sufa masjid to MK function hall.	517680.00
22	Construction of C.C. road at Sali galli vibhote house beside.	517680.00
23	Construction of C.C. road at sayyed ayyub farooq qureshi to baba maulana.	1164780.00
24	Construction of drain at wage to qureshi	510750.00
25	Construction of road at deshpande bada to panasare or patil to gurave and thakur to ratna ghode galli no. 2,3	684063.00
26	Construction of road at gangotri school to ladthi	1381539.00
27	Construction of road at bang house to Dr. suryawanshi house	1368126.00
28	Construction of drain at murad sir to well come function hall	851250.00
29	Construction of road at labour court infront.	1340536.00
30	Construction of road at mazhar qureshi to mona tailor	879040.00

Scanned with OKEN Scanner

31	Construction of road at khori galli arsh furniture to mane rashan dukan or hotel garam masala galli no.1	1208680.00
32	(2)Construction of C.C. road at swami samarth nagar infron of Dr. anjanikar house and infront of solankar house.	504482.00
33	Construction of C.C. road at utkarsh society gorakshan to dhaigode complex ring road.	2527418.00
34	Construction of C.C. road at dyneshwar society from padile house.	1380160.00
35	Construction of C.C. road at sobedar society baktur to sabde.	646950.00
36	(1)Construction of C.C. road at swami samarth nagar infron of Dr. anjanikar house and infront of solankar house.	741836.00
37	(2)Construction of C.C. road at swami samarth nagar infron of Dr. anjanikar house and infront of solankar house.	396796.00
38	(1)Construction of C.C. road at valmiki nagar devkate , gorate to juna railway line beside to sawant house.	936657.00
39	(2)Construction of C.C. road at valmiki nagar devkate , gorate to juna railway line beside to sawant house.	1367685.00
40	Construction of C.C. road at girwalkar nagar from juna railway line fad to baliram khichde	1259928.00
41	(1)Construction of drain at kulswaminagar ipper to munde one side drain.	777475.00
42	(2)Construction of drain at kulswaminagar saraf to jadhav house one side drain.	476700.00
43	(3)Construction of drain at kulswaminagar bhakhre to karad one side drain.	794500.00
44	(1)Construction of drain at kulswaminagar from various places drain construction sonanagar from maharashtra rajya kamgar gruhunirman society.	550475.00
45	(2)Construction of drain at kulswaminagar from various places drain construction sonanagar from maharashtra rajya kamgar gruhunirman society.	493725.00
46	(3)Construction of drain at kulswaminagar from various places drain construction sonanagar from maharashtra rajya kamgar gruhunirman society.	385900.00
47	(4)Construction of drain at kulswaminagar from various places drain construction sonanagar from maharashtra rajya kamgar gruhunirman society.	981775.00
48	Construction of Concrete road kashinath ghane house to kamble house .	596400.00
49	Construction of C.C. road and drain at Dr. ghodke to limbraj jadhav , alto near koreappa house .	560616.00
50	Construction of C.C. road at kadam to pujari , kavtaker ,near suryawanshi house.	1944264.00
51	Construction of Concrete road sainiki nagar galli no. 1	807360.00
52	Construction of Concrete road prakash nagar G.S patil mla to mahindra garaje.	2422080.00
53	construction of drain at surya narayan mangal karyalai to main ause road.	1100950.00
54	Construction of road at panchal house to end.	532772.00
55	Construction of road at shahupuri colony tope to bokde (one side drain available)	903396.00
56	construction of road at koil nagar green belt to patil house ssc board compound beside.	3210720.00
57	Construction of road at patel nagar amrut shinde house to pathan house or shri mangle house to salunkhe galli no. 2	708960.00
58	Construction of road and drain at patel nagar nagnath kade to yedke house (one side drain required)	804360.00
59	Construction of road and drain at kawde to burbure and lokre to baburao galli no.1	435695.00
60	Construction of road and drain at kawde to burbure and lokre to baburao galli no.2	496022.00
61	Construction of road at majge complex to lokre house .	536240.00
62	Construction of road at kawa road to narsing sadge.	1005450.00
63	Construction of road at patel nagar giri police house to sirsagar.	784251.00
64	Construction of road and drain at patel nagar minar urdu school to sud row house galli no.2	509428.00
65	proposed Construction of divider from shivaji chowk to mahatma gandhi chowk at latur municipal corporation.	8765179.00
66	proposed Construction of divider from shivaji chowk to rajiv gandhi chowk at latur municipal corporation.	11952517.00
67	proposed Construction of divider from shivaji chowk to sai naka (renapur naka) at latur municipal corporation.	17131941.00
	एकूण रुपये	97644683.00

Scanned with OKEN Scanner

	नव्याने हाती घ्यावयाचे कामाचे नाव	कामाची किंमत
1	Construction of Road at Ward No.1 Yahiya Colony.	15384003.00
2	Construction of Road at Ward No.1 Ayesha Colony.	
3	Construction of B.T Road from Sunil Phulari to Limbaraj Kamble and Shankar Veer to Siraj Kazi road in Ward no.16.	
4	Construction of Cement concrete road from Chaudhary's house to Rafeeq Shaikh's house at Mysore Colony in Ward no.7	
5	Construction of C.C. Road & Drain at Laxmidham Colony from Krushnai Niwas to Matruchaya Niwas to Bansode to Kotalwar Ward no.14	
6	Construction of Road from Ansar Masjid to Baghwan's house at Ansar Nagar in Ward no.7	24852581.00
7	Construction of road from Kore Garden to Ring Road in Ward No.6	
8	Construction of road near Tulsi Dham at Hake Nagar in Ward no. 16	
9	Construction of B.T Road from Hatte Nagar Chowk to Ambika Mandir in Ward No.8.	
10	Construction of road from Saibaba Mandir to Chawanda Hospital opposite Barshi Road in Ward No.11	
11	Construction of road in front of Mukaddam Saheb house at New Renapur Naka in Latur city.	
12	Construction of B.T Road in Agresan Bhavan area in Ward No.8	
13	Construction of Road from Mr. Sakolkar's house to Daithankar's house at Shanti Society in Ward no.16.	9917576.00
14	Construction of road in Hatte Nagar Galli no. 05 from Raza Masjid To Kumbhar Chowk and Fakir Shaikh To Mujju Khan House	
15	Construction of road from Shree Marde sir house to Prakash Swami house.	9869047.00
16	Construction of road from Moichi Nalla to Khadak Hanuman Mandir (Including 600 m Drain Both side)	
17	Construction of road from Kolhe Nagar Shri Sachin Waghmare to Mallishe house & various locations in Ward No.5	
18	Construction of B.T Road and drainage of road from Syed Mukram's house to Syed Ayub's house in Ward no.14	26199959.00
19	Construction of B.T Road from Ambedkar Chowk to Sale Galli Masjid Road.	
20	Construction of road from Shree Bharat Barure Complex at Dnyaneshwar Mandir in Ward No.9 to Dnyaneshwar Mandir.	
21	Construction of B.T Road from Old Renapur Naka to Subhedar Ramji Nagar in Latur city.	
22	Construction of B.T Road from Rajiv Gandhi Chowk to Old Ausa Road opposite Sahyadri Hospital.	11280127.00
23	Construction of B.T Road from Bhatambre Hospital to Scrap Market Road	
24	Construction of B.T Road from Basveshwar Chowk to Bhatambre Hospital	
	एकूण रुपये	97750395 3.00

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

